दोघांनी गळा आवळत केला मित्राचा खून

वाचा पान ३ वर

जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६ पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

जळगाव, शनिवार, २० डिसेंबर २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१। अंक : १३३। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध


## विचारपुष्प



‘स्वदेशी’ एक ‘विचार’ आहे, एक ‘जीवन-दर्शन’ आहे आणि त्याला संवेदनेची सोनेरी किनारसुद्धा आहे. त्यात स्वावलंबनाची जिद्द आहे, गुलामीविषयी घृणा आणि स्वातंत्र्याविषयी सळसळता उत्साह आहे. म्हणून स्वदेशीच्या संदर्भात आपण आपले विचार आणि विचार प्रणालीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये आपले आचरण देखील स्वदेशी असले पाहिजे. स्वावलंबनाची निर्मिती स्वदेशी विचारांमधून होते.

**- बिंदुमाधव जोशी**
संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत

## विनम्र अभिवादन



संत गाडगेबाबा यांची आज पुण्यतिथी

# बांगलादेशात आगडोंब

भारतीय उच्चायुक्तालयांवर **हल्ले** | हादीच्या मृत्यूनंतर कट्टरपंथीयांचा **उन्माद** | २८ पत्रकारांना **जाळण्याचा प्रयत्न** | हिंदू तरुणाला झाडाला उलटे टांगून **जाळले**





शरीफ हादीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर उन्मादी जमावाने ढाक्यात एकत्र येऊन हिंसाचार सुरू केला. आंदोलकांनी जाळलेल्या प्रोथोम ओलो या दैनिकाच्या कार्यालयाजवळील पुस्तकाच्या दुकानालाही आग लावण्यात आली. आगीतून वाचलेली पुस्तके उचलताना चिमुकली. या चिमुकलीला पुस्तकाचे महत्व कळले पण हिंसाचार करणाऱ्यांना नाही

◆ **ढाका, १९ डिसेंबर**

माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा कट्टर विरोधक आणि भारताविरोधात गरळ ओकणारा इन्कलाब मंचचा प्रवक्ता ३४ वर्षीय शरीफ उस्मान हादी याचा गुरुवारी मृत्यू झाल्यानंतर बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी गुरुवारी रात्री अक्षरशः धुडगूस घातला. जाळपोळ करीत चितगाव, ढाकासह चार भारतीय उच्चायुक्तालयावर हल्ले चढविले. याशिवाय दोन वर्तमानपत्रांच्या कार्यालयांना आग लावत २८ पत्रकारांना जाळण्याचा प्रयत्न केला.



शरीफ हादी

कट्टरपंथीयांनी हिंदू नागरिकांनाही लक्ष्य करीत ईशनिंदेच्या आरोपात एका हिंदू तरुणाला झाडाला उलटे टांगून जाळले. यात त्याचा मृत्यू झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लष्कराला तणाव असलेल्या भागात तैनात करण्यात आले. निदर्शकांनी बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान यांच्या घराची तोडफोड केली. हादीवर चार दिवसांपूर्वी अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. प्राथमिक उपचारानंतर त्याला सिंगापूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. उपचार सुरू असताना हादी याचे निधन झाल्याचे कळताच विद्यार्थी संघटना आणि कट्टरपंथी आक्रमक झाले आणि त्यांनी देशातील प्रमुख शहरात हिंसाचार सुरू केला. चितगाव येथील सहाय्यक भारतीय उच्चायुक्तांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. यावेळी निदर्शकांनी भारतविरोधी घोषणाबाजी केली आणि भारतीय उच्चायुक्तालय बंद करण्याची मागणी केली. याशिवाय इतर तीन भारतीय उच्चायुक्तालयावरही दगडफेक केली. सुरक्षा दलाने हस्तक्षेप करीत त्यांना हुसकावून लावले.

### देशात हिंसाचाराला थारा नाही : मोहम्मद युनूस



**हिंसक आंदोलनानंतर जाहीर संदेशात बांगलादेशमधील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस म्हणाले, देशात कोणत्याही हिंसाचाराला स्थान नाही. हिंदू नागरिकाच्या हत्येत सहभागी असलेल्यांना सोडणार नाही. अतिरेकी गटांकडून जाणीवपूर्वक हिंसाचार पसरविण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनी सावध राहावे. पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याबाबत आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. हादीच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल.**

### इंटरनेट सेवा अनिश्चित काळासाठी बंद

गुरुवारी संतप्त आंदोलकांनी ढाका येथील दोन नामांकित वृत्तपत्रांच्या कार्यालयांवर हल्ला करून इमारतीला आग लावली. या आगीच्या वेळी अनेक पत्रकार आणि कर्मचारी इमारतीत अडकले होते. जीव वाचविण्यासाठी २८ पत्रकारांनी एका खोलीत आश्रय घेतला, मात्र आग त्या खोलीपर्यंत पोहोचल्याने काहींनी इमारतीच्या छतावरून उड्या मारल्या. हिंसाचार नियंत्रणात आणण्यासाठी बांगलादेश सरकारने देशातील इंटरनेट सेवा अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. शाळा, महाविद्यालये दोन दिवसांपासून बंद आहे.

### जमावाने हिंदू नागरिकांची घरे जाळली

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आंदोलकांनी हिंदू नागरिकांना लक्ष्य करीत अनेक घरांना आग लावली. मयमनसिंग जिल्ह्यात दुबालिया पाडा भागात ईशनिंदेच्या आरोपाखाली दीपू चंद्र दास या २५ वर्षीय तरुणाला झाडाला उलटे टांगून जाळून मारले. तो एका कापड कारखान्यातील कामगार होता. पोलिसांनी या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही. औपचारिक तक्रार आल्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्याने सांगितले.



# सत्ताधारी-विरोधकांचे ‘मनोमिलन’

## ओम बिर्ला यांच्याकडील चहापानासाठी सर्वपक्षीय नेते आले एकत्र

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्या दालनात सर्वपक्षीय नेत्यांसाठी परंपरेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम झाला. ओम बिर्ला यांच्याशिवाय या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसच्या प्रियांका वढेरा, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्यासह अनेक पक्षांचे नेते तसेच केंद्रीय मंत्री सहभागी झाले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी परदेश दौऱ्यावर असल्यामुळे काँग्रेस पक्षातर्फे प्रियांका वढेरा या चहापानाला उपस्थित राहिल्या.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगेही या कार्यक्रमाला अनुपस्थित होते. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अशा कार्यक्रमावर काँग्रेस पक्षाने बहिष्कार घातला होता. संसदेच्या दोन्ही सभागृहातील कामकाजावरुन सत्ता पक्ष तसेच विरोधी पक्षांत तणाव होता, पण त्याचे कोणतेही पडसाद या कार्यक्रमात दिसले नाही.

यावेळी उपस्थितांमध्ये हसतखेळत अनेक विषयावर चर्चा झाली. राजधानी दिल्लीतील प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी मी वायनाडमधून मागवलेली एक विशेष प्रकारची जडीबुटी घेते, असे प्रियांका वढेरा उपस्थित खासदारांना म्हणाल्या. यावर पंतप्रधान मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. तुमचा परेदश दौरा कसा झाला, या प्रियांकांच्या प्रश्नावर छान झाला, असे उत्तर मोदी यांनी दिले.

### हिंदूंच्या सुरक्षेसाठी कारवाईची शक्यता

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

बांगलादेशात भडकलेला हिंसाचार आणि हिंदू नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर भारतीय नौदलाने बंगालच्या उपसागरात नोटम जारी केला आहे. २५ ते २६ डिसेंबर रोजी नोटम जारी करण्यात आला. हिंदू आणि अल्पसंख्यकांवर सातत्याने होणाऱ्या हल्ल्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी भारतीय लष्कराकडून कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बांगलादेशमध्ये हिंसाचार, जाळपोळ आणि अल्पसंख्याकांवरील हल्ल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. गुरुवारी एका हिंदू तरुणाला जिवंत जाळण्यात आले, तसेच हिंदूंच्या घरावर झालेल्या हल्ल्यामुळे अल्पसंख्यकांमध्ये दहशत आहे.

# कोकाटेंना दिलासा, पण टांगती तलवार कायम

## जामीन मिळाल्याने तूर्तास अटक टळली

◆ **मुंबई १९ डिसेंबर**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला असल्याने काहीसा दिलासा मिळाला असला, तरी त्यांच्यावरील टांगती तलवार अद्याप कायम आहे. न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने तूर्तास कोकाटेंची अटक टळली आहे.



राज्यात सर्वत्र चर्चेत असलेल्या शासकीय सदनिका घोटाळा प्रकरणात स्थानिक आणि जिल्हा सत्र न्यायालयाने माजी मंत्री कोकाटे यांना दोषी ठरले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे पहिले खाते काढले आणि त्यानंतर मंत्रिपददेखील गेले.

कोकाटे यांच्यावरील असलेल्या दबावामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. दिलेला मंत्रिपदाचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नाशिक जिल्हा न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला आव्हान देणाऱ्या कोकाटे यांच्या याचिकेवर शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने कोकाटे यांना १ लाख रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे कोकाटे यांना मोठा वैयक्तिक दिलासा मिळाला असून त्यांची संभाव्य अटक सध्या टळली आहे. मात्र, न्यायालयाने केवळ जामीन दिला असून त्यांच्या शिक्षेला स्थगितीबाबत अद्याप निर्णय दिलेला नाही.


### आमदारकीचे काय होणार?

**माणिकराव कोकाटे यांच्यासाठी सर्वात मोठी अडचण ही त्यांच्या आमदारकीबाबत आहे. न्यायालयाने अद्याप त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिलेली नाही. नियमानुसार, दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधीचे पद धोक्यात येते. या पृष्ठभूमीवर उच्च न्यायालयाने आता कोकाटे यांच्या आमदारकीचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष यावर काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**

## महत्त्वाचे

### बाजारातील घसरण थांबली

**मुंबई** : मागील चार सत्रांपासून सुरू असलेल्या घसरणीच्या मालिकेला शुक्रवारी पूर्णविराम मिळाला. जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत, रुपयातील स्थैर्य आणि बँक ऑफ जपानचा धोरणात्मक निर्णय अपेक्षेनुरूप राहिल्याने गुंतवणूकदारांनी बाजारात जोरदार खरेदी केली. यामुळे मुंबई बाजाराचा निर्देशांक ४४८ अंकांनी उसळला तर निफ्टीत १५१ अंकांची वाढ झाली. या वाढीने आठवड्याचा शेवट गोड झाला. नफा देणाऱ्या शेअर्समध्ये श्रीराम फायनान्स, मॅक्स हेल्थकेअर, भारत इलेक्ट्रॉनिक्स, पॉवर ग्रीड आणि टाटा मोटर्स यांचा समावेश होता. दुसरीकडे एचसीएल टेकमध्ये मोठी घसरण नोंदविण्यात आली. त्यापाठोपाठ जेएसडब्ल्यू स्टील, कोटक बँक, आयसीआयसीआय बँक हे शेअर्सही तोट्यात राहिले.



# महापुरुषांचे विचार, अनुभूतींचे सार आचरणात आणणे म्हणजे संघ

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**सिलीगुडी, १९ डिसेंबर**

संघाचे स्वयंसेवक समाजातील प्रत्येक क्षेत्रात कार्य करत सातत्याने पुढे जात आहेत. संघ म्हणजे नेमके काय, असा प्रश्न अनेकांना पडतो. मुळात, संघ म्हणजे भारतीय महापुरुषांचा विचार आणि अनुभूतींचे सार व्यवहारात, आचरणात आणण्याची प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. संघ शताब्दी वर्षानिमित्त सिलीगुडी येथे युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उत्तर बंगालच्या आठ जिल्ह्यांतील युवक-युवतींसह शेजारी राज्य सिक्कीमचेही युवा सहभागी झाले होते. यावेळी युवा वर्गाशी संवाद साधताना सरसंघचालक म्हणाले की, भविष्याची जबाबदारी तुम्ही स्वेच्छेने घ्या किंवा घेऊ नका, पण ती युवा वर्गाच्या खांद्यावरच आहे. जर आपण केवळ स्वत:साठीच काम केले तर आपण आणि आपले कुटुंब सुरक्षित राहू शकणार आहे का? आजवरचा इतिहास सांगतो की, जेव्हा जेव्हा देशावर संकट आले तेव्हा तेव्हा समाज जागृत झाला आहे.





शक, हूण, मुघल, पठाण आणि शेवटी इंग्रजांच्या काळापयरत या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. समाजातील भेदभाव आणि संकीर्ण स्वार्थाला दूर करण्याच्या उद्देशाने समाज सुधारणेचे प्रवाह सुरू झाले. आपण कोण आहोत? आपले पूर्वज कोण आहेत? अशा आत्मबोधाला नव्याने जागृत करण्यासाठी दयानंद सरस्वती तसेच रामकृष्ण- विवेकानंदांच्या प्रेरणेने समाज सुधारण्याचे कार्य सुरू झाले. किशोरावस्थेतच डॉक्टर हेडगेवारांनी नागपुरातील शाळेत ‘वंदे मातरम२’ आंदोलनाचे नेतृत्व केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळकांसारख्या महापुरुषांप्रमाणेच डॉक्टरांनी देखील हे जाणले की, समाज निर्माणाविना राष्ट्राचा उद्धार करण्याचे प्रयत्न यशस्वी होणे नाही. डॉक्टरांनी अभ्यासाच्या निमित्ताने अनुशीलन समितीशी संपर्क स्थापित केले आणि पश्चिम भारतात क्रांतिकारी आंदोलनाचा विस्तार केला. राजद्रोहाच्या आरोपासंदर्भात आपली बाजू मांडणाऱ्या डॉक्टरांनी प्रश्न केला होता की, इंग्रजांना कोणत्या कायद्याच्या आधारे भारतावर राज्य करण्याचा अधिकार मिळाला? हे त्यांचे फार मोठे धाडस होते. देशाच्या सवारगीण उन्नतीसाठी व्यक्तिनिर्माणाच्या कार्याची सुरुवात डॉक्टरांनी केली, असे गौरवोद२गार सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी काढले.

### हृदयात भारत भक्ती, तोच खरा हिंदू

रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या ‘स्वदेशी समाज’ या लेखात म्हटले आहे की, नेतृत्व करणारे आणि नेतृत्वाची क्षमता असणारे व्यक्तीच खरे नायक असतात. आज जे लोक स्वत:ला हिंदू मानत नाहीत, ते देखील हिंदू पूर्वजांचेच वंशज आहेत. पूजा पद्धती, खान-पान वेगवेगळे राहू शकेल. पण, आपण एक राष्ट्र आणि एकाच संस्कृतीचे पाईक आहोत. ज्याच्या हृदयात भारताविषयी भक्ती, आदर असेल तोच खरा हिंदू आहे. सर्व प्रकारच्या विविधतांचा सन्मान करणारी विशिष्ट परंपरा ही आपली हिंदू संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती भारतासाठी जगावा, भारताला त्याने जाणून घ्यावे आणि भारताला सर्वो परी मानावे, असा आग्रह करत डॉ. मोहनजी भागवत यांनी उपस्थितांना संघात येऊन संघाचे कार्य जाणून घेण्याचे आवाहन केले.

# बीएलएच्या हल्ल्यात १३ पाकिस्तानी सैनिक ठार

**इस्लामाबाद, १९ डिसेंबर**

बलुचिस्तानच्या पंजगूर भागात बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात२ बीएलएने गुरुवारी रात्री केलेल्या आयईडी स्फोटात लष्कराची दोन वाहने उडवण्यात आली. यात १३ पाकिस्तानी सैनिक ठार झाले, तर १५ जखमी आहे. हल्ल्यानंतर बीएलएने घटनास्थळावरून जवानांची शस्त्रे पळविली. घटनेच्या काही तासातच बीएलएने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

बीएलएचे प्रवक्ते जियांद बलोच यांनी गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पंजगूरच्या कटगरी भागात भागात पाकिस्तानी लष्कराच्या दोन वाहनांना लक्ष्य करीत दोन आयईडी स्फोट घडविले. यात पाकिस्तानी लष्कराचे १३ सैनिक ठार तर, १५ जखमी झाले. आयईडी स्फोट घडवून पाकिस्तानी सैन्याचा बुलबुल आणि आसपासच्या भागात पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या सैनिकांना माघार घ्यावी लागली. स्फोटानंतर दबा धरून असलेल्या आमच्या जवानांनी गोळीबार केला. कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि लष्करी वाहनांवर ताबा मिळविण्यात आला. बीएलएने एक चित्रफीत प्रसारित केली, त्यात हस्तगत केलेल्या रायफल्स, दारूगोळा आणि इतर उपकरणे दाखवली आहेत. अत्याचाराविरोधात लढा सुरूच राहणार बीएलएने पाकिस्तानी सैन्यावर झेर आणि आसपासच्या भागात नागरिकांविरुद्ध कारवाया तीव्र करण्याचा आरोप केला. पाकिस्तानी सैन्य घरांवर छापे टाकत असल्याचे या गटाने म्हटले आहे. हा सामान्य लोकांवर थेट अत्याचार आहे. या गटाने असाही दावा केला आहे की नागरिकांचा मानवी ढाल म्हणून वापर केला जात आहे. बलुच लोकांवरील प्रत्येक अत्याचार, दडपशाही आणि हल्ल्यासाठी जबाबदारी निश्चित केली जाईल. पाकिस्तानी सैन्याला कब्जा करणारी शक्ती म्हणून संबोधण्यात आले. पाकिस्तानी सैन्य आणि सरकारविरुद्धचा लढा सुरूच राहील असेही निवेदनात म्हटले आहे.

# हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

## संसदेचे कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले असून संसदेचे कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आले. लोकसभेच्या कामकाजाची उत्पादकता १११ टक्के राहिल्याचे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज सांगितले.

शुक्रवारी सकाळी ११ वाजता लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अधिवेशनाचे सूप वाजल्याची औपचारिक घोषणा केली. १८ व्या लोकसभेच्या सहाव्या अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठकी झाल्या, आपल्या सगळ्यांच्या सहकार्यांने सभागृहाच्या कामकाजाची उत्पादकता १११ टक्के राहिली, असे ते म्हणाले. लोकसभेत मनरेगाच्या ऐवजी सुधारित जी राम जी विधेयक तसेच अणुउर्जा प्रकल्प खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्याच्या विधेयकासह एकूण आठ विधेयक पारित करण्यात आली.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*
सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)
शनिवार, २० डिसेंबर २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.
वरण, बट्टी ३० रु.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रु.
पार्सल मिळेल.
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

खरा आहे, आरोग्यासाठी चांगला आहे
बैद्यनाथ च्यवनप्राश स्पेशल





पॉवर ऑफ 3
चांगली इम्यूनिटी | जास्त ऊर्जा | शक्ति आणि स्फूर्ती
च्यवन-फीट शुगरफ्री पण उपलब्ध
बैद्यनाथ च्यवनप्राश शुद्ध तुपात तयार केले जाते
सर्व मेडिकल स्टोर्स व आयुर्वेदिक औषधालयात मध्ये उपलब्ध. 844 844 4935

## थोडक्यात महत्त्वाचे...



### 'इंडियन लॉयर्स'च्या अध्यक्षपदी ॲड. महेश भोकरीकर

**जळगाव :** भोकरीकर लीगल सर्व्हिसेसचे संचालक ॲड. महेश भोकरीकर यांची इंडियन लॉयर्स असोसिएशन जळगाव अध्यायांतर्गत नवीन अध्याय मंडळाच्या अध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. जळगाव अध्यायाच्या अध्यक्षपदी ॲड. भोकरीकर, तर ॲड. मुकेश शिंपी यांचीही नियुक्ती करण्यात आली. इंडियन लॉयर्स असोसिएशन नवीन अध्याय मंडळात उपाध्यक्ष, सचिव तसेच विद्यार्थी समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली. या माध्यमातून अधिवक्त्यांचे व्यावसायिक हित, प्रशिक्षण, सामाजिक उपक्रम, विधी सेवा तसेच राष्ट्रीय पातळीवरील सहभाग वाढविण्याचा संकल्प करण्यात आला. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यातील अधिवक्त्यांसाठी उपयुक्त उपक्रम महिला सक्षमीकरण, वाढती बालगुन्हेगारी, तसेच कायदेविषयक जनजागृती, विद्यार्थी मार्गदर्शन आणि संघटनात्मक बळकटी साधली जाईल, असा विश्वास ॲड. महेश भोकरीकर यांनी व्यक्त केला.



### हस्ती स्कूलच्या टेनिक्कॉइटपटूंचा राज्यस्तरावर प्रवेश

**धुळे :** दोंडाईचा येथील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा टेनिक्काइट स्पर्धेत यश मिळवीत राज्यस्तरावर प्रवेश मिळविला. जिल्हा क्रीडा विभागातर्फे राज्यस्तरीय स्पर्धा हस्ती क्रीडा संकुलात झाली. शालेय स्तरावरील १७, १९ वर्षे वयोगटात हस्ती स्कूलच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेत हस्ती स्कूलच्या विद्यार्थिनींनी उभयंता गटात प्रथम येत यश मिळविले. १७ वर्षांखालील गटात अनुष्का देसाई, पूजा वळवी, राधिका वळवी, रितिका राऊत, सलोनी वळवी यांनी, तर १९ वर्षांखालील गटात गायत्री गावित, चांदणी बहिरम, जयश्री भोये, प्रीती मावळी, माधुरी ठाकरे यांनी यश संपादन करत राज्यस्तरावर प्रवेश मिळविला. त्यांचा या यशाबद्दल हस्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष उद्योगपती अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन, संचालक मंडळ, प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन यांनी गौरव केला. विद्यार्थ्यांना क्रीडा विभागप्रमुख प्रकाश खंडेराय यांचे मार्गदर्शन लाभले.



### महापालिकेतर्फे मतदान जनजागृतीचा शुभारंभ

**जळगाव :** जळगाव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ २६ करिता मतदान जनजागृती कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. चित्ररथाचे फित कापून मान्य आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी उद्घाटन केले. तसेच पथनाट्याला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला. तसेच सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांसह मतदानाची शपथ आयुक्त ढेरे यांनी दिली. या कार्यक्रम प्रसंगी अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त धनश्री शिंदे, मुख्य लेखापरीक्षक विजयकुमार सोनवणे, प्रकल्प अधिकारी गायत्री पाटील यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. जळगाव शहरात विविध ३५ ठिकाणी पथनाट्य केले जाणार आहे. तसेच चित्ररथ हा पुढील पाच दिवस शहरातील प्रत्येक ठिकाणी फिरून मतदान जनजागृतीचे काम करणार आहे.

### वषप्राशन बाधित रुग्णाचा मृत्यू

**जळगाव :** विषप्राशन केल्याने अत्यवस्थ अवस्थेतील रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. बिसन सुरेश बारेला (वय १९,रा. मेलान, देवझरी,ता.चोपडा,हमु एकलग्न) असे मयताचे नाव आहे. बिसन याने एकलग्न येथे राहत्या घरी विषप्राशन केले. त्यानंतर त्याची प्रकृती अत्यवस्थ झाली. प्रकार लक्षात येताच त्याला बुधवारी (३ डिसेंबर) तत्काळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याची प्रकृती गंभीर झाली. उपचाराला प्रतिसाद देवु न शकल्याने त्याचा शुक्रवारी (१२ डिसेंबर) रात्री ११ वाजता मृत्यू झाला. खबर दिल्यानुसार याप्रकरणी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. हवालदार विठ्ठल पाटील हे तपास करीत आहेत.

## निधन वार्ता

### संपतराव जोशी



**शेंदुर्णी (ता. जामनेर) :** येथील श्री त्रिविक्रम महाराज मंदिर परिसरातील रहिवासी संपतराव बाळकृष्ण जोशी (वय ८०) यांचे गुरुवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते ओम इन्फोटेकचे संचालक ज्ञानेश व मनोज जोशी यांचे वडील होत.

### पुष्पा चौधरी



**जळगाव :** येथील पत्रकार कॉलनीतील राहिवासी पुष्पा त्र्यंबक चौधरी (वय ७५) यांचे शुक्रवार (१९ डिसेंबर) आजाराने पहाटे निधन झाले. त्या किरण त्र्यंबक चौधरी, डॉ.रुपाली धांडे यांच्या आई तर दंतचिकित्सक डॉ.महेंद्र धांडे यांच्या सासू होत.

### भाऊराव पाटील



**यावल :** तालुक्यातील उंटावद येथील ग्रामपंचायतीचे सलग १५ वर्ष माजी सरपंच भाऊराव हरी पाटील (वय ८८) यांचे शुक्रवार, दि.१९ रोजी सकाळी ५:४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावाई व नातवंडे असा परिवार आहे. ते वि.का.सोसायटीचे संचालक जगदीश पाटील व पंकज ग्लोबल विद्यालयाचे प्राचार्य मिलींद पाटील यांचे वडील, तर वि.का.सोसायटीचे चेअरमन शशीकांत गुलाबराव पाटील यांचे काका होत.

### पुना घुगे



**जळगाव :** तालुक्यातील चिंचोली येथील रहिवासी पुना काळू घुगे यांचे शक्रवारी (१९डिसेंबर) वृद्धापकाळाने निधन झाले. नूतन मराठा कॉलेजचे कर्मचारी रवींद्र घुगे यांचे ते मोठे वडील होत.

### राजेंद्र वाणी



**जळगाव :** बालाजी पेठेतील रहिवासी राजेंद्र रामचंद्र वाणी (वय ६८) शुक्रवार (१९ डिसेंबर) सायंकाळी ४.३० वाजता निधन झाले. जयंत राजेंद्र वाणी यांचे ते वडील होत.

# घरफोडी करणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

## सहा गुन्ह्यांची उकल; धुळे तालुका पोलिसांची कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १९ डिसेंबर**

तालुक्यातील कुसुंबा गावासह विविध ठिकाणी झालेल्या घरफोडी प्रकरणात तालुका पोलिसांनी आंतरराज्यीय टोळी गजाआड केली असून, त्यांच्याकडून सुमारे १५ लाख ६० हजारांचे १२० ग्रॅम सोन्याचे दागिने व ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी हस्तगत केली. त्यांच्याकडून सहा गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.

तालुक्यातील कुसुंबा गावात २४ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री तक्रारदार वसंतराव राजाराम चव्हाण यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी चार लाख ७८ हजार रुपये किंमतीचे सोने, चांदीचे दागीने व रोख रक्कम लंपास केली होती. त्यानंतर घरफोडी करणाऱ्या चोरट्यांनी आपला मोर्चा ग्रामीण भागातील विविध गावांत वळविला होता. त्यात धुळे तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील कुसुंबा, नेर, मोराणे, कुंडाणे, अकलाड या गावांत गेल्या दोन महिन्यांत घरफोडीचे प्रकार घडले. त्या प्रकरणांची पोलीस ठाण्यात नोंद होताच पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांनी अधिनस्त अधिकारी व अंमलदारांनी तत्काळ गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट दिली.



या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या सूचनेप्रमाणे गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे सूचित केले.

धुळे तालुका पोलीस ठाण्याचे लेखनिक हवालदार नितीन चव्हाण व शोधपथकातील हवालदार उमेश पवार, पोलीस शिपाई कुणाल शिंगाणे, राजू पावरा यांनी गुन्ह्यातील आरोपींचा शोध सुरू केला. पारंपरिक तपास पद्धतीचा वापर करून साक्षीदारांना विचारपूस, अभिलेखावरील ज्ञात गुन्हेगारांची तपासणी, गुप्त बातमीदारांमार्फत माहिती घेऊन पोलीस शिपाई गजेंद्र मुंडे, राहुल देवरे, प्रतीक देसले यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कुशल पद्धतीने परिसरातील व तीन राज्याच्या रस्त्यांवरील सुमारे ३७५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. त्यात काही संशयितांच्या हालचालींच्या पुराव्यांच्या आधारे १७ दिवसांपासून आरोपींचा शोध सुरू होता. संशयित आरोपींचा मागोवा काढत सलग ५ दिवसांचा प्रवास करीत मिळालेल्या धागेदोऱ्यांच्या आधारे तपास पथक थेट गुजरात व मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवरील दाहोद व गोध्रा जिल्ह्यांत जाऊन धडकले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने संशयितांना ताब्यात घेतल्यावर त्यांनी घरफोडी गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्यासोबतच धुळे येथील स्थानिक साथीदारी असल्याची माहिती त्यांच्याकडून मिळाली. त्यानंतर संशयितांना धुळे येथे आणून अटक करण्यात आली. त्यांची पोलीस कोठडी मंजूर झाली असून, तपासात स्थानिक साथीदारालाही अटक करण्यात आली आहे. यातील संशयित यापूर्वी कोणत्याही गुन्ह्यात अटक नव्हते किंवा त्यांची पूर्वगुन्हेगारी पार्श्वभूमी कोणत्याही पोलीस ठाण्यात उपलब्ध नाही. निष्पन्न झालेले संशयित गुन्हा करून लगेच परराज्यात निघून जात असत.

प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेल्या संशयितांनी सहा घरफोडी गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्यात १२० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यांतील मुद्देमाल जप्त करण्याचे कामकाज व इतर साथीदारांचा शोध घेण्योच कार्य सुरू आहे.

गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक, धनंजय पाटील यांच्या पर्यवेक्षणात हवालदार नितीन चव्हाण, उमेश पवार, पोलीस शिपाई कुणाल शिंगाणे, गजेंद्र मुंडे, राहुल देवरे, प्रतीक देसले, राजू पावरा, जयकुमार चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील, पोलीस शिपाई अमोल जाधव यांनी ही कामगिरी केली. तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक कैलास माळी, हवालदार मनोज बाविस्कर तपास करीत आहेत. संशयितांना गुरुवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते.

# 'नर्व्ह बायोप्सी'अर्थात मज्जातंतूच्या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला आशेचा किरण

## महादेव रुग्णालयाच्या न्यूरोलॉजी विभागाची ऐतिहासिक कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर**

जळगाव (प्रतिनिधी) : येथील आकाशवाणी चौकातील महादेव हॉस्पिटल येथे ५५ वर्षीय रुग्णाला मज्जातंतूंच्या दुर्मिळ विकारामुळे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण झाले असताना दिलासा मिळाला आहे. महादेव रुग्णालयाचे तज्ज्ञ न्यूरोलॉजिस्ट डॉ. कमलेश तायडे यांनी केलेल्या अत्याधुनिक मज्जातंतूच्या "नर्व्ह बायोप्सी शस्त्रक्रिये"मुळे त्यांच्या आजाराचे अचूक निदान शक्य झाले. यामुळे योग्य उपचार सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

५५ वर्षीय रमेशभाई (बदललेले नाव) यांना गेली अनेक महिने हातपायांमध्ये सुन्नपणा, जळजळ आणि अशक्तपणा यांनी त्रस्त होते. अनेक तपासण्या आणि उपचारांनंतरही त्यांच्या आजाराचे नेमके कारण समजू शकले नव्हते. मज्जातंतूंच्या दुर्मिळ विकारामुळे त्यांचे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण झाले होते. महादेव रुग्णालयाच्या न्यूरोलॉजी विभागाचे प्रमुख आणि तज्ज्ञ न्यूरोलॉजिस्ट डॉ. कमलेश तायडे यांनी रुग्णालयातील पहिली नर्व्ह बायोप्सी (मज्जातंतू ऊती तपासणी) शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. डॉ. तायडे यांच्या वर्षानुवर्षांच्या अनुभवाने, तांत्रिक कौशल्याने आणि अत्याधुनिक



ज्ञानामुळे ही गुंतागुंतीची प्रक्रिया अत्यंत अचूकतेने आणि सुरक्षिततेने पार पडली.

विभागप्रमुख डॉ. तायडे यांनी सांगितले, "आजची यशस्वी नर्व्ह बायोप्सी आमच्या न्यूरोलॉजी विभागासाठी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या अत्याधुनिक निदान सुविधेमुळे आता गुंतागुंतीच्या आणि दुर्मिळ मज्जातंतू विकारांचे अचूक निदान आणि प्रभावी उपचार या भागातच उपलब्ध होणार आहेत. रुग्णांना आता मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज राहणार नाही." महादेव हॉस्पिटल येथे या सुविधेमुळे अनेक फायदे रुग्णांना मिळाले आहे. गुंतागुंतीच्या मज्जातंतू विकारांचे अचूक निदान, योग्य आणि लक्ष्यित उपचार, रुग्णांची मोठ्या शहरांकडे जाण्याची गरज टळणे, वेळेची आणि खर्चाची बचत, प्रादेशिक पातळीवर उच्च दर्जाच्या न्यूरोलॉजी सेवा जळगाव शहरात प्राप्त झाली आहे.

# 'कान्हदेश संगीत समारोह' आजपासून जळगावात

## यंदाची थीम 'स्वरसंपन्न मंगेशकर'

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर**

केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित ललित कला संवर्धिनी यांच्या वतीने जळगाव शहरात प्रथमच 'कान्हदेश संगीत समारोह' होत आहे. हा संगीत समारोह शनिवारी (२० डिसेंबर) तसेच रविवारी (२१ डिसेंबर) दररोज सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीराजे नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. या समारोहाचे उद्घाटन शनिवारी वेगा केमिकल्सचे संचालक भालचंद्र पाटील, कोगटा उद्योग समूहाचे प्रेम कोगटा, जळगाव जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, ॲड. किशोर पाटील, केशवस्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे.

जळगाव व परिसरातील संगीत रसिकांसाठी एक नवा, अभ्यासपूर्ण आणि दर्जेदारसांस्कृतिक उपक्रम म्हणून या दोन दिवसीय संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.या वर्षीच्या समारोहाची संकल्पना 'स्वरसंपन्न मंगेशकर' अशी असून, भारतरत्न लता मंगेशकर व मंगेशकर कुटुंबाच्या संगीतमय परंपरेला अभिवादन करण्याचा हा प्रयत्न आहे. मंगेशकर घराण्याचे मूळ कान्हदेशात असल्याने, या भागाशी असलेले त्यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक नाते अधोरेखित करण्याच्या उद्देशाने ही संकल्पना निवडण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

**कलावंतांना व्यासपीठ**

या संगीत समारोहात नाट्यसंगीत, भावसंगीत तसेच चित्रपट संगीत या विविध प्रवाहांतील निवडक गीतांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. जळगावातील स्थानिक गायक-कलाकारांसह पुणे व मुंबई येथील कलाकार यात सहभागी होणार आहेत. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या समारोहामागील महत्त्वाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. जळगाव शहरात सातत्याने दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम व्हावेत, या उद्देशाने 'कान्हदेश संगीत समारोह'ची सुरुवात प्रथमच करण्यात आली आहे. जळगाव व परिसरातील संगीतप्रेमींनी या दोन दिवसीय संगीत समारोहास उपस्थित राहून या नव्या सांस्कृतिक उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन ललित कला संवर्धिनी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नवी दिल्ली प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी विद्यापीठाच्या तीन विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या तीन विद्यार्थ्यांची प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२६ अंतर्गत नवी दिल्ली येथे दि. १ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या विशेष शिबिरासाठी निवड झाली आहे.

विद्यापीठाला क्षेत्रीय संचालक रासेयो संचालनालय, पुणे सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, रासेयो, युवक कार्य व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रानुसार प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२६ अंतर्गत नवी दिल्ली येथे दि. ०१ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या विशेष शिबिरासाठी विद्यापीठातील ०३ विद्यार्थ्यांची (दोन विद्यार्थिनी व एक विद्यार्थी) निवड करण्यात आली आहे.

या निवडीत विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेतील समाजकार्य विभागातील विद्यार्थी गजातन छगन बोरसे, जळगाव येथील मु. जे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी केतकी भरत शिंपी व नंदुरबार येथील ट्रायबल महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी उन्नती जतिन बाला



यांचा समावेश आहे. हे तिन्ही विद्यार्थी प्रजासत्ताक दिनाच्या राष्ट्रीय स्तरावरील पथसंचलनात सहभागी होणार असून त्यासाठी नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रशिक्षण व शिबिरात त्यांना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

विद्यार्थ्यांची ही निवड विद्यापीठातील युवक-युवतींच्या शिस्त, नेतृत्वगुण, शारीरिक क्षमता व राष्ट्रभक्तीची साक्ष देणारी आहे. राष्ट्रीय पातळीवरील अशा मानाच्या कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही विद्यापीठासाठी तसेच संबंधित महाविद्यालयांसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीबद्दल कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या यशस्वी सहभागासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाहतुकीला अडथळा ठरणारी १५ वाहने जप्त

## भाऊंचे उद्यान परिसरातील विक्रेत्यांवरही कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर**

शहरातील वाहतूक कोंडी आणि रस्त्यावरच्या अतिक्रमणांच्या तक्रारींची दखल घेत, शुक्रवारी मनपा अतिक्रमण निर्मूलन पथक आणि शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्तपणे मोठी कारवाई केली. या धडक मोहिमेत टावर चौक ते चौबे शाळा परिसरातील रस्त्यावर बेशिस्तपणे लावलेल्या १५ दुचाकी जप्त करण्यात आल्या, तर भाऊंचे उद्यान परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या भाजीपाला विक्रेत्यांचे दोन ट्रॅक्टर भरून साहित्य जप्त करण्यात आले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या टावर चौक ते चौबे शाळा या मार्गावर बेशिस्त वाहनधारकांमुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला होता. महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन



विभागाने आणि शहर पोलिसांनी शुक्रवारी दुपारी अचानक या भागात मोर्चा वळवला. यावेळी रस्त्यावर लावलेल्या १५ दुचाकी जप्त करण्यात आल्या. या सर्व दुचाकी पुढील कारवाईसाठी वाहतूक शाखेकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत. भाऊंचे उद्यान परिसरात विक्रेत्यांची पळापळ

दुसरीकडे, भाऊंचे उद्यान परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत भाजीपाला विक्रेत्यांनी रस्ता अडवला होता. वारंवार सूचना देऊनही विक्रेते हटत नसल्याने प्रशासनाने कठोर पवित्रा घेतला. या कारवाईत दोन गाड्या आणि तब्बल दोन ट्रॅक्टर भरून भाजीपाला जप्त करण्यात आला आहे.

# १०० किलोवॅट सोलर प्लांट जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते कार्यान्वित

## एस. पी. डॉ. रेड्डी यांची संकल्पना : खर्चात होणार मोठी बचत

**तभा वृत्तसेवा**

**जळगाव :** येथील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या छतावर नव्याने १०० किलोवॅट क्षमतेचे सोलर प्लांट बसविण्यात आला आहे. हा प्लांट जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या संकल्पनेतून ही वीजनिर्मितीची योजना साकार झाली आहे.

**अशी होईल वीज निर्मिती**

पोलीस अधीक्षक कार्यालयात अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिक्षक कार्यालयत तसेच स्थानिक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा अशा विविध शाखा आहेत. या सर्व शाखा संगणीकृत करण्यात आल्या आहेत. या शाखांमध्ये महिन्याकाठी जवळपास अंदाजे १० ते ११ हजार युनिट्स वीज खर्च होत असते. आता नव्याने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या



छतावर चार हजार ते पाच हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये १८४ सोलर प्लेट बसविण्यात आल्या आहेत. या सोलर प्लांटमुळे दिवसाला कमीत कमी ३०० युनिट्स वीज व उन्हाळ्यात ४०० ते ४५० युनिट तयार होणार आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक कार्यालयातील वीज बिल खर्च कमी होणार असुन अधिकची वीज तयार होणार आहे.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी या उपक्रमाची प्रशंसा करत वीज निर्मिती आणि विजेची बचत ही आजची गरज असल्याचे सांगीतले. पोलीस अधीक्षक डॉ. रेड्डी यांच्या संकल्पना अनुकरनीय असल्याची भावना याप्रसंगी व्यक्त झाली.

या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उप अधिक्षक (गृह) अरुण आव्हाड, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक सतीश गोराडे, एलसीबीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड, राखीव पोलीस निरीक्षक प्रशांत सुगरवार आदी उपस्थित होते.

# जळगावात उद्या तप, सेवा, सुमिरणचे मार्गदर्शन शिबिर

**जळगाव :** इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सायंटिफिक स्पिरिच्युअलिझम (आयएएसएस, मेरठ) आणि आनंदाश्रम सेवा संस्था (जळगाव) यांच्यातर्फे रविवारी (२१ डिसेंबर) शहरातील काशीबाई उखाजी शाळेजवळील बारा ज्योतिर्लिंग मंदिरासमोरील मीराई लॉन्सवर विशेष तप, सेवा, सुमिरणचे मार्गदर्शन शिबिर होणार आहे. आधुनिक आणि असंतुलित जीवनशैलीमुळे आज समाजातील बहुसंख्य नागरिक ताणतणाव, थकवा, गॅस, आम्लता, लठ्ठपणा, अशक्तपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, पाठदुखी, मानदुखी, संधिवात, हृदयरोग, मूत्रपिंड विकार, भीती, चिंता, यकृतविकार तसेच कर्करोगासारख्या गंभीर शारीरिक व मानसिक आजारांनी त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत केवळ आहारात योग्य बदल करून गमावलेले आरोग्य पुन्हा मिळवता येते, हा संदेश या शिबिरातून देण्यात येणार आहे. शिबिरात रामचरितमानसवर आधारित आहार प्रणाली आयएएसएसचे प्रचारप्रमुख डॉ. गोपाल शास्त्री हे मार्गदर्शन करणार आहेत. शरीरावर दुष्परिणाम करणाऱ्या इंग्रजी औषधांपासून मुक्तता मिळवून नैसर्गिक पद्धतीने निरोगी जीवन जगण्याचा मार्ग शिबिरातून मार्गदर्शित केला जाणार आहे. आरोग्याबाबत जागरूक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कॉलेजमध्ये निघालेली तरुणी बेपत्ता

**जळगाव :** कॉलेजला जाते,असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडलेली २२ वर्षीय तरुणी बेपत्ता झाली. बुधवारी (१७ डिसेंबर) सकाळी दहा वाजेच्या सुमारास शहरात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. कुटुंबातील सदस्यांनी शोध घेतला असता तरुणीचा तपास लागु शकला नाही. तक्रारीनुसार याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुरुवारी (१८ डिसेंबर) मिसिंग दाखल करण्यात आली. पोलीस नाईक पंकज पाटील हे तपास करीत आहेत.

**Change In Name**

I have changed my name from
**RAVEENA KETAN MORE**
to
**BHOI RAVEENA RAMESH**

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस, भुसंपादन कार्यालय व सर्व वित्तीय संस्था बँका, पतसंस्था यांना कळविण्यात येते ते खालील प्रमाणे की,

**मिळकतीचे वर्णन -** तुकडी व जिल्हा जळगांव, पोट तुकडी व तालुका जळगांव, मौजे पिंप्राळा येथील जळगांव महानगरपालिका हद्दीतील गट.नं.१८८, यातील प्लॉट नं. २३, याचे क्षेत्र २९०.०० चौ.मी. पश्चिम बाजुकडील क्षेत्र ९०.४०३ चौ.मी. यासी **चतुःसिमा- पुर्वेस-** सदर प्लॉट पैकी भाग, **पश्चिमेस-** ओपन स्पेस, **उत्तरेस-** रोड व रस्ता, **दक्षिणेस-** प्लॉट नं. २२ येणे प्रमाणे मिळकत ही शिवाजी धनसिंग पाटील यांनी साहेबराव राजाराम पाटील यांना दि. २८.०९.२००७ रोजी खरेदीखत दस्त क्र. २४९४/२००७ अन्वये नोंदणीकृत दस्ताने विक्री केलेले आहे. त्यानंतर साहेबराव राजाराम पाटील यांनी अशोक पुंडलिक माळी यांना दि. १०.०६.२०१० रोजी खरेदीखत **दस्त क्र. २८८७/२०१०** अन्वये नोंदणीकृत दस्ताने विक्री केलेले आहे. त्यानंतर **अशोक पुंडलिक माळी यांनी गोकुळ धनसिंग पाटील** यांना दि. २९.०७.२०१० रोजी **खरेदीखत दस्त क्र. ३८६९/२०१०** अन्वये नोंदणीकृत दस्ताने विक्री केलेले आहे. उपरोक्त नमुद मुळ खरेदीखत दस्त क्र. २४९४/२००७, खरेदीखत दस्त क्र. २८८७/२०१० आणि खरेदीखत दस्त क्र. ३८६९/२०१० हे हरविलेले आहे.

तरी संपूर्ण जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद खरेदीखतांच्या आधारे कोणताही व्यवहार करू नये अथवा तसे करण्याचा प्रयत्न करू नये. आणि जर कोणी तशा प्रकारचा व्यवहार केला असेल किंवा कोणाकडे सदरील हरविलेले खरेदीखत उपलब्ध असेल तर त्यांनी सदरील जाहीर नोटीस प्रदर्शीत झाल्याच्या **०७ दिवसांच्या आत** खाली नमुद पत्यावर लेखी स्वरूपात कळवावे. आपण **०७ दिवसांच्या आत** न कळविल्यास तद्नंतर सदर खरेदीखत बाबत कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार बंधन कारक राहणार नाही. ही जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांकः १९.१२.२०२५**

**सही/-**
**ॲड. महेश र. भोकरीकर,**
**पत्ता : १६, ॲडव्होकेट चेंबर्स, शाहु कॉम्प्लेक्स, शाहु नगर, जळगांव**
**मो.९३२६६५३७०७**

तरुण भारत tarunbharatlive.com CLASSIFIEDS

**Change In Name**

I have changed my name from
**SUDAM REMESH WANI**
and I will use this new name
**SUDAM RAMESH WANI**
in rest of my life.
This evidence have been made by myself with Affidavit No.
54AB 104115

**तरुण भारत'तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच**

राष्ट्रीय विचारांच्या 'जळगाव तरुण भारत'तर्फे लवकरच 'ज्येष्ठ नागरिक मंच'ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

Kirloskar

जगप्रसिध्द **किर्लोस्कर** कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती,शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप,मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.



संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी' २६,नवीपेठ,जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत,जळगांव
☎ 2232641 To 2232645

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी पी.एम.उद्योग, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com




**गुद्दे नि गुदगुल्या**

-हे राम-

अठरा अठरा तास चालले
फक्त नावं बदलण्याचे काम

गांधीजींनीही हेच भजन म्हणावे
'मन रे गा' तू 'जी-राम जी...'

-भिला महाजन
९९२२४८४७११

## महत्त्वाचे



**जगातील सर्वात उंच मूर्ती 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे मूर्तिकार, पद्मश्री जगविख्यात शिल्पकार राम सुतार यांचे वयाच्या १०१ वर्षी निधन झाले. या महान कलामहर्षीला चाळीसगाव येथील चित्रकार दिनेश कृष्णाजी चव्हाण यांनी त्यांच्या कलेतून कलात्मक नमन केले.**

# दोघांनी गळा आवळत केला मित्राचा खून

## गेव्हरे तलावात मृतदेह; पोलीस तपासात उलगडले रहस्य

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर :**

जुने वैर मनात ठेवत दोन मित्रांनी तरुणाला बोलविले. त्यानंतर गळा आवळुन त्याचा खून केला. त्याचा मृतदेह पोत्यात भरुन तो गेव्हरे तलावाच्या पाण्यात टाकला. एमआयडीसी पोलिसांच्या तपासातून पाच दिवसापासून बेपत्ता तरुणाचे रहस्य उलगडले. निलेश राजेंद्र कासार (वय २७,रा. दत्त चैतन्यनगर,जामनेर) असे हत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी या गुन्ह्यात भूषण बाळू पाटील तसेच त्याचा मित्र दिनेश आनंदा चौधरी अशा दोघा संशयितांना गुजरात राज्यातून ताब्यात घेतले.

शुक्रवारी (१९ डिसेंबर) सकाळी एम आयडीसी पोलिसांच्या शोध मोहिमेतून तरुणाचा मृतदेह मिळाला. या घटनेने खळबळ उडाली आहे.

निलेश कासार, भूषण पाटील आणि दिनेश चौधरी (दोघे रा. शिरसोली) हे येथील एका फायनान्स कंपनीत कार्यरत होते. कोणत्या तरी कारणावरुन तिघांमध्ये मतभेद होऊन त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. एका मित्राने हा वाद डोक्यात कायम ठेवला. भूषण तसेच दिनेश हे दोघे गेल्या काही दिवसांपासून शिरसोली येथे वास्तव्य करत होते. याचठिकाणाहून त्यांनी निलेश याला संपविण्याचा कट रचला.



### धरणात आढळला मृतदेह

शुक्रवारी (१९ डिसेंबर) सकाळी एमआयडीसी पोलिसांनी गेव्हरे तलाव परिसरात शोध मोहिमेला सुरुवात केली असता निलेश याचा मृतदेह गेव्हरे तलावात आढळला. मृतदेह पाण्यातून बाहेर काढुन पोलिसांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविला. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड, सपोनि अनिल वाघ तसेच अंमलदार यांनी घटनास्थळी जावुन पंचनामा केला. या प्रकरणी राजेंद्र कासार यांच्या तक्रारीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**चर्चेचा केला बहाणा**

सुत्रांच्या माहितीनुसार, भूषण पाटील याने एका कर्ज प्रकरणसंदर्भात चर्चा करण्याचा बहाणा सांगत निलेश कासार याला जामनेर येथुन शिरसोली येथे बोलविले होते. शिरसोली येथे तिघे मित्रांनी चर्चा केली,मात्र त्यातून असता तोडगा निघु शकला नाही. त्यानंतर शेतशिवारात भूषण तसेच दिनेश या दोघांनी निलेश कासार याचा दोरीने गळा आवळून खून केला. त्याचा मृतदेह एका पोत्यात टाकुन रामदेववाडी शिवारातील गेव्हरे तलावाच्या पाण्यात टाकुन दिला.

**दुचाकी आढळली बेवारस**

सोमवारी (१५ डिसेंबर) निलेश कासार हा दुचाकीने घराबाहेर पडला. त्यानंतर तो बेपत्ता झाला. त्याच्या कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी राजेंद्र कासार (वय ६९,रा. दत्त चैतन्यनगर, जामनेर) यांनी मंगळवारी (१६ डिसेंबर) तक्रार दिली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. या अनुषंगाने पोलीस तसेच नातेवाईक निलेश याचा शोध घेत असता रामदेववाडी गावाजवळ त्याची दुचाकी बेअवस्थेत पोलिसांनी मिळुन आली.

**तपास चक्र फिरविले**

पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी तपासाचे चक्र गतीमान केले. सपोनि अनिल वाघ यांच्यासह पथक कामाला लागली. निलेश याच्या मोबाइलचे कॉल डिटेल्स, तांत्रिकरित्या तपासले असता शेवटचे कॉल दिनेश तसेच भूषण याच्याशी झाल्याचे समोर आले. त्यानुसार या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता धक्कादायक मामला उघडकीस आला.

**निलेश हुरहुन्नरी तरुण**

निलेश हा हुरहुन्नरी तसेच कोणाच्याही मदतीला धावुन जाणारा,सहकार्य करणारा म्हणून परिसरासह अन्यत्र परिचित होता. कोणाचेही कामाप्रती आपुलकीचा भाव त्याच्या व्यक्तीमत्वात होता. याची प्रचिती रुग्णालयात जमलेल्या गर्दीतील चर्चेतून आला. कुटुंबियासह नातेवाईकांचा शोक अनावर होता. जामनेरसह जळगाव तालुक्यात या घटनेने हळहळ व्यक्त झाली.





## अवैध घरगुती सिलेंडरचा साठा दोघांविरोधात पोलिसात गुन्हा

**जळगाव :** घरगुती गॅस सिलेंडरचा बेकायदेशीररित्या घरात साठा करुन विक्रीच्या उद्देशाने ज्वलनशील पदार्थ बाळगल्याप्रकरणी दोन संशयितांवर रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या पथकाने गुरुवारी (१८ डिसेंबर) पिंप्राळा येथील हुडको परिसरात दोन ठिकाणी छापा टाकुन घरगुती बारा सिलेंडर तसेच गॅस भरण्याचे साहित्य असा सुमारे ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला होता. याप्रकरणी उमेर जुबेर खान (वय १८), अरबाज अब्बास शेख (दोघे रा. पिंप्राळा,हुडको) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक संजय तडवी तपास करीत आहेत.

## रोटरी भवन येथे आज कथ्थक नृत्य कार्यक्रम

**जळगाव :** येथील प्रभाकर कला संगीत अकॅडमीतर्फे आज शनिवारी (२० डिसेंबर) सायंकाळी साडेसहा वाजता मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे परंपरा या कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी विनामूल्य व प्रवेश खुला असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी असे आवाहन संचालिका डॉ. अपर्णा भट - कासार यांनी केले आहे.

## मुंबईला निघालेला तरुण बेपत्ता

जळगाव : मुंबई येथे टपाल देऊन येतो,असे कुटुंबातील सदस्यांना सांगुन घराबाहेर पडलेला ३७ वर्षीय तरुण बेपत्ता झाला. गुरुवारी (१८ डिसेंबर) रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास ही घटना तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. तरुणाच्या उजव्या हातावर दत्तात्रय नाव गोंधलेले आहे. या प्रकरणी दाखल मिसिंगचा तपास हवालदार धनराज पाटील हे करीत आहेत.

# शहरातील पाच हजार दुबार मतदार गवसले

## एकाच ठिकाणी मतदानाचे कर्तव्य बजावणार

**जळगाव :** महापालिकेच्या मतदार यादीत ३३ हजार दुबार मतदारांची नावे आढळली असून यात १६ हजार नागरिकांचे नाव दोन ते तीन वेळा नोंदलेले असल्याचे दिसून आले. या दुबार मतदारांचा शोध महापालिकेच्या १९ पथकांसोबत बीएलओंच्या मदतीने घेणे सुरू असून शुक्रवारपर्यंत ५ हजार दुबार नावांचा शोध घेऊन त्यांच्याकडून कोणत्या ठिकाणी मतदान करणार याचे अर्ज भरून घेण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाने मतदार यादीतील प्रारूप यादी प्रसिद्ध केली होती. या यादीत दुबार नाव असलेल्या मतदारांच्या नावापुढे चिन्हाकींत करण्यात आले आहे. परंतु दुबार नाव असलेल्या व्यक्तींची संख्या अधिक असल्याने निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या दुबार मतदार यादीतील मतदारांचा शोध शहरात गेल्या आठ ते दहा दिवसापासून सुरू आहे. तसेच या कामासाठी शहरातील सर्व बीओलो यांची देखील बैठक घेऊन मदत घेतली जात आहे.

**निवडणूक आयोगाने घेतला आढावा**

निवडणूक आयोगाने शुक्रवारी दुपारी साडेबारा ते तीन वाजेपर्यंत व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून महापालिका आयुक्त, अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेतली. यात निवडणूक तयारी, मतदान केंद्र, मतदार यादी, दुबार मतदार शोध आदी विषयांची माहिती घेतली.

**दुबार मतदारांचा शोध सुरूच**

महापालिकेचे बहुतांश कर्मचारी निवडणुकीच्या अन्य कामांमध्ये व्यस्त असले तरी नेमण्यात आलेल्या पथकाकडून तसेच बिएलओ यांच्या सहकार्याने २२ डिसेंबर पर्यंत ही शोधमोहीम घेतली जाणार होती. परंतु याला अजून काही दिवस मुदत वाढ मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर मतदानाच्या दिवशी केंद्रावर उरलेले दुबार मतदारांकडून अर्ज भरून घेतले जाणार आहे.



# मनपा निवडणुकीसाठी मतदान केंद्र आज जाहीर होणार

## शहरात ५१६ केंद्र निश्चीत; विविध सुविधांची पूर्तता

**जळगाव :** जळगाव शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी २० डिसेंबर रोजी मतदान केंद्र निश्चीत करण्यात आले आहे. निवडणुकासाठी ५१६ केंद्रांवर मतदान होणार असून याठिकाणी विविध सुविधांची पूर्तता करणे सुरू आहे.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रशासकी स्तरावर तयारीची धावपळ सध्या सुरू आहे. मतदानासह, मतमोजणीचीही तयारी केली जात आहे. दरम्यान शहरात मतदान केंद्र निश्चीत करण्यात आले असून ५१६ केंद्रांची यादी शनिवारी २० रोजी जाहीर केली जाणार आहे. प्रभागनिहाय २० ते ३० मतदान केंद्र राहणार आहेत. या मतदान केंद्रांसाठी १४१ इमारती निश्चीत करण्यात आल्या आहेत.

**प्रभागनिहाय केंद्रांची संख्या**

शहरातील प्रभाग १ मध्ये २७, प्रभाग २- ३०, प्रभाग ३- २७, प्रभाग ४- ३०, प्रभाग ५- ३२, प्रभाग ६- २५, प्रभाग ७- २४, प्रभाग ८- ३१, प्रभाग ९- ३३, प्रभाग १०- २५, प्रभाग ११- ३१, प्रभाग १२- ३१, प्रभाग १३- २६, प्रभाग १४- २०, प्रभाग १५- २९, प्रभाग १६- ३०, प्रभाग १७- ३०, प्रभाग १८- १५ आणि प्रभाग १९ मध्ये २० अशी एकूण १६ मतदान केंद्र राहतील.

**केंद्रांवर आवश्यक सूविधांची पूर्तता**

मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. त्यानुसार पिण्याचे पाणी, आरोग्य पथक, पुरेसा बंदोबस्त, दिव्यांगांसाठी रॅम्पची व्यवस्था अशा सुविधांची पूर्तता मनपाकडून केली जात आहे.

**२२ रोजी केंद्रनिहाय प्रसिध्दी**

मतदार याद्यांची अंतीम प्रसिध्दी १५ डिसेंबर रोजी करण्यात आली आहे. आता मतदान केंद्र निश्चीत झाले असून केंद्रनिहाय मतदारांची यादी २२ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

# पहाटे अचानक आग; चार दुकाने खाक

**जळगाव, १९ डिसेंबर**

अचानक आग लागली. प्रकार कोणाच्याही लक्षात न आल्याने आगीने रौद्ररुप धारण केले. यात चार दुकाने चपाट्यात येऊन खाक झाले. शहरातील काशिबाई उखाजी कोल्हे विद्यालयाजवळ ही घटना शुक्रवारी (१९ डिसेंबर) पहाटे घडली. मनपाच्या अग्नीशमन दलाच्या दोन बंबावरील कर्मचाऱ्यांनी ही आग आटोक्यात आणली.

सुत्रांच्या माहितीनुसार, पहाटे चार वाजेच्या सुमारास एका दुकानाला आग लागली. त्यानंतर हळूहळू आग वाढली. दरम्यान या रस्त्याने जाणाऱ्या तरुणाच्या लक्षात हा प्रकार आला. त्याने तत्काळ अग्नीशमन कार्यालयात संपर्क साधुन आगीची माहिती दिली. मनपाच्या अग्नीशमन दलाचे दोन अग्नीबंब घटनास्थळी रवाना झाले. कर्मचाऱ्यांनी दुकानांना लागलेली आग नियंत्रणात आणुन विझविली.

पत्राच्या शेडमध्ये हे दुकाने आहेत.



या आगीत प्रदीप देविदास वाघुळदे यांचे श्री विघ्नहर्ता स्पेअर पार्ट अ‍ॅण्ड सर्विसेस, प्रदीप देविदास खडके यांचे सखी मॅचींग सेंटर, पुष्पक विलास खडके यांचे भगवती ऑटोमोबाईल, गणेश राणे यांचे व्हीनस ऑप्टिकल ही दुकाने आगीच्या चपाट्यात आले. दुकानातील साहित्य, स्पेअरपार्ट, वस्तु, फॅन, इलेक्ट्रीक वस्तू, फर्निचर इत्यादीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पुष्पक खडके यांनी याठिकाणी तीन दिवसापूर्वी स्पेअर पार्टचे दुकान थाटुन व्यवसायाला सुरुवात केली होती. या आगीत दुकानासह साहित्याचे मोठे नुकसान झाल्याने त्यांचा शॉक बसला. आगीच्या जवळच एका खाद्यपदार्थाच्या दुकानात गॅस सिलेंडर होते. सुदैवाने हे दुकान आगीपासुन सुरक्षित राहिल्याने अनर्थ टळला. आमदार सुरेश भोळे, विरेन खडके यांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली. नुकसानग्रस्त व्यावसायिकांशी त्यांनी संवाद साधत माहिती जाणुन घेतली. आवश्यक ती मदत मिळवून देण्याच्या अनुषंगाने आपण प्रयत्नशील राहु, अशी ग्वाही देत आमदार भोळे यांनी दिलासा दिला.

# रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकी धडक; महिला जखमी

**जळगाव :** कुटुंबातील सदस्य रस्ता ओलांडताना चालकाने भरधाव दुचाकी आणत धडक दिल्याने महिला जखमी झाली. अपघातानंतर चालक दुचाकीसह पळाला. मंगळवारी (१६ डिसेंबर) रात्री आठ वाजेच्या सुमारास ही घटना शहरात डिमार्टसमोर जळगाव पाचोरा रस्त्यावर घडली. याप्रकरणी गुरुवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दुचाकी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

नाजिया बी शेख बाबा (वय १९,रा. राम रहिमनगर,शिरसोली रोड) ही महिला तिची मुलगी माहिम तसेच नणंद शमरीण, मामा शेख अशफाक शेख अजीज असे कुटुंबातील सदस्य डिमार्ट येथे गेले होते. सामान खरेदी केल्यानंतर ते पायी घरी जाण्यास निघाले. डिमार्ट समोर रस्ता क्रॉस करताना इच्छादेवी चौफुलीकडुन चालक दुचाकी (एमएच१९ ईएच ८१९९) भरधाव वेगाने आणत होता. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत त्याने वेगाने आणत दुचाकीची महिलेस जोराने धडक दिली. या अपघातात नाजिया बी शेख बाबा ही महिला जखमी झाली. महिला पडल्यानंतर कोणतीही मदत न करता चालक दुचाकीने पसार झाला.


## हस्ती बँक जळगाव शाखेत दिनदर्शिकेचे प्रकाशन

**जळगाव :** पारदर्शक व्यवहार विनम्र व तत्पर सेवेची अविरत ५४ वर्षाची परंपरा असलेली राष्ट्रीय पातळीवर ३१ व राज्य पातळीवर २५ वेळा सर्वोत्कष्ट बँकेचा पुरस्कार प्राप्त हस्ती बँकेच्या सन २०२६ या नवीन वर्षाचे आकर्षक व सुबक दिनदर्शिकाचे प्रकाशन शाखा समितीचे चेअरमन अनिल झुंबरलालजी कांकरिया यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी समिती सदस्य दिलीप गांधी, अतुल लखोटे उपस्थित होते. याप्रसंगी बॅकेचे सभासद व ग्राहक विक्रम चौधरी, राजेश जाखेटे, बालकृष्ण राठी, राधाकिसन जोशी, लिलाबाई उखर्डु तायडे, राजकन्या डवके, शाखा व्यवस्थापक अनिल शिंपी, कर्मचारी नितीन बडगुजर, योगिता चौधरी, सुमित पाटील, निलेश भावसार तसेच प्रविण इहिदे आदिंचे सहकार्य लाभले.

## बँकेत जाण्यास निघालेली विवाहिता बेपत्ता


**जळगाव :** बँकेत जाते,असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडलेली २७ वर्षीय विवाहिता नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली. बुधवारी (१७ डिसेंबर) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सायंकाळपर्यत विवाहिता घरी न परल्याने कुटुंबातील सदस्यांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी पतीच्या तक्रारीनुसार याप्रकरणी गुरुवारी (१८ डिसेंबर) नशिराबाद पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. हवालदार अतुल महाजन हे तपास करीत आहेत.



**गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध**
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२






## अग्रलेख...

# संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. शेवटच्या दिवशी विरोधकांनी नेहमीप्रमाणे गोंधळ घालून 'हम नहीं सुधरेंगे' हे दाखवून दिले. तरीही अन्य अधिवेशनाच्या तुलनेत यावेळचे अधिवेशन अतिशय उत्पादक ठरले. अनेक महत्त्वाची विधेयके सरकारला पारित करून घेता आली; तसेच राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक विषयांवर सभागृहात चर्चाही झाली. विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे अधिवेशनाला काही प्रमाणात गालबोट लागले; तरीही यावेळचे अधिवेशन आतापर्यंतच्या अन्य अधिवेशनाच्या तुलनेत छोटे असूनही अतिशय चांगले झाले. संसदेच्या अधिवेशनाचा उद्देश राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि जनतेच्या जिव्हाळ्याच्या मुद्यांवर दोन्ही सभागृहांत चर्चा व्हावी हा असतो. आजकाल विरोधकांना अभ्यासपूर्ण चर्चेत नाही तर सभागृहात गोंधळ घालण्यात रुची असते, असे वाटते. मुळात प्रश्न सोडवण्यासाठी जनतेने आपल्याला निवडून दिले आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या बहुतेक सदस्यांना उरले नाही. सरकार चुकत असेल, जनतेच्या हिताच्या विरोधातील निर्णय घेत असेल तर त्याला आक्रमकपणे विरोध करण्याचा विरोधकांना अधिकार आहेच; हा अधिकार कोणी नाकारू शकत नाही. चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या सरकारला योग्य मार्गावर आणणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. पण आपण विरोधी पक्षात आहोत म्हणून ऊठसूठ सरकारला नाहक विरोध करणे, सरकारने व्यापक देशहिताच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयाला विरोध करणे योग्य नाही. आजचा विरोधी पक्ष आपली दिशा हरवून बसला आहे, त्यामुळे त्याची सभागृहात आणि बाहेरही कशी दशा होत आहे हे दिसते आहेच. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधक उपस्थित करत असलेल्या सर्व विषयांवर चर्चा करण्याची आमची तयारी असल्याचे सरकारने स्पष्ट केले होते. मतदारयादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावर सरकारने चर्चा करावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली होती. या विषयावर सरकार चर्चा करणार नाही, असा विरोधकांचा होरा होता. पण सरकारने या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत विरोधकांच्या हल्ल्यातील हवा काढून घेतली. एसआयआरवरील चर्चेचे निमित्त करत दोन्ही सभागृहांत गोंधळ घालायचा आणि हिवाळी अधिवेशनाचे कामकाज हाणून पाडायचे, अशी विरोधकांची व्यूहरचना होती; पण या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत सरकारने ती व्यूहरचना हाणून पाडली. एसआयआरवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोन दिवस चर्चा झाली. या चर्चेत सर्व पक्षांच्या सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली. एसआयआर हे एका विशिष्ट समाजाच्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी आहे, असा अपप्रचार विरोधकांनी चालवला होता. एसआयआरवर विरोधक उपस्थित करत असलेल्या आक्षेपांना गृहमंत्री अमित शाह यांनी दोन्ही सभागृहांत अतिशय मुद्देसूद आणि अभ्यासपूर्ण उत्तर दिले.

या देशात अवैध मार्गाने घुसखोरी केलेल्यांना हुडकून काढण्यासाठी एसआयआर आहे. देशातील कोणत्याही जातिधर्माच्या लोकांना लक्ष्य करण्याचा यामागचा हेतू नाही, असे अतिशय समर्पक उत्तर देत अमित शाह यांनी विरोधकांच्या आक्षेपांतील हवा काढली. या देशाचा पंतप्रधान आणि राज्यांचा मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवण्याचा अधिकार घुसखोरांना आम्ही देऊ शकत नाही, तर तो अधिकार या देशातील मतदारांचा आहे, हा शाह यांचा युक्तिवाद अतिशय बिनतोड असा होता. एसआयआरमधून एका विशिष्ट समाजाच्या नागरिकांना लक्ष्य करण्याचा सरकारचा हेतू असता तर बिहारच्या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दणदणीत विजय मिळाला नसता. कारण बिहारमध्ये मुस्लिम समाजानेही भाजपाला भरभरून मतदान केले आहे. वंदे मातरम्ला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संसदेत अतिशय अभ्यासपूर्ण चर्चा झाली. वंदे मातरम्वरील चर्चेत लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण सर्वोत्कृष्ट म्हणावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या तुलनेत लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपला प्रभाव पाडू शकले नाहीत. राहुल गांधींजवळ वक्तृत्व नाही, मांडणी नाही आणि त्यांचा अभ्यासही फारसा नाही. एकेकाळी विरोधी पक्षनेता भाषणासाठी उभा झाला तर सत्ता पक्ष अस्वस्थ होत असे. पण आता विरोधी पक्षनेता म्हणजे राहुल गांधी भाषणासाठी उभे झाले की, सभागृहातील वातावरणातील गांभीर्य कमी होते. एसआयआर व मतचोरीच्या मुद्यावरून राहुल गांधी वारंवार निवडणूक आयोग आणि सरकारला घेरत होते, पत्रपरिषद घेत आरोप करत होते. पण एसआयआरवरील चर्चेत राहुल गांधी यांचे भाषण काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची निराशा करणारे होते. आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ कोणताही ठोस पुरावा ते सादर करू शकले नाहीत. याचा दोष अमित शाह यांनी भोळ्याभाबड्या राहुल गांधींवर न टाकता त्यांना भाषण लिहून देणाऱ्या चमूवर टाकला. असे करत शाह यांनी एका दगडात दोन पक्षी मारले. त्यांना भाषण लिहून देणारे लोक कमी क्षमतेचे आहेत, असा शालजोडीतला टोला त्यांनी मारला. राहुल गांधी यांच्यापेक्षा प्रियांका वढेरा या जास्त प्रभावी असल्याचे या अधिवेशनात दिसून आले. राहुल गांधी यांना हटवून काँग्रेस पक्षाचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी काँग्रेस पक्षात अधूनमधून उगीच होत नाही. भाजपा जेव्हा विरोधी पक्षांत होता, तेव्हा अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराजसारखे दिग्गज नेते विरोधी पक्षनेते होते. हे नेते भाषणासाठी उभे होत तेव्हा सत्ताधारी पक्षाला घाम फुटत असे. आता राहुल गांधी भाषणासाठी उभे राहिले की, ते काय बोलणार, आपल्याच पक्षाला तर अडचणीत आणणार नाही ना, याचा विचार करून काँग्रेसच्या सदस्यांनाच घाम फुटतो. राहुल गांधींनी विरोधी पक्षनेता म्हणून सरकारला अडचणीत आणण्यापेक्षा आपल्याच पक्षाला अडचणीत आणण्याचे काम इमानेइतबारे अनेकदा केले आहे. हिवाळी अधिवेशनात मनरेगाऐवजी सुधारित जी राम जी विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. या विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. मनरेगा योजनेतून महात्मा गांधी यांचे नाव वगळण्याचा सरकारचा हेतू असल्याचा आरोप काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केला. खरे तर महात्मा गांधी यांच्या सिद्धातांची आणि आदर्शाची हत्या काँग्रेसने अनेकदा केली आहे. तरीही या विधेयकावरील मतदानाच्या वेळी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात जो गोंधळ घातला, त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. सांसदीय परंपरा काँग्रेसच्या सदस्यांनी पायदळी तुडवल्या, विधेयकाची प्रत फाडत त्याचे तुकडे सभापतींच्या आसनाच्या दिशेने भिरकावण्यात आले. विधेयकावर झालेल्या चर्चेला उत्तर देणे ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांना कठीण झाले होते. त्यामुळे त्यांना आपली जागा सोडून पाठीमागे जावे लागले आणि भाषण पूर्ण करावे लागले. मात्र या गदारोळातही चौहान यांनी विरोधकांच्या आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद निराकरण केले. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या या बेशिस्त आचरणाबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन् यांना तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करावी लागली. फक्त नाराजी व्यक्त करणे पुरेसे नाही. अशा सदस्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आपल्या अशा वागणुकीबद्दल आत्मचिंतन करण्याची गरज आहे. देशातील जनता आपल्याला वारंवार का नाकारते आहे, याचे कारण काँग्रेसने शोधले पाहिजे आणि आपल्या वागणुकीत सुधारणा केली पाहिजे. काँग्रेस सदस्यांची ही हताशा आणि निराशा ते ११ वर्षांपासून सत्तावंचित झाल्यामुळे आहे. महत्त्वाचे म्हणजे आता आपण कधीच सत्तेवर येऊ शकत नाही, याची खात्री काँग्रेसला असावी असे त्यांच्या दोन्ही सभागृहांतील वर्तनावरून दिसून येते. याआधी भाजपाही अनेक निवडणुका हरली होती, पण ती कधीच हताश आणि निराश झाली नव्हती. मात्र काँग्रेसने आपला आत्मविश्वास पूर्णपणे गमावला आहे. काँग्रेसने आपल्या वागणुकीत आणि नेतृत्वात बदल केला नाही तर काँग्रेसची स्थिती आणखी दयनीय झाल्याशिवाय राहणार नाही, हाच संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा शोध आणि बोध आहे.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव?

"शुक पंजरि वा हरीण शिरावा पाशी, ही फसगत झाली तैशी." म्हणजे ज्याप्रमाणे राघू पिंजऱ्यात अडकतो किंवा हरिण जाळ्यात सापडतं, त्याप्रमाणे मराठी माणसाची फसगत झाली आहे, हे सुरुवातीलाच नमूद करू इच्छितो. आता तुम्ही विचाराल की ही फसगत केली कुणी? आणि झाली कशी व ती फसगत नेमकी आहे तरी काय? याचंही विवेचन पुढे करणार आहे. महाराष्ट्र धर्म हा शब्द समर्थ रामदासांनी दिला. दोन ठिकाणी प्रामुख्याने 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द आढळतो. "मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।" हे उपदेशपर वचन आहे. दुसऱ्यांदा हा उल्लेख सापडतो, जेव्हा समर्थांनी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना पत्र लिहिलं, त्यात ते श्रीमंत योगी, जाणता राजा अशाप्रकारे शिवाजी महाराजांची स्तुती करत म्हणतात, "या भूमंडळाचें ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥" या महाराष्ट्रधर्म शब्दावरून आज प्रचंड मोठं राजकारण खेळलं जात आहे. गंमत म्हणजे समर्थांवर त्यांची जात पाहून टीका करणारेही महाराष्ट्रधर्म या शब्दाचा उच्चार करतात. आता मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जवळ आलीय. त्यामुळे आपल्याला काही ठेवणीतली वाक्ये ऐकायला मिळत आहेत. त्यातलं सर्वात जुनं आणि लोकांची फसगत करण्यासाठी परंपरागत वारपलं जाणारं वाक्य म्हणजे, "हा मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे." प्रत्येक प्रांतातली काही प्रादेशिक अस्मिता असते, त्या अस्मितेला आव्हान देणारी विधाने केली तर स्थानिक जनता आकर्षित होते. हा एक डाव आहे. हे एक जाळं आहे!

१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. काँग्रेसला मुंबई महाराष्ट्राला देऊ नये, असे वाटत होते. यासाठी मोठे आंदोलन झाले. १०५ हुतात्म्यांनी बळी देऊन हे आंदोलन यशस्वीही केले. मात्र मुंबई केंद्रशासित करण्याची भीती अनेक वर्षे मराठी माणसाला दाखवण्यात आली. लहान मुलाने घास घेतला नाही, तर मोठी माणसं बुवा आला म्हणून घाबरवतात. त्याचप्रमाणे निवडणूक आल्यावर मराठी माणसाने आपल्यालाच मतदान करावे, या हेतूने "मुंबई तोडण्याचा डाव आहे" म्हणत भीती दाखवली जाते. १९६० साली ही परिस्थिती खरोखर होती हे नाकारता येत नाही. पण आता परिस्थिती बदललेली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्राचे नेते तर बुलेट ट्रेनसारख्या विकासकामांनाही विरोध करत हा मुंबई तोडण्याचा डाव म्हणतात. मराठी अस्मितेच्या मुद्यावरून राजकारण करणाऱ्या



नेत्यांनी या एका वाक्याच्या बळावर "बंगले" बांधले. पण मराठी माणूस मुंबईच्या बाहेर फेकला गेला. मुंबईतील मराठी टक्केवारी कमी होण्याचे कारण आर्थिक आहेच पण घराचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. आता मुंबईत घरांच्या किमती खूप वाढल्या आहेत आणि सरासरी किंमत प्रति स्क्वेअर फूट ११,००० ते २४,००० रुपये आहे. एक १ बीएचके फ्लॅट ६० लाखांपासून सुरू होतो, तर प्रीमियम भागात १.५ कोटींपर्यंत जातो. लक्झरी घरांच्या किमती ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. मराठी निम्न किंवा मध्यमवर्गीय माणूस या किमतींमुळे घर विकत घेऊ शकत नाही. परवडणाऱ्या घरांच्या योजना अस्तित्वात असल्या तरी त्या अपुऱ्या आहेत. यासाठी कोणी प्रयत्न केलेले दिसत नाही. दुसरी गोष्ट, कितीही नाही म्हटलं तरी मुंबईत अन्य राज्यांतून येणाऱ्या कामगारांची संख्या प्रचंड आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी म्हणता म्हणता इथे अनेक लोक आजही येत आहेत. ही समस्या आहे, हे मान्य करून आपल्याला पुढे जावे लागणार आहे. हा भार या इवल्याशा शहरावर पडतोच आहे. पण त्याची कारणे वेगळी आहेत. त्यावर काम करायला हवे. मात्र मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते अशा महत्त्वाच्या विषयांना प्रांतीय वादाचे स्वरूप देतात. पण अशा लोकांचे संबंध अनेक वर्षे मराठी न बोलता येणाऱ्यांशी असतात. हेही लक्षात घेतले पाहिजे.

मराठी भाषा ही समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, समर्थ रामदास यांनी साहित्यात मोलाचा वाटा दिला आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे या वारशाचे रक्षण. पण आज मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत आणि इंग्रजीचा प्रभाव वाढला आहे. हा मुद्दा मराठीचे कैवारी हाती का घेत नाहीत. कारण त्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात. त्यांची नातवंडे इंग्रजी शाळेत शिकणार आहेत. मग हे भाषेचे डोस सामान्य माणसाला का? आधी केले मग बोलले या संतांच्या वचनाप्रमाणे त्यांनी वागायला नको का? आता महाराष्ट्रधर्म या समर्थांनी दिलेल्या दिव्य शब्दाकडे येऊया. महाराष्ट्रधर्म हा काही स्वतंत्र धर्म नाही. हिंदू धर्माचे मराठी रूप आहे. समर्थ लिहितात, "तीर्थक्षेत्रे ती मोडिलीं । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट जाली । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ देव, धर्म, गोब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली" मग हे सांगत पुढे समर्थ लिहितात, "उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्व तार्किक सभानायक । तुमच्या ठायी ॥ या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥" याचा अर्थ इतका स्पष्ट आहे की समर्थ छत्रपतींना धर्मरक्षक म्हणतात. समर्थ आनंदवनभुवनी या काव्यात लिहितात, "बुडाले सर्व ही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनी" तसेच "बुडाला औरंग्या पापी । म्लेंछसंहार जाहला । मोडलीं मांडली छेत्रें । आनंदवनभुवनी ।" इथे समर्थ "हिंदुस्थान, म्लेंछसंहार, औरंग्या" असे शब्द वापरतात. म्हणजे समर्थ रामदासांची भावना किती उदात्त आहे पाहा. छत्रपती शिवाजी महाराज हे परकीय शक्तींचा नायनाट करत आहेत, असं समर्थ म्हणत आहेत. त्यामुळे समर्थांनी दिलेला महाराष्ट्रधर्म हा शब्द प्रांतीय नसून राष्ट्रीय आहे. महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे हे सावरकरांचे विचार आहेत. हेच समर्थ रामदास वेगळ्या शब्दांत मांडतात. त्यामुळे मुंबईच्या काही स्वतंत्र समस्या आहेत. मराठी माणसाच्याही काही समस्या आहेत. या स्वतंत्रपणे कोणाचाही द्वेष न करता सोडवल्या पाहिजेत. मराठी माणसाचे अर्थकारण, त्याच्यासाठी स्वस्तातली घरे, मराठी शाळा, महाराष्ट्रात मराठी भाषा बोलण्यास प्रोत्साहन असे अनेक विषय घेऊन त्याबद्दलच्या समस्या स्वतंत्रपणे सोडवता येतील. त्यासाठी अभ्यास करावा लागेल. पण स्वतःला मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मराठी माणसाची माथी भडकावत आहेत. आता कुणीही मुंबई महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही किंवा वेगळी करू शकत नाही, हे मराठी माणसाने लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच मराठी माणसाने शुक म्हणजे राघू किंवा हरिण बनून यांच्या जाळ्यात अडकू नये.

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# प्रत्येक गावात असावा असा 'भोंगा'

आजचा काळ हा आवाजांचा आहे. रस्त्यावर हॉर्नचा गोंगाट, घराघरांत टीव्ही, मोबाईल, सोशल मीडियाच्या नोटिफिकेशनची टिंग टिंग म्हणजे थोडक्यात भोंगा! याशिवाय राज्याच्या राजधानीत सकाळी ९ चा भोंगा अशी राजकीय ओळख असलेले खासदार संजय राऊत यांचा भोंगा! अनेकदा वाजला याचा भोंगा असेही उपरोधिकपणे म्हटले जाते. काही भोंग्यांवर बंदी आणण्याची मागणी राज ठाकरे वारंवार करतात. भोंग्यांचे अनेक प्रकार आहेत. पण, आजचा भोंगा खऱ्या अर्थाने वेगळाच आहे. हा भोंगा वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारा आहे. भोंग्याच्या या आख्यायनात पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील 'अग्रज धुळगाव!' या गावाचा उल्लेख करावा लागेल. या गावात सकाळ, सायंकाळी वाजणारा भोंगा राजकीय नव्हे तर अभ्यासाचा! येथे गेल्या ३ वर्षांपासून पहाटे ५ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता भोंगा वाजतो. भोंगा वाजताच गावातील टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला ठेवले जातात अन् विद्यार्थी अभ्यासाला बसतात. या अभिनव संकल्पनेने या गावाची ओळख आता 'भोंग्याचे गाव' अशी झाली आहे. यातून गावकऱ्यांतील एकी दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाले. त्यांची गुणवत्ताही वाढल्याने गावातील ५३ विद्यार्थी नॅशनल स्कॉलरशिपसाठी पात्र ठरले. दहावीतही ते अव्वल ठरत आहेत. अनेक विद्यार्थ्यांची अनेक स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून निवड झाली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतच्या वतीने राबवल्या जात असलेल्या उपक्रमाचे गावकरी १०० टक्के पालन करतात. गावातील काही सुशिक्षित व्यक्ती दररोज ३० ते ४० घरी भेट देऊन पाहणी करतात. विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक अडचण आल्यास ती सोडवण्यासाठी मदतही करतात. पहाटे ५ ते ७ आणि सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा उपक्रम दररोज राबवला जातो.

आज जिथे शाळा, शिकवणी वर्ग (सॉरी कोचिंग क्लासेस) आणि अभ्यासाची महागडी साधनं असूनही मुलं अभ्यासापासून दूर जात असताना अग्रज धुळगावने एक वेगळा आदर्श ठेवला आहे. आपण धूळ या शब्दालाच नाक मुरडतो! पण, ज्या गावाच्या नावातच धूळ आहे. त्यांनी अभ्यासाची धूळ झटकून टाकण्याचा हा विडा उचलला असून ते त्यासाठी 'अग्रज' ठरले आहेत. अग्रज म्हणजे 'मोठा' आणि या अभियानात त्यांनी मोठ्याची भूमिका बजावली असे म्हटल्यास वावगे ठरू नये! इच्छाशक्तीच्या बळावर भोंग्याने क्रांती घडवली, असेच म्हणावे लागेल. या उपक्रमाचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित नाही तर या भोंग्याच्या आवाजात संपूर्ण गाव सहभागी आहे. भोंगा वाजताच टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला जातात. त्यामुळे त्या भोंग्याने लहान मोठ्यांना एक दिशा दिली आहे. सध्या मुलं ऐकत नाहीत, अभ्यास करीत नाहीत. मोबाईलचे वेड लागले आहे, असे लहान मोठ्या, शिक्षित, अशिक्षित घरांमधली एकच कम्प्लेंट! अग्रज धुळगावने या प्रश्नावर जालिम उत्तर शोधून काढले आहे. सकाळ आणि सायंकाळच्या ४ तासातच गावात एक ऊर्जा निर्माण होते नव्हे सरस्वती प्रत्येक घरात डोकावल्याशिवाय राहत नसेल. इथे मुलांना अभ्यास कर असे म्हटले जात नाही. त्यांना अभ्यास करता येईल असे वातावरण गावाने दिले आहे. या भोंग्याचा आवाज केवळ कानांवर पडत नाही तो मनावर परिणाम करतो. तो विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याची आठवण करून देतो. या उपक्रमामुळे गावात हळूहळू बदल दिसू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी बदलत आहेत. मोबाईलवर घालवला जाणारा वेळ कमी होतो आहे. टीव्ही पाहण्याची सवय मर्यादित होते आहे. परीक्षांचे निकाल सुधारत आहेत. पण याहूनही महत्त्वाचं म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आहे. मंदिरे, व्यक्ती, व्यक्तिमत्त्व, वस्तू, निसर्ग, आंदोलनं, वाद, गुन्हे आदींसाठी देशात अनेक गावे ओळखली जात असताना महाराष्ट्रातील अग्रज धुळगाव हे गाव अभ्यासासाठी ओळखले जात आहे. आज देशभरात 'शांतता क्षेत्र', 'नो हॉर्न झोन' अशा संकल्पना राबवल्या जातात. पण अग्रज धुळगावने 'अभ्यास क्षेत्र' निर्माण केलं आहे. जिथे आवाज बंद होतो आणि विचार सुरू होतात. गावागावात इतर भोंगे वाजल्यापेक्षा वा वाजवल्यापेक्षा प्रत्येक गल्लीत, गावात, शहरात असा भोंगा वाजला तर?

९८८१९०३७६५

---

## दखल

**मुकुंद गायकवाड**

# तांदूळ निर्यातीला वेसण कशासाठी?

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, त्याला व्यापकपणे शुल्कयुद्ध म्हटले जाते, तो काळ राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्याला न बधलेल्या भारताला त्यांनी एका नवीनच मुद्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डम्पिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने (तांदळाचे) डम्पिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची



घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डम्पिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर (विशेषतः दक्षिण आशियाई समुदायावर) आधारित आहे. धान्य किंवा इतर कृषी उत्पादनांच्या संदर्भात डम्पिंग म्हणजे निर्यातदार देश किंवा कंपनीने आपले उत्पादन संबंधित देशांतर्गत बाजारातील किमतीपेक्षा कमी दराने विकणे. अशा देशात धान्य आयात करणाऱ्या देशात उत्पादनाची किंमत किंवा उत्पादन खर्च तुलनेने जास्त असतो. (जे शेतीच्या बाबतीत अनेकदा सर्वांत प्रभावी स्वरूप असते). गेले दोन महिने ट्रम्प हे सारखे अहंपणाची भाषा वापरून भारतावर काही ना काही लादण्याची गरळ ओकत आहेत. वास्तविक, या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची बाजू भक्कम झाल्याचे सहज समजू शकते. कारण अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर आजवर जगाची अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टेरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. याची दखल माध्यमांनी आणि तज्ज्ञ लोकांनी घेऊन पंतप्रधान मोदींची पाठ थोपटायला हवी होती, परंतु आर्थिक अभ्यासाअभावी ही महत्त्वाची बातमी दुर्लक्षित राहिली. तसा विचार करता गहू आणि तांदूळ ही दोन्ही पिके अनुक्रमे इजिप्त आणि चीनमध्ये निर्माण झाली होती. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उप्तवल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरयाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात.

इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे, परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्रायलचा शेतकरी सधन झाला आहे. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते. शेतीक्षेत्रामध्येच नव्हे, तर अनेक क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे. परंतु व्हिएतनामच्या हो चीनिव्ह यांनी शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा वापर करून अमेरिकेला दाती तृण धरून शरण यायला भाग पाडले होते. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही. भारतीय शेतकरी आणि केंद्र सरकार याबाबतीत निश्चितच अभिनंदनास पात्र ठरतात.

(लेखक ज्येष्ठ कृषितज्ज्ञ आहेत.)

---

## वाचक पत्रे

### एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षाच्या तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांच्या वादग्रस्त वक्तव्याने देशभरात चर्चा आणि वाद निर्माण झाला. भगवान रामांविषयी केलेले विधान केवळ एक वैयक्तिक मत म्हणून न राहता, समाजातील श्रद्धा, इतिहास आणि राजकीय संवेदनशीलता यांना स्पर्श करणारे आहे. भारतीय संस्कृतीत श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचेच नव्हे, तर नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. अशा व्यक्तिमत्त्वाबाबत केलेली कोणतीही सार्वजनिक टिप्पणी ही अत्यंत जबाबदारीने करायला हवी. या वक्तव्यावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, अशा विधानांमुळे भारतीय इतिहास व सांस्कृतिक परंपरेचा अवमान होतो. यामागे केवळ व्यक्तिगत अज्ञान नसून, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब दिसते. याच पृष्ठभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया न आल्याने, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि मौन याविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, संबंधित आमदारांनी आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, सार्वजनिक व्यासपीठावरून केलेल्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजमनावर त्याचा खोल प्रभाव पडतो, हे विसरून चालणार नाही. राजकारण करताना श्रद्धा, इतिहास आणि समाजभावना यांचा आदर राखणे ही केवळ अपेक्षा नव्हे, तर लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**

### दिल्लीतील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

दिल्लीमध्ये १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव भारत मंडपम् येथे उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम आपली संस्कृती, इतिहास आणि जुन्या काळातील शौर्याची आठवण करून देण्यासाठी आयोजित केला होता. या महोत्सवात सर्वांत जास्त लक्ष वेधून घेतले ते म्हणजे पारंपरिक भारतीय युद्धकलांनी. यामध्ये आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या कलांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात तलवारबाजी, लाठी-काठी आणि दांडपट्टा यासारख्या खेळांची थरारक प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. शिवकाळात मावळे ज्या प्रकारे युद्ध खेळायचे, त्याचे जिवंत दर्शन तेथे घडले. तेथे ऐतिहासिक शस्त्रांचे एक मोठे प्रदर्शन भरवले होते. यामध्ये जुन्या काळातील सुमारे २५० हून अधिक शस्त्रे पाहायला मिळाली. ही शस्त्रे पाहून आपल्या इतिहासाचा अभिमान वाटत होता. केवळ खेळ म्हणून नाही, तर स्वतःचे संरक्षण करण्यासाठी




आणि शिस्त लावण्यासाठी या प्राचीन कला आजही किती महत्त्वाच्या आहेत, हे लोकांना समजावून सांगण्यात आले. दोन दिवसांच्या या सोहळ्यात भारताची संस्कृती आणि परंपरा कशी टिकवता येईल, यावर अनेक जाणकारांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम म्हणजे आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारा एक प्रयत्न होता. तरुण पिढीला आपल्या इतिहासाची माहिती मिळावी, हा त्यामागचा मुख्य हेतू होता. थोडक्यात सांगायचे तर, हा सोहळा भारतीय संस्कृतीचा आणि शौर्याचा अभिमान जागवणारा एक मोठा कार्यक्रम ठरला.

**वर्षा आवदे**

---

## आजचे संघगीत-७८

शनिवार, २० डिसेंबर २०२५

### माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते

माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते
वंदनीय तू पूजनीय तू वरदायिनी माते ॥धृ॥

तुझ्या वैभवी अमुचे वैभव
तव सन्माने अमुचा गौरव
स्फूर्ति प्रेरणा देई अभिनव जग उजळायाते ॥१॥

सभोवती शस्त्रांची खणखण
क्रुर रिपूंचे असुरी वर्तन
तुझ्या रक्षणी स्वधर्मरक्षण जागवु ईर्ष्यते ॥२॥

दुष्ट मतलबी घरभेद्यांचे
डाव उधळवू आव्हानांचे
चढू हिमालय कर्तृत्वाचे तुझ्या पूजनाते ॥३॥

प्रबळ उभारू अविचल भक्ती
प्रलयंकारी अजेय शक्ती
तुझ्या कारणी जीवन मुक्ती एकच आम्हाते ॥४॥

अपूर्ण केवळ अमुचे जीवन
चिरवांछित परि ध्येय चिरंतन
याच देहि ते अमुचे हातुन ने पूर्णत्वाते ॥५॥



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : २०/१२/२०२५ **वार** : शनिवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **हेमंत** : हेमंत **मास** : मार्गशीर्ष **पक्ष** : कृष्ण **महिना** : डिसेंबर
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-१६ **तिथी** : अमावस्या **नक्षत्र** : मुळ
**योग** : गंड **करण** : नाग **सूर्योदय** : ६-०८ **सूर्यास्त** : १८-०५
**चंद्रराशी प्रवेश** : धनु **शुभाशुभ** : दर्शन सौभाग्य स्वर्गवासींचे

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आजचा दिवस भाग्याचा राहील.
**वृषभ** : नको त्या व्यवहारात पडाल.
**मिथून** : सांसारीक लाभ आपणास मिळतील.
**कर्क** : आजारपणाचा अनुभव घ्याल.
**सिंह** : नॉर्मल डिलेव्हरीचे योग महिलांसाठी.
**कन्या** : आईचा आशीर्वाद लाख मोलाचा ठरेल.
**तुला** : चांगल्या कामाचे कौतुक होईल.
**वृश्चिक** : पैशाचे महत्व जाणूनन घ्यावे.
**धनू** : मनाप्रमाणे वागाल तर प्रश्नचिन्ह होतील.
**मकर** : आज ज्योतिष्य मानावेच लागेल.
**कुंभ** : आपली ताकद आज समजून येईल.
**मीन** : वडिलांचे महत्व जाणूनन घ्यावे.
**विशेष** : निधन झालेले पूर्वजांचे फोटोचे पूजन करावे.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### अल्पसंख्याक समुदाय योगदानावर नाहाटा महाविद्यालयात कार्यक्रम

**भुसावळ** : भुसावळ येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य नाहाटा महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.एच.ब-हाटे यांनी सांभाळले. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. जोगेश्वरी पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमात अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस.टी.धुम, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. विलास सोळुंके, प्रा.संगीता भिरुड आणि डॉ. साहेबराव राठोड यांसह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. बी.एच ब-हाटे यांनी नमूद केले की, 'भारत हा सर्व समुदाय, जाती, धर्म व पंथ यांच्या एकत्रित प्रयत्नातून उभा राहिला असून जगभरात त्याच्या सहिष्णुतेसाठी ओळखला जातो.' प्रास्ताविक प्रा. विलास सोळुंके यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. प्रिया लोहार यांनी सांभाळले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुनील अडकमोल यांनी केले. विद्यार्थिनी ऋचा मिटकरे, नयना पाटील, कुफाल्गुनी चौधरी, आश्विनी गुरव, तेजस्विनी पाटील, राशी मेने व अमोल गुजर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेस अन् सुरत ते भुसावळ एक्सप्रेस वेळेमध्ये बदल

**भुसावळ** : रेल्वे प्रशासनाद्वारा प्रवाशांच्या सोयीसाठी गाडी क्रमांक २६१०१ पुणे ते अजनी वंदेभारत एक्सप्रेसच्या अकोला आणि बडनेरा स्थानकावर आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल करण्यात आला आहे. तसेच गाडी क्रमांक १९००५ सुरत ते भुसावळ एक्सप्रेसच्या जळगाव आणि भादली या स्थानकावर आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल करण्यात आला आहे. हा बदल दिनांक २६ डिसेंबरपासून लागू होणार आहे. सुधारित वेळापत्रक असे- गाडी क्रमांक २६१०१ पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेस ,अकोला स्थानक सुधारित आगमन वेळ - १४.४० आणि सुटण्याची वेळ १४.४२ असेल. बडनेरा स्थानक सुधारित आगमन वेळ - १५.४८ आणि सुटण्याची वेळ १५.५० असेल. गाडी क्रमांक १९००५ सुरत ते भुसावळ एक्सप्रेस जळगाव स्थानक सुधारित आगमन वेळ- ०६.५८ आणि सुटण्याची वेळ ०७.०० असेल. भादली स्थानक सुधारित आगमन वेळ- ०७.१० आणि सुटण्याची वेळ ०७.११ असेल. प्रवाशांना या बदलाची नोंद घावी, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

### पाडळसरे धरणाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करावा -आ. खडसेंची मागणी

**मुक्ताईनगर** : जळगाव जिल्ह्यातील पाडळसरे प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात यावा त्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी आमदार एकनाथराव खडसे यांनी अतारांकित प्रश्नाद्वारे विधानपरिषदेत केली. यावेळी ते म्हणाले, जळगाव जिल्ह्यातील तापी नदीवरील पाडळसरे प्रकल्पाला २८०० कोटी रुपयांची केंद्रीय जल आयोगाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात येणार आहे. याप्रकरणी शासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे का? असल्यास, उक्त प्रकरणी सदर प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याची माहिती द्यावी. तसेच सदरप्रकल्पाचा या योजनेत तत्काळ समावेश होण्याबाबत राज्य शासनाने पाठपुरावा करावा, अशी मागणी आमदार यांनी केली. या प्रश्नाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी उत्तर देताना सांगितले. केंद्रीय जल आयोगाच्या ११ मार्च २०२४ च्या पत्रान्वये निम्न तापी पाडळसरे प्रकल्पासाठी रुपये २८८८.४८ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता प्राप्त झाली आहे. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासन पत्र ३१ मे २०२४ अन्वये केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याची माहिती जलसंपदा मंत्री महाजन यांनी दिली

### केऱ्हाळा येथे पत्री शेडवरुन पडल्याने एकाचा मृत्यू

**रावेर** : पत्री शेड उभारण्याचे काम सुरू असताना शेडवरुन एकाचा तोल जाऊन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना १९ रोजी तालुक्यातील केऱ्हाळा येथे घडली. केऱ्हाळा येथील एकता नगर भागात .शेडवर पत्रे बसवण्याचे काम सुरू असताना उंचावरून खाली पडून विजय दत्तात्रेय पाटील (वय ४५) हे उंच शेडवरुन खाली पडल्याने गंभीर दुखापत झाली. त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले. मृत्यूची माहिती मिळताच कुटुंबिय व नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडला. याबाबत रवींद्र भिका पाटील यांनी यांनी रावेर पोलीस स्टेशनला खबर दिल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील पोलीस तपास सुरू आहे.



### मॉडर्न इंग्लिश स्कूलचे विज्ञान प्रदर्शनात यश

**रावेर** : येथील येथील मॉडर्न इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी उपासना बेंडाळे हिची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे. नुकत्याच सावदा येथील डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उपासना बेंडाळे या विद्यार्थिनीने तयार केलेल्या शाश्वत शेती या उपकरणाला इयत्ता सहावी ते आठवीच्या गटातून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला. या उपकरणाची निवड जिल्हा पातळीसाठी झाली आहे. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील उपासना बेंडाळे, सुप्रिया मुळतकर, कृष्णकांत पाटील, विवेक चौधरी आणि सोहम चौधरी यांनी ही विविध वैज्ञानिक उपकरणे सादर केली होती. तिला विज्ञान शिक्षिका उषा पाटील आणि आरती चौधरी यांचे मार्गदर्शन मिळाले.

# बालपणी आकाशातील विमानाकडे कुतुहलाने पाहणारी सामान्य कुटुंबाची मुलगी झाली हवाई सुंदरी

## तुम्ही कुठे शिकता यापेक्षा तुम्ही ध्येय गाठण्यासाठी किती शिकता, हे महत्त्वाचे आहे -हवाई सुंदरी पायल नेवे

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १९ डिसेंबर**

'बालपणी वडिलांचे बोट धरून आकाशात उडणाऱ्या विमानाकडे कुतुहलाने पाहणारी मी सामान्य कुटुंबातील मुलगी, आता हवाई सुंदरी झाली आहे. जेव्हा तुम्ही ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रम घेतात, तेव्हा तुम्ही कुठे शिकत आहात हे महत्त्वाचे नसते. तुम्ही ध्येय गाठण्यासाठी कशा पद्धतीने शिकत आहात हे महत्त्वाचे असते,' असे प्रतिपादन यावल शहरातून प्रथमच हवाई सुंदरी झालेल्या पायल नेवे हिने तिने शिक्षण घेतलेल्या बालसंस्कार शाळेत नुकत्याच घेतलेल्या मुलाखतीत दरम्यान करीत तेथील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. पायल ही सध्या इंडिगो एअरलाइन्समध्ये हवाई सुंदरी म्हणून कार्यरत असून गेल्या महिन्यातच तिला पदोन्नती मिळून ती लीड केबिन अटेंडन्ट या पदावर रुजू झाली आहे.

यावल येथील अजय नेवे यांच्या कुटुंबात जन्मलेली पायल नेवे ही तरुणी आपल्या वडिलांच्या फोटोग्राफी व्यवसायात मदत करायची, वडिलांसोबत लहानपणी बोट



धरून जात असताना आकाशातून उडणाऱ्या विमानाकडे ती कुतुहलाने पाहायची आणि तिला वाटायचे की कधीतरी आपण यात बसू, बालपणी विमानात बसण्याचे पाहिलेले स्वप्न रंगवत असताना तिने मराठी माध्यमातून शहरातील बालसंस्कार शाळेत आपले शिक्षण पूर्ण केले व उच्च शिक्षणासाठी ती पहिल्यांदा शहराच्या बाहेर गेली.

इयत्ता बारावीमध्ये केवळ ६८.२० टक्के गुण असताना सन २०१७ मध्ये तिने मर्चंट नेव्हीमध्ये प्रयत्न केले आणि तिची निवड झाली. दरम्यान, तेथे एकही मुलगी नसल्यामुळे एकटीच मुलगी असल्याने तिने तेथील शिक्षण थांबवून इंटेरियर डिझाइनरसाठी प्रयत्न केले, त्यानंतर तिने विविध कोर्स केले व या दरम्यान मुंबईमध्ये अनुभव आणि शिक्षण घेण्यासाठी व्हीएफएस या व्हिजा कंपनीमध्ये तिने जॉब सुरू केला. तेथे फेब्रुवारी २०१९ मध्ये फ्रान्स डिपार्टमेंटसाठी जॉईन झाली. २०२१ पर्यंत तिथे तिने नोकरी केली व जॉब करत असतांना अडीच वर्षात विविध ठिकाणी तिने मोठमोठ्या एअरलाइन्स कंपन्यांमध्ये अडीच वर्षात सात वेळा हवाई सुंदरी पदाकरिता मुलाखती दिल्या. दरम्यान तिची २०२२ मध्ये अहमदाबाद येथील इंडिगो एअरलाइन्समध्ये निवड झाली. मुलाखतीसाठी आलेल्या २७० मुलींमधून केवळ ६ मुलींची निवड झाली, यात पायल नेवेचा समावेश होता. ३ मार्च २०२३ ला इंडिगो मध्ये हवाई सुंदरी म्हणून तिची निवड झाली आणि १६ मार्च २०२३ ला तीने पहिल्यांदा हवाई सुंदरी म्हणून विमानात सेवेला सुरुवात केली.

दरम्यान, आता तिला पदोन्नती मिळाली असून ती लीड केबिन अटेंडन्ट या पदावर रुजू झाली आहे. ती शहरात तिने शिक्षण घेतलेल्या बालसंस्कार शाळेत आली असता या ठिकाणी तिची मुलाखत मुख्याध्यापक अतुल गर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक एस. डी. देशमुख यांनी घेतली. यात तिने तिचा हा यशाचा खडतर प्रवास कथन करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. यावेळी नेवे हीने आपल्या शाळेचेदेखील ऋण व्यक्त केले.

### आजही कुटुंबास करते मदत

पायलच्या वडिलांचे यावल येथे झेरॉक्सचे दुकान असून आजही पायल सुट्टीवर आली तर या झेरॉक्सच्या दुकानावर ग्राहकांना ती झेरॉक्स तसेच संगणकीय सेवा देत असते. आपण हवाई सुंदरी असले तरी कुटुंबाच्या व्यवसायामध्ये मदत केली पाहिजे म्हणून ती सुट्टी घेऊन घरी आली असता वडिलांच्या व्यवसायात मदत करते.

### प्रारंभी देशांतर्गत व नंतर इंटरनॅशनल फ्लाईट

पायल नेवे हीला १६ मार्च रोजी हवाई सुंदरी म्हणून रुजू झाल्यानंतर प्रारंभी देशांतर्गतच तिला सेवेची संधी मिळत होती. १४ डिसेंबर २०२३ पासून तिची निवड आंतरराष्ट्रीय विमान सेवेसाठी देखील झाली. ती आजवर जगभराचे भ्रमण करून आली आहे.

## भोळे महाविद्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

**भुसावळ** : येथील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात पार पडला. दिवसाचा उद्देश समाजातील अल्पसंख्याक घटकांचे मूलभूत हक्क, स्वातंत्र्य, समानता आणि सन्मान यांविषयी जनजागृती करणे असून भारतामध्ये धर्म, भाषा किंवा संस्कृतीच्या आधारे संख्येने कमी असलेले समुदाय अल्पसंख्याक म्हणून मान्यता दिलेली आहे अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना, कौशल्य विकास व रोजगार योजना, शैक्षणिक व आर्थिक



सक्षमीकरण कार्यक्रम शासनाच्या योजना व उपक्रमाची माहिती जळगांव विभाग प्राचार्य महासंघाचे उपाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ .राजू फालक यांनी दिली. यावेळी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय चौधरी, प्रा .एस .डी. चौधरी, प्रा. डॉ .आर .बी. ढाके, प्रा. डॉ .जगदीश चव्हाण, प्रा .डॉ अनिल सावळे, प्रा. श्रेया चौधरी, प्रा. एस. एस .पाटील, प्रा. डॉ. डी. एस. राणे, प्रा .डॉ .माधुरी पाटील, प्रा. खिलचंद धांडे, प्रा. अश्विनी भाग्यवंत, प्रा .सुशीला भाटे, सुनील ठोसर उपस्थित होते

## जामनेर भगीरथीबाई वाचनालयाचे सचिव सुरेश धारिवाल यांच्याविरुद्ध अध्यक्षांनीच प्रोसिडिंग चोरीचा गुन्हा केला दाखल!

**तभा वृत्तसेवा,**
**जामनेर, १९ डिसेंबर,**

जामनेर येथील जैन ओसवाल भागीरथीबाई वाचनालयाचे सचिव सुरेशचंद्र धारिवाल यांनी वाचनालयाचे प्रोसिडिंगसह अन्य दस्तावेज चोरी केल्याचा आरोप ठेवून संस्थाध्यक्ष जगन्नाथ लोखंडे यांनी सचिव धारिवाल यांचे विरुद्ध जामनेर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. जामनेर शहरातील शंभर वर्ष जुने ओसवाल भगीरथीबाई वाचनालयात अध्यक्ष जगन्नाथ लोखंडे व उपाध्यक्ष पारस ललवाणी यांच्याविरुद्ध सचिव सुरेशचंद्र धारीवाल वाद विकोपाला गेले आहेत. भगीरथीबाई वाचनालय संस्थेचे प्रोसिडिंग बुक, सभासद नोंदणी वही, चालू जमा पावती पुस्तक, हिशोब वही, अजेंडा बुक आदी दस्तावेज २५ फेब्रुवारी २०२५ ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये संस्थेच्या कार्यालयातील कपाटातून सचिव सुरेशचंद्र धारिवाल यांनी चोरून नेले असून संस्थेच्या मालमत्तेची स्वतःच्या फायद्यासाठी व संस्था बळकवण्यासाठी संस्थेच्या दस्तावेजांमध्ये फेरफार करून अफरातफर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाचनालय अध्यक्ष जगन्नाथ दयाराम लोखंडे यांनी जामनेर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून वाचनालय सचिव सुरेशचंद्र मनोहरलाल धारिवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक मुरलीधर कासार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अशोक कोकाटे करीत आहे.

## फैजपूर महसूल विभागात आदिवासी नोंदीस टाळाटाळ

### अधिवेशनादरम्यान महसूल मंत्र्यांची भेट घेऊन आ. अमोल जावळे यांचे सविस्तर निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**यावल १९ डिसेंबर**

गेल्या काही महिन्यांपासून फैजपूर महसूल विभागातील तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून आदिवासी शेतकऱ्यांच्या ताब्यातील शेतजमिनीवर 'आदिवासी खातेदार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६, ३६अ च्या तरतुदींनुसार पात्र' अशा नोंदी घेण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी तलाठी तांदलवाडी व मंडळ अधिकारी खानापूर यांच्याविरोधात शिस्तभंगाच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, फैजपूर विभागातील टोकरे कोळी जमातीच्या आदिवासी शेतकऱ्यांनी येथील आमदार अमोल जावळे यांच्याकडे आपली गाऱ्हाणी मांडली होती.

या तक्रारींचा आधार घेत तसेच प्राथमिक माहितीची पडताळणी करून, आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीचे संरक्षण व्हावे या उद्देशाने आमदार अमोल जावळे यांनी वेगवेगळे शासन निर्णय, सरकारी आदेश व न्यायनिर्णयांचा उल्लेख करत निवेदन दिले.



महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत, आमदार अमोल जावळे यांनी महसूल मंत्री आ. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेत सविस्तर निवेदन सादर केले.

## प्रथम होणार नगरसेवक पदांची मतमोजणी, त्यानंतर नगराध्यक्ष पदाची मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ डिसेंबर**

येथील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने मतमोजणीसाठी दि. १८ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्या जितेंद्र पाटील अध्यक्षतेखाली तापी सभागृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व मतमोजणी पर्यवेक्षक व सहायक मतमोजणी पर्यवेक्षक अधिकारी तसेच मतमोजणी कामी असलेले विविध मतमोजणी कर्मचारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रथम नगरसेवक पदांची मतमोजणी होणार तर त्यानंतर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांची मतमोजणी होणार असल्याची माहिती प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पाटील यांनी दिली. निवडणूक कामी नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांनी २१ रोजी तहसील कार्यालयात शासकीय धान्य गोदाम येथे मतमोजणीचे काम होईल असे सांगितले. तसेच सर्वप्रथम टपाली मतमोजणी तदनंतर ईव्हीएम मतमोजणी होईल. त्याचप्रमाणे प्रथम नगरसेवक पदांची मतमोजणी होईल. त्यानंतर नगराध्यक्ष पदांच्या उमेदवारांची मतमोजणी होईल, असे सांगितले.एकूण १४ टेबलवर मतमोजणी होणार असून सर्वांनी आपले नेमून दिलेले काम काळजीपूर्वक करणे बाबत सूचना देण्यात आल्या. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांत अधिकारी जितेंद्र पाटील तसेच मंडळ अधिकारी प्रफुल्ल कांबळे, नायब तहसीलदार हेमंत गुरव भुसावळ नगर परिषदेचे रवेज शेख तसेच इतर कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

## जळगाव जिल्ह्यात तब्बल दीड लाख घरकुल लाभार्थी निधीच्या प्रतीक्षेत

### एप्रिलमध्ये वाढीव ५० हजार रुपये मंजूर; मात्र लाभार्थ्यांच्या खात्यात अद्याप दमडीही नाही; घरकुलधारकात तीव्र नाराजी

**भुसावळ** : जळगाव जिल्ह्यात गेल्या चार महिन्यापासून घरकुलधारकांना निधीच येत नसल्यामुळे जिल्ह्यातील एक लाख ३२ हजार घरकुलधारक अडचणीत आले आहे. शासनाने ४ एप्रिल २०२५ रोजी परिपत्रक काढून घरकुलधारकांना पुन्हा ५० हजार रुपये निधी वाढीव मंजूर केला आहे . मात्र घरकुलांचे पहिलेच पैसे मिळत नसल्यामुळे वाढीव निधीचा प्रश्नतर कोसो मैल दूर आहे. शासनाने लाडकी बहीण योजना राबवली खरी, मात्र या योजनेमुळे शासनाच्या अनेक योजना अडचणीत आल्याचे दिसून येत आहे.

**घराला लागतात सात लाख, शासनाकडून मिळतात एक लाख ३५ हजार, घर बांधणार कसे?**

घरकुलधारकांना एक लाख २० हजार रुपये निधी मिळत होता. हा निधी अतिशय तोकडा असल्यामुळे शासनाने ४ एप्रिल रोजी वाढीव ५० हजार रुपये निधी मंजूर केला आहे. यात घरकुलासाठी ३५ हजार तर सौर ऊर्जेसाठी पंधरा हजार रुपये मिळणार आहे. मात्र पहिले मंजूर १ लाख २० हजार म्हणजेच घरकुलधारकांना पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे वाढीव निधी तर लांबच आहे . त्यामुळे घरकुलधारक अडचणीत आले आहे. खरे तर घर बांधायचे असेल तर ५०० चौरस फुट जागा बांधकामासाठी किमान सात ते आठ लाख रुपये लागत आहेत. शासनाचा मात्र केवळ एक लाख २० हजार रुपये निधी मिळत असल्यामुळे घर बांधणे अडचणीचेच आहे. मात्र घरकुलधारक घरकुल मंजूर झाल्यानंतर शासनाचा हा निधी वापस जाऊ नये यासाठी डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा करत आहे व शासनाच्या किरकोळ लाभ घेऊन निवारा उभारत आहे. मात्र शासन गेल्या चार महिन्यापासून दमडीही देत नसल्यामुळे घरकुलधारक अडचणीत आले आहे. घरकुलांसाठी वाढीव निधी ३५ हजार रुपये व सौरऊर्जेसाठी १५ हजार रुपये असे ५० हजार रुपये निधी हा गेल्या आठ ते नऊ महिन्यापासून मंजूर झाला आहे. मात्र त्याची दमडीही मिळत नसल्यामुळे हा निधी मिळणार किंवा नाही, असा प्रश्न घरकुलधारकांच्या मनात उपस्थित झाला आहे.

### जिल्ह्याच्या तीनही मंत्र्यांनी घरकुलतारकांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे



केंद्र व राज्य सरकारकडून राज्य शासनाला १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. यात जिल्ह्यासाठी १ लाख ३२ हजार घरकुलांचे काम सुरू आहे. त्यांचा ही निधी अटकला आहे. ४ ऑक्टोबरपासून तर घरकुलांसाठी एक रुपया ही निधी मिळत नसल्यामुळे घरकुलधारक अडचणीत आले आहे. शासनाने एप्रिल महिन्यात ५० हजार रुपये निधी वाढीव मंजूर केला आहे. मात्र गेल्या आठ ते नऊ महिन्यापासून या निधीची दमडीशी घरकुल तारकांना मिळाली नाही. त्यामुळे घरकुलधारक चिंतेत पडले आहे. तरी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, ज्येष्ठ मंत्री गिरीश महाजन व वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी या प्रकरणात लक्ष घालून शासनाकडून हा निधी त्वरित मंजूर करून घरकुलधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी घरकुलधारकांकडून करण्यात आली आहे.

## तीन वेळा हद्दपारी आदेशाचा भंग; वरणगाव पोलिसांकडून आरोपीस अटक



**भुसावळ** : जळगाव जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या एका इसमाने वारंवार प्रशासनाच्या आदेशाचा भंग केल्याचा प्रकार वरणगाव येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी वरणगाव पोलिसांनी कारवाई करत आरोपीस अटक केली आहे. नीलेश ऊर्फ मुकेश एकनाथ काळे (वय ३८, रा. सिद्धेश्वर नगर, वरणगाव, ता. भुसावळ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. उपविभागीय दंडाधिकारी, भुसावळ यांनी दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश क्रमांक हद्दपार/एसआर/१९/२०२४ अन्वये त्यास दोन वर्षांसाठी जळगाव जिल्ह्यातून हद्दपार केले होते. मात्र, हद्दपारी आदेश असतानाही आरोपीने जळगाव जिल्ह्यात बेकायदेशीरपणे प्रवेश केला. यापूर्वी १० ऑक्टोबर रोजी तो वरणगाव रेल्वे स्टेशनजवळील नूतन मराठा विद्यालयासमोरील रस्त्यावर फिरताना आढळून आला होता.त्यानंतर पुन्हा एकदा दि.१८ रोजी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मन्यारखेळा रस्त्यावर पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले. पोलीस ईश्वर तायडे यांनी आरोपीचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले.आरोपीने हद्दपारी आदेशाचा तिसऱ्यांदा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस नागेंद्र तायडे करीत आहेत. वरणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित कुमार बागुल यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली होती. या पथकात पी.एस.आय. मंगेश बेंडकोळी, ईश्वर तायडे, विजू बाविस्कर, फिरोज पठाण, सुखराम सावकारे व प्रशांत ठाकूर यांचा समावेश होता. पथकाने तत्काळ कारवाई करत आरोपीस अटक केली.

## दीपनगर औष्णिक वीज केंद्रात नियमांची पायमल्ली; मुख्य अभियंत्यांच्या आदेशालाच केराची टोपली?

**भुसावळ** : महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या (महाजेनको) दीपनगर येथील भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात नियम, कायदे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांचा उघडपणे भंग होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुख्य अभियंत्यांनी ६ डिसेंबर २०२५ रोजी ओव्हरलोडिंगविरोधात कडक परिपत्रक काढले असतानाही, केंद्रातील काही अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांच्या संगनमताने राखेची नियमबाह्य वाहतूक सर्रास सुरू आहे, असा गंभीर आरोप बहुजन टायगर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष व युवा स्वाभिमान पार्टीचे जळगाव जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील यांनी केला आहे. यामुळे महाजेनको प्रशासनात खळबळ उडाली आहे. **काय आहे प्रकरण?** महेंद्र पाटील यांनी २५ नोव्हेंबरपासून राखेच्या ओव्हरलोड वाहतुकीबाबत मुख्य अभियंत्यांकडे तक्रारी केल्या होत्या. त्याची दखल घेत मुख्य अभियंत्यांनी रस्ते सुरक्षा, वाहनांचे नुकसान आणि अपघात टाळण्यासाठी स्पष्ट आदेश जारी केले होते. कोणताही राख कंत्राटदार क्षमतेपेक्षा जास्त राख वाहतूक करणार नाही, असे स्पष्ट करत ओव्हरलोडिंग केल्यास मोठा दंड व परवाना रद्द करण्याची तरतूद परिपत्रकात नमूद करण्यात आली होती.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई

### मुक्ताईनगर तहसीलदारांना धमकावणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**मुक्ताईनगर** : तालुक्यातील तापी नदीपात्रालगत अवैध गौणखनिज वाळू वाहतुकीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, शासकीय कारवाईदरम्यान ट्रॅक्टर चालक फरार झाला. तसेच तहसीलदारांना धमकावण्याचा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता व महाराष्ट्र महसूल संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात फिर्यादी म्हणून तहसीलदार मुक्ताईनगर गिरीश रामेश्वर वखारे यांनी तक्रार दिली आहे. १७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते दहा वाजेदरम्यान तापी नदीपात्रालगत शासकीय पथकासह कारवाई करत असताना ट्रॅक्टर क्रमांक एमएच-१९-एएन-०५३५ मधील ट्रॉलीत अवैधरीत्या भरलेली गौणखनिज वाळू वाहून नेली जात असल्याचे आढळून आले. पथकाने सदर ट्रॅक्टर अडवण्याचा प्रयत्न केला असता ट्रॅक्टरचालकाने वाहनासह पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर तहसीलदार वखारे हे पथकासह पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी येत असताना आरोपी मुकेश धनगर यांचा काका, आरोपी संजय तुकाराम धनगर तेथे आला. त्याने स्वतःला तालुक्याच्या अँटी करप्शन संघटनेचा अध्यक्ष असल्याचे सांगत ट्रॅक्टरवर कारवाई करू नये, अशी धमकी दिली आणि मोटारसायकलने घटनास्थळावरून निघून गेला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात वापरण्यात आलेले ट्रॅक्टर आणि मोटारसायकल ही वाहने नमूद करण्यात आली असून, सुमारे ५ हजार ८०० रुपये किमतीची एक ब्रास वाळू चोरीस गेल्याची नोंद आहे.

अवैध गौणखनिज चोरी व शासकीय कामात अडथळा आणण्याचा गंभीर प्रकार असल्याने या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार पोलीस हवालदार राजकुमार चव्हाण करीत आहेत. फरार ट्रॅक्टरचालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय करण्यात आली आहेत.

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com



## थोडक्यात महत्त्वाचे...



**नंदुरबार :** महेंद्रा पब्लिक स्कूलमध्ये अल्पसंख्याक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. त्या वेळी उपस्थित ऋषिकेश खोंडेकर, डॉ. संजय देशपांडे, पिनल शाह आदी.



### एकलव्य विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन

**नंदुरबार :** येथील एकलव्य विद्यालयात शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विविध वैज्ञानिक संकल्पनांचे उपयोजन व समस्या निराकरणाचे गुण वृद्धिंगत करणे हा विज्ञान प्रदर्शनाचा उद्देश होता. प्रदर्शनात प्राथमिक व माध्यमिक गटातून ८५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुनील केशव चौधरी यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले, तसेच विद्यार्थ्यांच्या उपकरणांची पाहणीही केली. विज्ञान शिक्षक मिलिंद वडनगरे, योगेश पाटील, किरण रघुवंशी व जयश्री खैरनार यांनी प्रदर्शनाचे परीक्षण केले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपकरणे सादर केली. यात घरातील लहान समस्यांपासून पर्यावरण प्रदूषण, शेती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध विषयांचा समावेश होता.



### पटेल फार्मसी महाविद्यालयात मानवी हक्कांवर व्याख्यान

**शिरपूर :** एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चमध्ये लायन्स क्लब व लायनीज क्लब यांच्यातर्फे जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त 'मानवी हक्क : काळाची गरज' या विषयावर वक्त्या ॲड. समृद्धी घनश्याम कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, डिप्लोमा विभागप्रमुख डॉ. पी. बी. निनावे, लिनेस क्लबच्या अध्यक्षा डॉ. राखी अग्रवाल, सचिव डॉ. रूपाली अग्रवाल, कोषाध्यक्षा पूजा अग्रवाल आदी उपस्थित होते. ॲड. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्कांचा जागतिक इतिहास, संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारलेली युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ मानवी हक्क, तसेच भारतातील मानवी हक्क आयोगाची रचना व कार्यपद्धती यांची माहिती दिली. युवकांनी मानवी हक्कांची जाणीव ठेवून अन्यायाविरोधात आवाज उठवणे, दुर्बल घटकांना मदत करणे आणि समाजात समता निर्माण करण्यासाठी पुढे येणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. माधवी मोरे यांनी सूत्रसंचालन केले. मीनल पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. पल्लवी भटू माळी यांनी आभार मानले.




### महात्मा फुले विद्यालयात मार्गदर्शनपर कार्यक्रम

**नंदुरबार :** येथील महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूलमध्ये मुलींसाठी आरोग्य, मासिक पाळी व्यवस्थापन, तसेच गुड टच- बॅड टच याविषयी मार्गदर्शनपर कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला डागा हॉस्पिटलच्या डॉ. प्राची डागा यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सतीश मंगळे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुण्या म्हणून प्राची डागा, प्रियदर्शनी प्राथमिक शाळेच्या उपशिक्षिका पूनम पवार उपस्थित होत्या. डॉ. प्राची डागा यांनी मुलींना आरोग्य, गुड टच, बॅड टच, तसेच मासिक पाळी व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. पूनम पवार यांनी मुलींना वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्य यावर मार्गदर्शन केले. मीनल म्हसावदकर यांनी प्रास्ताविक केले. उज्ज्वला पाटील यांनी सूत्रसंचालन केले. चेतना शिंगाणे यांनी आभार मानले.




### देवरे तंत्रनिकेतनमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**धुळे :** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतनमध्ये २०२४-२५ मध्ये प्रत्येक शाखेत व तिन्ही वर्षांच्या अभ्यासक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सन्मान करण्यात आला. उद्योजक विलास देवरे, प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र पाटील, प्राचार्य प्रा. संजय हिरे आदी उपस्थित होते. प्राचार्य प्रा. संजय हिरे यांनी प्रास्ताविकात, कार्यक्रमाची संकल्पना मांडली. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष अभ्यासक्रमातील पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच काही विद्यार्थी दुबई येथे कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नियुक्त होऊन कार्यरत आहेत, त्यांनी कार्यक्रमात ऑनलाइन उपस्थिती दिली, त्यांच्या पालकांचाही सत्कार करण्यात आला. आंतरमहाविद्यालयीन व विभागीय क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांनाही सन्मानित करण्यात आले. प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र पाटील, विलास देवरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. भावना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रशांत चव्हाण यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. राजेंद्र ताथेड, सुनील मुंदडा, प्रा. निशाद पटेल, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. जमील अन्सारी, प्रा.. सुधीर चौधरी, प्रा.. हेमंत पाटील उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात तंत्रनिकेतनने या कार्यक्रमाचे संयोजन केले.




### पाटील महाविद्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन उत्साहात

**नंदुरबार :** येथील जी. टी. पाटील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात १८ डिसेंबरला जागतिक अल्पसंख्याक हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एम. जे. रघुवंशी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या हिंदी अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. शर्मा, प्राचार्य डॉ. रघुवंशी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. एस. पी. पाटील. प्रा. अंकुश रघुवंशी, डॉ. मनोज शेवाळे, प्रा. के. बी. दवे, प्रा. अबूजर पठाण, प्रा. तुषार वाघ उपस्थित होते. डॉ. वसीम मकरानी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. समीरा अहमद यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मोईन शेख यांनी आभार मानले.

# अवैध सावकारीविरोधात मालपूरमध्ये छापासत्र

## दस्तऐवज, सौदा पावत्या, करारपत्रे, आक्षेपार्ह नोंद असलेली डायरी घेतली ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**मालपूर (शिंदखेडा), १९ डिसेंबर**

खासगी सावकाराच्या तगाद्यामुळे राज्यातील पीडित शेतकऱ्याने थेट किडनी विकल्याचे प्रकरण ताजे असताना शिंदखेडा तालुक्यातील मालपूर येथे अवैध सावकारीविरोधात प्राप्त तक्रारीची दखल घेऊन छापा टाकण्यात आला. या वेळी खरेदी खत, सौदा पावत्या, करारपत्रे व आक्षेपार्ह नोंदी असलेली डायरी पथकाने ताब्यात घेतली. यामुळे गावात खळबळ उडाली असून, अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

शिंदखेडा तालुक्यातील मालपूर येथील जगदीश वसंत भावसार यांनी २४ नोव्हेंबर रोजी तालुका निबंधक कार्यालय तथा शिंदखेडा तालुका सावकार निबंधकांकडे अवैध सावकारीविरोधात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेऊन जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी यांच्या मार्गदर्शनात खास पथकाची नियुक्ती करण्यात आली. या पथकाने गुरुवारी (१८ डिसेंबर) दुपारी बाराच्या सुमारास मालपूर येथील भवानीनगर भागातील उत्तम वामन माळी व जिजाबाई माळी यांच्या घरावर छापा टाकला. घराची झाडाझडती घेऊन हाती लागलेले खरेदी खत, सौदा पावत्या, करारपत्रे व आक्षेपार्ह नोंदी असलेली डायरी पथकाने ताब्यात घेतली आहे.



सहाय्यक निबंधक तथा शिंदखेडा तालुका सावकार निबंधक दुधाप्पा शिरगावे, सहकार विभागाचे शशिकांत साळवे, सहकार अधिकारी मनोज माळी, दोंडाईचा येथील पोलीस उपनिरीक्षक अविनाश डोईफोडे, पोलीस शिपाई अहिरे, श्रीमती पूजा, श्रीमती चौरे, वैशाली शिंदे यांचा पथकात समावेश होता.

**आता यापुढे काय?**

या बाबीवर सहाय्यक निबंधक तथा तालुका सावकार निबंधकांच्या कार्यालयात या प्रकरणाची सुनावणी घेण्यात येईल. यात दोन्ही पक्षांना बाजू मांडण्याची संधी देण्यात येणार आहे. सुनावणीनंतर आक्षेपार्ह कागदपत्रे, त्यासोबत सुनावणीअंती अहवाल जिल्हा उपनिबंधकांच्या कार्यालयाकडे पाठविला जाईल. दरम्यान, याची पडताळणी करून ते योग्य निकाल देतील. यात अवैध सावकारी करण्याच्या उद्देशाने कागदपत्रे बनविल्याचे सिद्ध झाल्यास ते खरेदी खत, करारपत्रे रद्द करून मुळ मालकाला जमीन, घर परत करण्याचा अधिकार न्यायालयानंतर जिल्हा उपनिबंधकांना कायदेशीर आहे. यामुळे मालपूर गावातील अवैध खासगी सावकारांचे धाबे दणाणले आहे.

# रात्री सुटणाऱ्या धुळे-पुणेदरम्यान बसचालकांची सलग सेवा नको!

## ड्यूटीदरम्यान विश्रांतीची संधी मिळण्याची मागणी

**नंदुरबार/धुळे :** येथील आगारातून सुटणाऱ्या धुळे- पुणे बसचे चालक- वाहकांना सलग सेवा द्यावी लागत आहे. या ड्यूटीदरम्यान त्यांना विश्रामाची संधी मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे, अशी मागणी होत आहे. धुळे आगारमधून रात्री निघणाऱ्या धुळे- पुणे बस प्रवासादरम्यान चालकाच्या विश्रांतीसाठी कुठेही थांबत नाहीत. त्यामुळे चालक- वाहकांना विश्रांती न घेता धुळ्याहून पुणे बस सलग न्यावी लागते. रात्री सुटणाऱ्या बस चालक- वाहकांना एवढ्या लांब अंतरापर्यंत नेताना काही तास विश्रांती घेता आली पाहिजे. रात्री निघणाऱ्या बस खासगी कंपनीकडून भाडेतत्त्वावर घेतलेल्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, या बसची सेवा देणारे चालकदेखील मनुष्य आहेत. त्यांनाही विश्रांतीची गरज असते. त्यामुळे सलग तीनशे ते चारशे किलोमीटरची बस चालवून करून घेतली जाऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. काही वर्षांपासून धुळे- पुणे बसला क्रु संकल्पना राबवली जात होती. क्रु म्हणजे धुळ्याहून पुण्याकडे जाणाऱ्या बसचे चालक- वाहक हे नगर येथील तारापूर येथे विश्रांती घेत होते. तेथून नवीन चालक - वाहक संबंधित बस पुढे पुण्याला घेऊन जात होते. तारापूरमधून परत धुळ्याचे चालक - वाहक बस घेऊन मार्गस्थ होत असत. त्यामुळे त्यांना विश्रांती घेता यायची; परंतु ही पद्धत बंद करून खासगी कंपनीकडून घेतलेल्या भाड्याच्या बसचे किलोमीटर पूर्ण करण्यासाठी चालक - वाहकांना सलग ड्यूटी करावी लागत असेल, तर ते धोक्याचे आहे. धुळे - पुणे बसला यू-टर्न करण्याची पद्धत बंद करावी आणि जुन्या पद्धतीने बसच्या फेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.



> खासगी कंपनीच्या बस भाडेतत्त्वावर असल्यामुळे त्यांना ४०० किलोमीटर प्रवास करणे बंधनकारक आहे. त्यामुळे चालक- वाहकांकडून सेवा करून घेतली जाते.
>
> **- पंकज देवर**
> **(आगार व्यवस्थापक, धुळे)**

# धुळ्यातील देवरे अभियांत्रिकीत उद्या करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

**धुळे :** येथील बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात रविवारी (२१ डिसेंबर) दोन सत्रांत करिअर मार्गदर्शनपर कार्यक्रम होणार आहे. ज्येष्ठ मार्गदर्शक, प्रवेशप्रक्रिया समुपदेशक व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे निवृत्त प्रा. श्रीकांत कलंत्री मार्गदर्शन करतील. बारावी परीक्षेनंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय व अन्य अभ्यासक्रमांच्या संधी, प्रवेशप्रक्रियेची माहिती, महाविद्यालय व शाखा निवड आदी बाबींवर प्रा. कलंत्री मार्गदर्शन करतील. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी पहिले सत्र सकाळी अकराला होईल व नावनोंदणी सकाळी दहालला सुरू होईल. अभियांत्रिकी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांचे दुसरे सत्र दुपारी दोनला सुरू होईल व नावनोंदणी दुपारी एकला सुरू होईल. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या मोफत सीईटी मॉक टेस्टमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. किरण मोरे व प्रा. रामकृष्ण पाटील करीत आहेत. अधिक माहितीसाठी ९३७०४४११७९/९४०५७९४५५२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ऑडिटोरियममध्ये रविवारी होणाऱ्या करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र पाटील यांनी केले आहे. असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# बालवैज्ञानिकांनी प्रकल्पाचा सिद्धांत आत्मविश्वासाने मांडावा -भावेश सोनवणे

## तळोद्यात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, १९ डिसेंबर**

बालवैज्ञानिकांनी प्रकल्प व त्याचा सिद्धांत आत्मविश्वासाने परीक्षकांसमोर मांडून व्यक्त व्हा. पहिला क्रमांक कोणाचाही येवो, तुम्ही सर्व इतिहास घडविणार आहात. येथून जिल्हा, राज्य, देशपातळीवर प्रयोग जातील व वैज्ञानिक घडतील, असे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी भावेश सोनवणे यांनी केले.

तळोदा तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व देवमोगरा विद्याप्रसारक मंडळ संचलित गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयातर्फे आणि पंचायत समिती शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन शहरातील पितृछाया विज्ञाननगरीत झाले, त्या वेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रदर्शनाचे उद्घाटन देवमोगरा विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष चेतन पवार यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक राजन मोरे, गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, कॉलेज ट्रस्टचे उपाध्यक्ष रोहित माळी, शिक्षणविस्तार अधिकारी वसंत जाधव, आरती शिंपी, देवमोगरा विद्या प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा मगरे, संचालिका मेघा पवार, संस्था समन्वयक निमेश सूर्यवंशी, संचालक महेश मगरे, उमाकांत शेंडे, रामचंद्र राणे उपस्थित होते.

शहरात जिल्ह्यातील पहिल्या तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात ३३, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात २४ वैविध्यपूर्ण प्रकल्पांसह असंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक सहभागी झाले. कार्यक्रमात केंद्रप्रमुख कांतिलाल पाडवी, माजी मुख्याध्यापक अजित टवाळे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नरोत्तम मराठे, उपाध्यक्ष अमरदीप महाजन, सचिव सुनील परदेशी, कोषाध्यक्ष भरत पाटील, हेमलाल मगरे, नीलेश सूर्यवंशी, जितेंद्र माळी, रमाकांत चौधरी, डॉ. दीपक शेंडे, प्रा. डॉ. एस. के. श्रीवास्तव, प्रा. डॉ. एस. पी. वाणी, सचिन पंचभाई, योगेश पवार आदी उपस्थित होते. सुजाता साळवे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक मिलिंद धोदरे यांनी आभार मानले.

# माजी आमदार द. वा. पाटील यांचे शक्तिस्थळ ऊर्जेचे प्रतीक!

## जयंतीनिमित्त आमदार भदाणे, मनोहर भदाणेंच्या उपस्थितीत अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १९ डिसेंबर**

शिंदखेडा व धुळे तालुक्याचे माजी आमदार अण्णासाहेब द. वा. पाटील यांचे स्मृतिस्थळ हे शक्तिस्थळ आहे. या शक्तिस्थळातून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आदी कामांची प्रेरणात्मक ऊर्जा मिळते. त्यांनी गोरगरिबांसह सर्वसामान्य जनतेसाठी कामे केली. रोजगार मिळवून देण्यासाठी आयुष्यभर धडपड केली. शिंदखेड्यासह धुळे तालुक्याच्या विकासासाठी अहोरात्र धडपड केली. त्यांचे व्यक्तिमत्व समर्थकांसह सर्वसामान्य जनतेचे मोठे प्रेरणास्थान आहे, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

तालुक्यातील नगाव येथील गंगामाई व अण्णासाहेब द. वा. पाटील शैक्षणिक संकुलात माजी आमदार द. वा. पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी उपस्थितानी अण्णासाहेबांविषयी विचार मांडून आदरांजली वाहिली. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, माजी सभापती तथा लोकनियुक्त सरपंच ज्ञानज्योती भदाणे, आमदार राम भदाणे, माजी सभापती अनित भदाणे, वैशाली भदाणे, वैष्णवी भदाणे, अथर्व भदाणे, कृष्णा भदाणे, कुबेर भदाणे, माजी सभापती प्रा. अरविंद जाधव, डॉ. रवींद्र निकम, छोटू मासुळे, अशोक सुडके, तावखेड्याचे दिलीप पाटील, भीमराव पाटील, माजी नगरसेविका वंदना भामरे, गोविंद चौधरी, माजी नगरसेवक गोपीचंद पाटील, योगेश पाटील, बापू सिसोदिया, धनूरचे माजी सरपंच अशोक शिंदे, विजू देवरे, सचिन पाटील, जगन्नाथ जाधव, संतोष पाटील, ज्ञानेश्वर महाले आदी उपस्थित होते.




या वेळी मनोहर भदाणे म्हणाले, माजी आमदार अण्णासाहेबांचे कार्य धुळे जिल्ह्यासाठी प्रेरणादायी आहे. शिंदखेड्यात १५ वर्षे, तर धुळे ग्रामीण अर्थात पूर्वाश्रमीच्या कुसुंबा मतदारसंघात पाच वर्षे आमदार होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वातून मोठी कामे उभी राहिली. त्यांनी ग्रामपंचायत सदस्यत्वपासून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांचा आमदारकीपर्यंतचा संघर्ष प्रेरणादायी आहे. ज्ञानज्योती भदाणे म्हणाल्या की, अण्णासाहेबांनी गोरगरिबांसह सर्वसामान्य जनतेसाठी ग्रामीण भागात शाळा- महाविद्यालये काढली. नगाव येथील शैक्षणिक संकुलातून हजारो विद्यार्थी घडत आहेत.

आमदार भदाणे म्हणाले की, माझ्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक जीवनाचे प्रेरणास्रोत अण्णासाहेब आहेत. त्यांच्याकडून राजकीय जीवन जगण्याची कला मिळाली. अण्णासाहेब केवळ व्यक्तीच नव्हे; तर एक शक्तिस्थान होते. त्यांच्या शक्तिस्थळातून विधायक काम करण्याची नवऊर्जा मिळते. पर्यवेक्षक पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

# अतिसूक्ष्म दुर्बिण वापरून ओपन हार्ट सर्जरी टळली

## डॉ. प्रसाद अंधारे यांनी वापरले नवे तंत्रज्ञान



**नंदुरबार :** एनजीओ प्लास्टिक करीत असताना रुग्णाच्या रक्तवाहिनीत साचलेले कॅल्शिअम अतिसूक्ष्म दुर्बिण वापरून काढले. त्यामुळे रुग्णाची ओपन हार्ट सर्जरी टळली. यासाठी येथील डॉ. प्रसाद अंधारे यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला. डॉ. प्रसाद अंधारे यांच्याकडे ६७ वर्षाचे पुरुष रुग्ण हार्ट अटॅक आल्याने दाखल झाले. त्यांचा ईसीजी तपासून अँजिओग्राफी व गरज लागल्यास अँजिओप्लास्टीचा सल्ला दिला; परंतु त्यांची ढसाळती तब्येत पाहता, हायर सेटअपसाठी ते डॉ. प्रसाद अंधारे यांच्या संपर्कात आले. तेथे आल्यावर त्यांची तपासणी करून सर्व पॅरामिटर्स स्टेबल करून अँजिओग्राफी करण्यात आली. मात्र, डॉ. प्रसाद अंधारे यांच्या असे लक्षात आले की, उजव्या बाजूच्या रक्तवाहिनीमध्ये कॅल्शिअम गोळा झाले. अशा वेळी पारंपरिक पद्धतीची अँजिओग्राफी उपयोगाची नसते म्हणून अत्याधुनिक रोटा प्लेशन तंत्राचा उपयोग करण्याचे ठरविण्यात आले. या तंत्रामध्ये दीड एमएमचे अतिसूक्ष्म ड्रिल मशीनद्वारे कॅल्शिअम दूर करण्यात आले. रक्तवाहिनी मोकळी करण्यात आली. त्यामुळे पुढील बायपास शस्त्रक्रिया टळली.

# धुळ्यात राष्ट्रवादी अजित पवार गट सर्व जागा लढविणार

## महापालिका प्रचार समितीप्रमुख माजी आमदार प्रा. शरद पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १९ डिसेंबर**

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट महापालिकेच्या सर्व जागांवर उमेदवार देणार असून, इच्छुकांनी अर्ज पक्ष कार्यालयाकडे सोमवारपर्यंत (२२ डिसेंबर) सादर करावेत, अशी माहिती माजी आमदार तथा पक्षाच्या सुकाणू समितीचे सदस्य व महापालिका प्रचार समितीप्रमुख प्रा. शरद पाटील यांनी दिली.

प्रा. शरद पाटील यांनी सांगितले की, राज्यात महायुतीची सत्ता आहे. या सत्तेत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट सहभागी आहे. राज्यात काही ठिकाणी युती होत असून, काही ठिकाणी मैत्रिपूर्ण लढती होत आहेत. धुळे महापालिकेच्या २०२५ च्या निवडणुकीबाबत अद्याप मित्रपक्षांकडून युती करण्याचा कुठलाही प्रस्ताव आलेला नाही. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटातर्फे सर्वच जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेवरून पक्षाच्या सर्वच जागांवर उमेदवारी अर्ज मागविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच पक्षासाठी माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील यांना धुळे जिल्ह्यासाठी प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सोमवारी (२२ डिसेंबर) दुपारी तीनपासून पक्षाच्या मुलाखतींना सुरुवात होणार आहे. यापूर्वी ज्यांनी उमेदवारीसाठी पक्षाकडे अर्ज सादर केले आहेत, त्यांनी पक्षाकडे नव्याने अर्ज करू नये. धुळे महापालिकेत इच्छुकांनी आपापल्या प्रभागातील नावांसह उमेदवारी अर्ज सुकाणू समिती समन्वयक माजी आमदार फारूक शहा व माजी शहर-जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांच्या आग्रा रोडवरील नेहरूनगरमधील कार्यालयात जमा करावेत, अशी माहिती समन्वय समिती सदस्य व प्रचारप्रमुख प्रा. शरद पाटील यांनी दिली.

# अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

## नंदुरबारमध्ये जिल्हा नियोजन विभागातर्फे परिसंवादासह कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ डिसेंबर**

अल्पसंख्याक विकास विभाग, जिल्हा नियोजन विभाग यांच्यातर्फे आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त जिल्हा नियोजन भवन सभागृहात कार्यक्रम झाला. कार्यक्रमात वक्तृत्व, भित्तिपत्र व निबंधलेखन या स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरणासह परिसंवाद घेण्यात आला.

अतिरिक्त जिल्हाधिकारी धनंजय गोगटे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त पोलीस उपअधीक्षक संजय महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे, मौलाना आझाद महामंडळाचे विजय सैंदाणे व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी एजाज बागवान, मौलाना जकेरिया, अमिन कुरैशी उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे यांनी प्रास्ताविकात, आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्त्व व त्यानिमित्त आयोजित स्पर्धांची माहिती दिली. काजी निदा फातेमा, लायबा सय्यद, फहमिना शाह, अतिफा मोमीन, आमेना सय्यद, कादीर अन्सारी, दानीश कुरैशी यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी अल्पसंख्याक विभागाच्या योजनांची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे तसेच मौलाना आझाद आर्थिक महामंडळाचे विजय सैंदाणे यांनी दिली. अतिरिक्त जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी अल्पसंख्याक विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

या वेळी अल्पसंख्याक विकासाच्या विविध विभागांच्या योजनांची समग्र माहिती दर्शविणाऱ्या फलकाचे अनावरण व प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व, भित्तिपत्र व निबंध स्पर्धांमध्ये तालुकास्तरावर प्रथम आलेल्या सहावी ते आठवी नववी ते बारावी या गटातील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुकास्तरावर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्यामुळे प्राचार्य फय्याज पठाण, हरीश बोरसे, रफिक जहांगीरदार, जव्वाद सय्यद, सत्यजित नाईक, कालिदास पाठक, इसरार सय्यद, मुदब्बीर पठाण यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणात यशस्वी कामगिरी केल्यामुळे प्रशिक्षणार्थी अशफाक इनामदार, जव्वाद कुरैशी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात दोन्ही डोळ्यांनी दिव्यांग असलेला व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतलेल्या नंदुरबारच्या रहेबर शाळेचा विद्यार्थी मोहम्मद दानिश कुरैशी याचा अल्पसंख्याक अधिकारी व कर्मचारी संघटनेमार्फत अकराशे रुपये रोख देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षण विभागाचे डॉ. युनूस पठाण यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नियोजन विभागाचे सहाय्यक नियोजन अधिकारी मनीष सूर्यवंशी, एल. के. कोकणी, संतोष बोदडे यांनी सहकार्य केले.



### असे आहेत तालुकानिहाय यशस्वी स्पर्धक

निबंधलेखन स्पर्धा : नंदुरबार : सादिया हफिज खान, राहुल प्रकाश मराठे, नवापूर : समिरा खाटीक, आयेशा परवेज लाखाणी, शहादा : हुमेरा बेलदार, राबिया अन्सारी, तळोदा : अथर्व सोनार, फहेमिना शाह, अक्कलकुवा : उमूर मोहम्मद, जिया पिंजारी, धडगाव : रोषण वळवी, रंजिना पावरा. वक्तृत्व स्पर्धा : नंदुरबार : अब्दुल कादिर अन्सारी, काजी निदा फातेमा, नवापूर : अक्सा बेलदार, आमेना सय्यद, शहादा : युसैरा तेली, लायबा सय्यद, तळोदा :साहिल सोनवणे, प्रीत सोनगडवाला, अक्कलकुवा : उम्मे हानी काजी, अतिफा मोमीन, धडगाव : ऐश्वर्या पावरा, प्रियंका पावरा. भित्तीपत्रक स्पर्धा : नंदुरबार : सारा खान, जोहरीन पठाण, नवापूर : हसैन शेख, सादिया शेख, शहादा : हन्जला बेलदार, अक्सा मनियार, तळोदा : शिजा मनिया, मिकाईल शेख, अक्कलकुवा : बुशरा कुरैशी, जोबिया फारुकी, धडगाव : दिव्या पावरा, विद्या पावरा.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### चाळीसगावात तरुणावर गोळीबार

**चाळीसगाव :** येथील रेल्वे स्टेशन परिसरात तरुणावर दोन संशयितांनी गोळीबार केला. तरुणाच्या मांडीला गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला. संशयित घटनेनंतर पसार झाले. जुन्या वादाच्या कारणातून घटनेत स्वरुप देण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली. संशयितांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. मागील वादाच्या कारणावरून पोलिसात तक्रार केल्याचा राग मनात ठेवत गुरुवारी रात्री रोहिदास कोळी (वय ३०) तरुण रेल्वे स्थानक परिसरात बसलेला असतांना याठिकाणी दीपक मसाळे व अन्य एक असे दोघे याठिकाणी आले. आज तू सापडला म्हणत त्याच्यावर बंदुकीने गोळीबार केला. यावेळी रोहिदास पळत सुटल्याने गोळी त्याच्या मांडीला लागून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव सुरू झाला. घटना घडताच संशयितांनी पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, पोलिसांकडून परिसरात संपूर्ण सिसिटीव्ही पाहणी केली जात आहे. आरोपींच्या शोधात पोलिसांचे पथक रवाना झाले आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून रात्री कारण नसतांना फिरणाऱ्या टवाळांवर कडक कारवाई करण्याची मागणीने जोर धरला.

### पाचोऱ्यातील आजचा आठवडे बाजार रद्द

**पाचोरा :** पाचोरा नगरपरिषदेअंतर्गत प्रभाग ११ अ व १२ ब साठी २० डिसेंबर रोजी निवडणूक होईल. मतदान केंद्राच्या परिसरात आठवडे बाजार भरत असल्याने हातगाड्या, किरकोळ विक्रेते व ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. यामुळे शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी भरणारा आठवडे बाजार जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केला आहे. हा आठवडे बाजार बंद राहील. याची भाजीपाला विक्रेते, व्यापारी व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पाचोरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे यांनी केले आहे.

### पाचोरा नगरपरिषद निवडणुकीत फेरीनिहाय मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**पाचोरा :** पाचोरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्यानंतर आता २१ डिसेंबर रोजी मतमोजणीची प्रक्रिया होईल. मतमोजणीदरम्यान कोणत्याही प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी प्रशासनाने फेरीनिहाय मतमोजणी तक्ता जाहीर केला आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभागाची मतमोजणी ठरावीक फेरीत केली जाणार आहे. नगरपरिषद निवडणुकीसाठी एकूण ८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होईल. प्रभागांचे गट करून १ ते १२ टेबलांवर मतपत्रिकांची मोजणी करण्यात येणार आहे. प्रत्येक फेरीत ठरावीक प्रभागांचीच मतमोजणी होणार असल्याने निकाल प्रक्रियेत पारदर्शकता राखली जाणार आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या ते चौथ्या फेरीत प्रभाग क्रमांक १ ते ८, पाचव्या व सहाव्या फेरीत प्रभाग क्रमांक ९ ते १२, तर सातव्या फेरीत केवळ प्रभाग ११ व १२ च्या सदस्य पदाचीच मतमोजणी होणार आहे. त्यामुळे या फेरीत नगराध्यक्ष पदाची मतमोजणी होणार नाही, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे.

### मतमोजणीस्थळी जमावबंदी आदेश लागू

मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडावी यासाठी जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये मतमोजणी कालावधीत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे, अशी माहिती पाचोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांनी दिली. ही मतमोजणी नगरपरिषद पाचोरा अंतर्गत भडगाव रोडवरील स्व.आर.ओ. तात्या पाटील व्यापारी भवनात पार पडणार आहे. पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव जमविणे किंवा एकत्रितपणे वावरणे यावर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश सर्व राजकीय पक्षांचे उमेदवार, अपक्ष उमेदवार, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यावर लागू राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

### शेंदुर्णीत गरुड स्मृतिप्रित्यर्थ शिबिरात ४२ जणांचे रक्तदान

**शेंदुर्णी (ता. जामनेर) :** शेंदुर्णी येथे आचार्य गजाननराव गरुड स्मृतिप्रित्यर्थ आयोजित कार्यक्रमांचे उद्घाटन १९ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराच्या माध्यमातून झाले. अध्यक्षस्थानी शेंदुर्णी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजय गरुड होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शासकीय वैद्यकीय रुग्णालय जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. कविता पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. धर्मेंद्र पाटील, डॉ .राजीव सोनवणे, डॉ. पाटे, श्रुती मोहोळ, शिक्षण संस्थेचे सचिव सागरमल जैन, भाजपचे ज्येष्ठ नेते गोविंद अग्रवाल, उत्तम थोरात, प्रा.सुनील गरुड, पंचायत समितीचे माजी सदस्य सुधाकर बारी, शांताराम गुजर, अमृत खलसे, गोपाळ गरुड, डॉ. किरण सूर्यवंशी, शेंदुर्णी डॉक्टर असोसिएशन अध्यक्ष डॉ. अजय सुर्वे, प्राचार्य डॉ. संजय भोळे आदी मान्यवर उपस्थित होते. शेंदुर्णी येथील आचार्य गजाननराव गरुड पतसंस्थेच्या सभागृहात रक्तदान शिबिर दरम्यान रक्त संकलित केले. यात सुमारे ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. डॉ. राजीव सोनवणे, सागरमल जैन, गोविंद अग्रवाल, संजय गरुड यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भूषण पाटील यांनी केले. आभार प्रा. डॉ. योगिता चौधरी यांनी मानले. शिबिर यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना एकक गरुड महाविद्यालय व आचार्य गरुड सहकारी पतसंस्था यांनी परिश्रम घेतले. आजपासून सुरू झालेल्या आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड स्मृति सोहळ्यासाठी विविध शाळांमधील विद्यार्थी शिक्षक व गावातील नागरिक उपस्थित होते. २० रोजी सोहळा तसेच सायंकाळी कीर्तन, संगीत रजनी आणि पुढे तीन दिवस व्याख्यानमाला पार पडणार आहे.



# पाचोरा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात १९० बालवैज्ञानिकांचा सहभाग

**पाचोरा :** येथील पंचायत समिती शिक्षण विभाग व वसंतराव नाईक प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा गाळण बु यांच्या संयुक्त विद्यमाने गाळण येथे तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन उत्साहात झाले. यात ११० बालवैज्ञानिकांनी सहभाग घेतला.

प्रदर्शनाचे उदघाटन आमदार किशोर पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी आश्रमशाळेचे अध्यक्ष बाबुलाल हरी राठोड होते. प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार विजय बनसोडे, गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, गटशिक्षणाधिकारी विजय पवार, पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड, मुख्याध्यापक रमेश पाटील, मुख्याध्यापिका कल्पना राठोड, शिक्षक सेना कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, विज्ञान शिक्षक रवींद्र चौधरी यांसह सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते. सुमारे ११० बालवैज्ञानिकांनी आपले साहित्य या ठिकाणी मांडले.

प्रास्ताविक गट शिक्षणाधिकारी विजय पवार यांनी केले. सूत्रसंचालन वाल्मिक पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख अनिल पाटील यांनी केले.तहसीलदार विजय बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आमदार किशोर पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत जिज्ञासावृत्तीला विज्ञान प्रदर्शनामुळे चालना मिळत असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी केले.

परीक्षक म्हणून पंकज देठे, रवींद्र सूर्यवंशी, अल्पा सयानी, रवींद्र चौधरी, उल्हास पाटील यांनी काम पाहिले. विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सजावटीसाठी कलाशिक्षक महेंद्र खरे, रवींद्र पाटील, महेश पाटील, व्ही. डी. पाटील, रोहिणी कोळी, पूनम लांडगे, तुषार पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच आश्रमशाळेचे माध्यमिक उच्च माध्यमिक प्राथमिक व वस्तीगृह कर्मचारी शिक्षक वृंद शिक्षिका, गटसाधन केंद्राचे कर्मचारी व विशेष शिक्षक यांचे सहकार्य लाभले. विज्ञान प्रदर्शनासाठी शिक्षकेतर कर्मचारी वसतिगृह कर्मचारी पंढरी राठोड, राजेंद्र पाटील, गिरधर गायकवाड, ईश्वर सावंत , लहू पाटील, दादाभाऊ सावंत यांनी विद्यार्थ्यांच्या व्यवस्थेसाठी परिश्रम घेतले.



### विज्ञान व शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे निकाल असे

**दिव्यांग गट-** प्रथम क्रमांक सिद्धेश किशोर राऊळ, द्वितीय क्रमांक जानवी ईश्वर सातपुते. **उच्च प्राथमिक गट-** प्रथम कृष्णा गजानन पाटील, द्वितीय आकांक्षा अमृत गायकवाड, तृतीय दर्शन प्रेमराज रावळे. **माध्यमिक उच्च माध्यमिक गट-** प्रथम अनुज अजय बडगुजर, द्वितीय विजयदीप निवृत्ती शिंदे, तृतीय समर्थ काशिनाथ चौधरी. **प्राथमिक शिक्षक शैक्षणिक साहित्य-** प्रथम भूषण कुमार देविदास जगताप, द्वितीय विद्या सचिन जोशी, तृतीय भाग्यश्री अशोक अहिरराव. **माध्यमिक शिक्षक शैक्षणिक साहित्य-** प्रथम रवींद्र हिलाल सूर्यवंशी, द्वितीय प्रेमसिंग आनंदा पाटील, तृतीय उल्हास श्रीराम पाटील.

# चोपडा येथे ३, ४ जानेवारी रोजी संगीत महोत्सव, नाट्य गीतगायन स्पर्धा

**चोपडा :** येथील श्री संत गजानन बहुउद्देशीय संस्थेच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त सहावी राज्यस्तरीय खुली नाट्यगीत गायन स्पर्धा तसेच प्रथमच संगीत महोत्सव ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी चोपडा येथील शरश्चंद्रिका सुरेश पाटील नाट्यगृहात आयोजित केला आहे.

३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शिवरंजनी महोत्सव-२०२६ मध्ये मेघना सरदार, पुणे या धृपद गायन सादर करतील व त्यानंतर विनायक हेगडे मुत्तमुर्डू, कर्नाटक यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम होईल. त्यांना वरद सोहनी, मुंबई हार्मोनियमसाठी , रामेश्वर घायल, मुंबई पखवाजसाठी व नरेंद्र भावे, चोपडा तबलासाथ संगत करतील.

४ जानेवारी २०२६ रविवारी राज्यस्तरीय खुल्या नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची पारितोषिके अनुक्रमे प्रथम रु. १५,०००, द्वितीय ११,००० तृतीय रु.७,००० स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र याप्रमाणे असून उर्वरित स्पर्धकातून उत्तेजनार्थ प्रत्येकी १००० अशी तीन बक्षीस आणि स्मृतीचिन्ह पारितोषिकेही यावेळेस देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील नाट्यगीत गायन स्पर्धेत ही मानाची स्पर्धा असून यात महाराष्ट्रातून शास्त्रीय उपशास्त्रीय गायनाचे विद्यार्थी व साधक सहभागी होत असतात. या स्पर्धेचे परीक्षण प्रख्यात संगीत गायक पं. विश्वनाथ दाशरथे, संभाजीनगर आणि मुकुंद मराठे, ठाणे हे करणार आहेत. स्पर्धा पूर्णतः खुली असून वयाची कोणतीही अट नाही. प्रवेश शुल्क. ५०० रुपये आहे. यात स्पर्धेसाठी प्रवेश नोंदणी ९२८४५३१३४३ यावरून स्विकारण्यात येईल. स्पर्धा दोन फेरीत होईल. प्रथम फेरीनंतर कोणतेही एंट्री स्वीकारली जाणार नाही. प्रत्येक स्पर्धकास सादरीकरणासाठी पाच मिनिटे वेळ देण्यात येईल. स्पर्धकाने प्रथम व द्वितीय फेरीसाठी वेगवेगळे नाट्यगीत सादर करणे आवश्यक राहील. स्पर्धेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. एक दिवस आधी येणाऱ्या स्पर्धकांची निवासाची व भोजनाची व्यवस्था संस्थेमार्फत निशुल्क करण्यात येईल. यासंदर्भात आयोजकांना पूर्वकल्पना देणे आवश्यक राहील. मान्यताप्राप्त व व्यावसायिक कलाकारांना स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. संगीत साथीदार सोबत आणावेत, विनंती केल्यास संस्थेमार्फत साथीदार उपलब्ध करून देण्यात येतील. परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील. स्पर्धेचे आयोजन, नियम व अटी यामध्ये बदल करण्याचे अधिकार आयोजक समितीकडे राखून ठेवले आहेत. स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी होण्याचे तसेच संगीत महोत्सवासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मनोज चित्रकथी व सचिव विजय पालीवाल यांनी केले आहे.

# शेंदुर्णीची विद्यार्थिनी गौरी आगे निबंध स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम

**शेंदुर्णी (ता. जामनेर) :** जळगाव येथील बन्सल क्लासेसच्या माध्यमातून जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन वर्ल्डस ऑफ विस्डमच्या अनुषंगाने करण्यात आले. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून ३३० शाळांचा सहभाग १२०० विद्यार्थ्यांसह नोंदविण्यात आला होता. त्यापैकी ७५० विद्यार्थ्यांनी या निबंध स्पर्धा परीक्षेत सहभाग घेतला. धी. शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन को-ऑप सोसायटी संचलित ग.र. गरुड माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातूनदेखील सहभागी विद्यार्थी गौरी संजय आगे, प्रतीक चौधरी, श्रुती मानकर, मानसी पाटील, शंतनू पाटील, रेणुका पाटील, जान्हवी पाटील या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून या परीक्षेत सहभाग घेतला. त्यापैकी जिल्ह्यातून गरुड विद्यालयाची विद्यार्थिनी गौरी संजय आगे हिने प्रथम क्रमांक मिळवला. या बक्षिसाचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र जळगाव येथे झालेल्या या अलौकिक अशा भव्य कौतुक सोहळ्याच्या आयोजन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष काशिनाथ पलोड विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोनवणे तसेच प्रा.समीर मोहिते व यांच्यासमवेत बन्सल क्लासचे संचालक/अध्यक्ष हेमंत अगिवाल यांच्या उपस्थितीत या विद्यार्थिनीला पुरस्कृत करून सन्मानित करण्यात आले.



याबद्दल विद्यालयाच्या वतीने विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आर.एस. चौधरी, उपप्राचार्य बी. एम. कुमावत, पर्यवेक्षक विनोद पाटील या मान्यवरांसह शिक्षक-शिक्षकेतरांकडून या विद्यार्थिनीचे व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे संस्थेचे चेअरमन संजयराव गरुड, व्हाइस चेअरमन भीमराव शेळके, सचिव सागरमल जैन, सहसचिव, यु. यु. पाटील, कार्यालय सचिव दीपक गरुड, वसतिगृह सचिव गो. गो. सूर्यवंशी या मान्यवरांनी विद्यार्थिनीचे कौतुक केले. या विद्यार्थिनीच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागाचे मार्गदर्शक शिक्षक व्ही. एस. पाटील, एल. पी. मोहने, अमोल पाटील यांनी या विद्यार्थिनीला मार्गदर्शन केले. यानिमित्ताने विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक डी. आर. पाटील, पी.पी. पाटील, राहुल गरुड, डी. बी. पाटील, पी. जी. पाटील, बी. टी. बोरसे, आर. आर. सोनवणे, एस. बी. पाटील, आर. के. गरुड तसेच ज्येष्ठ शिक्षिका पी. एस. पाटील, एस. व्ही. शिंदे, आर. जी. कासार इत्यादीसह शिक्षक शिक्षकेतर उपस्थित होते.

### कोळगाव कॉलेजमध्ये रेड रिबन क्लब स्थापन

**कोळगाव (ता. भडगाव) :** कर्मवीर हरी रावजी पाटील किसान संस्था संचलित कला व विज्ञान महाविद्यालय कोळगाव व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत ग्रामीण रुग्णालय भडगाव यांच्यातर्फे एड्स जनजागृती कार्यक्रम पार पडला. 'एकजुटीने एकत्र येऊन एचआयव्ही एड्सला लढा देऊ व नव परिवर्तन घडवू' हे ब्रीदवाक्य साध्य करण्यासाठी एड्स जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य सुरेश आनंदा कोळी होते. तसेच ग्रामीण रुग्णाल याचे समुपदेशक नामदेव पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स या आजार व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे रेड रिबीनक्लब समन्वयक प्रा. प्रशांत पाटील व विद्यार्थी यांनी पोस्टर प्रेझेंटेशन करून एड्स या आजाराविषयी जनजागृती रॅली काढली. ग्रामीण रुग्णालय भडगाव येथील प्रयोगशाळा तंत्रज्ञ रुपाली पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डी.पी भोसले यांनी, आभार पी.डी.पाटील यांनी मानले. कार्यक्रमप्रसंगी प्रा. मनोज पवार, प्रा. संदीप बाविस्कर, प्रा. राहुल सोनवणे, प्रा. एम. टी. पाटील, प्रा. सुनीता पाटील, प्रा. मनीषा बोरसे, मनोज पाटील, श्रीकांत हिरे, तेजस पवार, चेतन पाटील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संत गाडगे महाराज विद्यालयात आयसीटी, संगणक प्रदर्शन

**भुसावळ :** येथील श्री संत गाडगे महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात १९ डिसेंबर रोजी आयसीटी व संगणक प्रदर्शन घेण्यात आले. यात विविध इयत्तातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला व आयसीटी व संगणकाधारित आपापले प्रकल्प सादर केले. प्रदर्शनातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व तांत्रिक ज्ञान स्पष्टपणे दिसून आले. हे प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य के. बी. सक्सेना यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. तसेच शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा सकारात्मक व सर्जनशील वापर करण्यासाठी प्रेरणा दिली. उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना आयसीटी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमास विद्यालयाचे पर्यवेक्षक शहा यांचेही मार्गदर्शन लाभले. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनामध्ये आयसीटी शिक्षिका प्रांजली माळी तसेच संगणक शिक्षिका पूजा सोनार यांचे विशेष योगदान राहिले. शिक्षकवृंद व उपस्थित मान्यवरांनी या शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक केले.

# पारोळा येथे संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त शोभायात्रा, दुचाकी रॅली

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १९ डिसेंबर**

थोर संत ग्रंथकार श्री संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. तेली समाज शहर पंचमंडळ वतीने नवयुवक युवक मंडळावतीने शहरातून शोभायात्रा व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या दोघांनी शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

सकाळी हत्ती गल्लीमधील जुन्या टेलिफोन श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे गोकुळ चौधरी यांच्या हस्ते सपत्नीक अभिषेक पूजन करण्यात आले. तेथून शहराच्या मुख्य मार्गावरून तेली समाज बांधव तरुणांकडून मोटारसायकल रॅली काढून श्री संताजींचा जयघोष करण्यात आला. सायंकाळी या ठिकाणावरून सजवलेल्या घोड्यांच्या बगीतून संताजी महाराजांची प्रतिमा ठेवून विद्युत रोषणाईत आझाद चौक, झपाट भवानी चौक, राम मंदिर चौक, न्हावी गल्ली, बहिरम गल्ली आदी परिसरातून शेकडो समाज बांधव भगिनी यांच्या उपस्थितीत सवाद्य व विद्युत रोशनई युक्त शोभायात्राही काढण्यात आली.



यावेळी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित गीतरचना गायन करण्यात आले.

आठ वाजेच्या सुमारास आझाद चौक येथे श्री संताजी जगनाडे महाराज पुतळ्याचे रथयात्रेचे आमदार अमोल पाटील यांच्या हस्ते पूजन व आरती करण्यात आली. आमदार अमोल पाटील यांचा तेली समाज पंचमंडळ वतीने सत्कार करण्यात आला. या शोभायात्रेत माजी नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील माजी नगराध्यक्ष गोविंद शिरोडे माजी नगरसेवक रोहन मोरे, शिवसेना शहरप्रमुख अमृत चौधरीसह पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेऊन श्री संताजी जगनाडे महाराजांना अभिवादन केले. या दिवसभराचा कार्यक्रमासाठी पंचम मंडळाचे अध्यक्ष कैलास चौधरी, पंच विश्वास चौधरी, दिलीप चौधरी साहेबराव चौधरी, किशोर चौधरी, मनोज चौधरी नवयुवक मंडळाचे पदाधिकारी उत्सव समितीचे पदाधिकारी इतर समाज बांधवांनी परिश्रमासह सहकार्य केले. यावेळी असंख्य समाज बांधव भगिनी उपस्थित होते.


**जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव**
विकास
पोस्ट बॉक्स नं.32, शिवाजी नगर रोड, जळगांव-425 001
फोन नं. 0257-2226645-48; फैक्स नं. 0257-2225611

**टेंडर नोटीस**

जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचा तपशील |
|---|---|
| 1. | हाय एनर्जी शक्ती, बफेलो गोल्ड आणि मातृपोषण पशुखाद्य निर्मिती करण्याकरीता लागणारा कच्चा माल स्वरुपात विशिष्ट घटक खरेदी (सुधारीत जाहीरात) |
| 2. | चाळीसगांव चीलींग सेंटर करीता सिमेंट खरेदी |
| 3. | चाळीसगांव चिलींग सेंटर करीता मुरुम, रेती व खडी खरेदी |
| 4. | चाळीसगांव चिलींग सेंटर करीता मुरुम, रेती व खडी खरेदी |
| 5. | चाळीसगांव चिलींग सेंटर करीता लोखंडी आसारी खरेदी |
| 6. | स्क्रैप मटेरीअल विक्री |
| 7. | 1 केएल चेस्कीड माऊन्टेड युनिट पाश्चराईजर व होमोजनायजर खरेदी |

सदर निविदेतील कामाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर पाहावयास मिळतील

अ.क्रं. 01 च्या निविदा दि. 27/12/2025 रोजी संध्या 1.00 वाजेपर्यंत संघाच्या vikas@vikas.coop ई मेल आयडी वर अनामत रक्कमेच्या तपशीलासह पाठवावे व अ.क्रं. 02 ते 07 च्या निविदा दि. 26/12/2025 रोजी संध्या 5.00 वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे. सदरच्या जाहीराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल.

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार संघाने राखुन ठेवलेला आहे.

कार्यकारी संचालक



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 105 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0746 TM2 | 3000063823 | WORK OF PERIODIC CLEANING AND REPLACEMENT OF NDCT NOZZLE ON AS AND WHEN REQUIRED BASIS AT U#5, 500MW TPS KHAPERKHEDA. | 3.21 |
| TN0753 BM1 Refloated | 3000063893 | DESIGN, MANUFACTURING, SUPPLY, REPLACEMENT AND FITMENT OF SEALS FOR SADC DAMPER AND SERVICING OF SADC DAMPERS FOR UNIT NO. 1 AOH. | 11.27 |
| TN0758 MS | 3000063959 | WORK OF UPGRADATION OF EXISTING 60MT WEIGHT TECH MAKE, AT MAJOR STORES, TPS KHAPERKHEDA. | 37.86 |
| TN0759 BM1 | 3000063976 | SUPPLY OF CARTRIDGE FOR LUBRICATING OIL PUMP FOR COAL MILLS IN UNIT 3 & 4 AT KPKD, TPS. | 34.95 |
| TN0760 AHP2 Refloated | 3000063953 | PROCUREMENT OF SPARES OF AIR COMPRESSORS THROUGH OPEN TENDER FOR KHAPERKHEDA TPS. | 36.78 |
| TN0761 TM1 Refloated | 3000064052 | WORK OF APPLICATION OF SPRAY THERMAL INSULATION TO TG SET, VALVES & PIPELINES DURING CAPITAL OVERHAUL OF UNIT NO. 1 & 4 ALONG WITH SUPPLY OF MATERIAL. | 27.66 |
| TN0762 CHP2 | 3000064020 | PROPOSAL FOR THE PROCUREMENT OF LIGHTING MATERIAL SPARES FOR CONVENTIONAL LAMP (HPSV) FOR CHP-II, KHAPERKHEDA TPS | 4.63 |
| TN0763 BM1 Refloated | 3000064030 | PROCUREMENT OF AIR RESTRICTION PLATE SEGMENTS FOR XRP 803 ½ HP & XRP 883 COAL MILLS OF UNIT NO 1 TO 4. | 3.38 |
| TN0764 TM1 Refloated | 3000064054 | PROCUREMENT OF SPARES OF TG SERVOMOTOR FOR UNIT 1 & 2 KHAPERKHEDA TPS. | 15.51 |
| TN0765 AHP1 | 3000064064 | STRENGTHENING, REPAIRING AND RESTORATION OF EVACUATION SYSTEM OF BOTTOM ASH DURING UNIT 4 COH FOR AHP-1. | 16.90 |
| TN0766 TM1 | 3000064065 | PROCUREMENT OF BREECH NUT FOR TG SET COH OF UNIT 1. | 21.60 |
| TN0768 CS | 3000064072 | PROCUREMENT OF VARIOUS RUBBER ITEMS AND CONSUMABLES. | 2.20 |
| TN0769 TM1 | 3000064073 | PROCUREMENT OF SPARES FOR CIRCULATING WATER PUMPS AT KHAPERKHEDA TPS 210 MW. | 52.41 |
| TN0770 TM1 | 3000064079 | PROCUREMENT OF TURNING GEAR CLUTCH AND HPT ASSEMBLY FIXTURE. | 7.60 |
| TN0772 TM1 | 3000064083 | PROCUREMENT OF I-SEAL RING AND HOLDING RING FOR TG SET COH KHAPERKHEDA TPS UNIT 1 TO 4. | 22.87 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda


# आचार्य गजाननराव गरुड हे सर्वसामान्यांचे कैवारी



**आचार्य गजाननराव गरुड हे सर्वसामान्यांचे कैवारी होते. आज ४१ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा लेख.**

आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९२९ रोजी सहकार महर्षी अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड व भागिरथीबाई रघुनाथराव गरुड यांच्या उदरी शेंदुर्णीसारख्या इतिहास प्रसिद्ध प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या गावात झाला. हे गाव आजही प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी मोठे योगदान देऊनप्रसंगी तुरुंगवासही भोगला. ते १२ वर्ष जळगाव डिस्ट्रीक्ट लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्याची साक्ष म्हणजे आजची जळगाव जिल्हा परिषदेची जुनी भव्य इमारत होय. शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांनी सहकारी संस्थांची निर्मिती केली. त्यामुळे त्यांना सहकार महर्षी म्हणून ओळखले जाते. त्यांच्या पत्नी कै. भागिरथीबाई गरुड यांनीदेखील समाजसेवेचे कंकण बांधून समाज उद्धार केला. राज्यातील पहिल्या महिला सरपंच म्हणून त्या महाराष्ट्राला परिचित आहेत. समाजसेवा व राष्ट्रभक्ती रोमारामात भिन्नलेल्या वंदनीय माता-पित्याचे बापूसाहेब गजाननराव गरुड हे थोर सुपुत्र होते.

शिक्षणाशिवाय व्यक्ती, समाज व राष्ट्र याचा विकास होऊ शकत नाही हे ओळखून त्यांनी सर्व गोरगरीब दीन-दलित व दुर्गम भागातील समाजाच्या मुलामुलींच्या शैक्षणिक उद्धारासाठी कार्य केले आहे. १९५७ मध्ये शेंदुर्णी शिक्षण संस्थेचे नेतृत्व आचार्य बापूसाहेब गरुड यांच्याकडे आले आणि शिक्षणाची ही गंगोत्री त्यांनी खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवली. आज याच शिक्षण संस्थेचे जळगाव जिल्ह्यात मोठे जाळे पसरले आहे. केजी ते पीजी असे शिक्षण देणारी शेंदुर्णी शिक्षण संस्था ही खानदेशातील रयत शिक्षण संस्था म्हणून ओळखली जाते. जामनेर तालुक्यात ७, पाचोरा तालुक्यात ४, भडगाव तालुक्यात १, चोपडा तालुक्यात २ अशा १४ माध्यमिक शाळा सुरू केल्या. याबरोबरच गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी १५ वसतिगृहे, बालक मंदिरे, ५ स्वस्त धान्य दुकान, शेंदुर्णी येथे महाविद्यालयीन शैक्षणिक सुविधा निर्माण व्हावी म्हणून एक कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तीन कनिष्ठ महाविद्यालय, एक किमान कौशल्यावर आधारित कनिष्ठ महाविद्यालय,होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज काढले. या शिक्षण संस्थेमध्ये आज सुमारे ३० हजार विद्यार्थी आपले उज्वल भविष्य घडवित आहेत. उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचादेखील ते लाभ घेत आहेत. या संस्थेच्या कार्यालयामध्ये संचालक मंडळाबरोबर सातशेवर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आज कार्यरत आहेत. या संस्थेची वैशिष्ट्य म्हणजे देशभक्तीच्या योगदानातून उदयास आलेल्या या संस्थेचा कारभार स्वातंत्र्य चळवळीचा आदर्श पुढे ठेवून धर्मनिरपेक्ष व सामाजिक समतेच्या विचाराने संस्था आज कार्यरत आहे. त्यामुळे संस्थेत सर्व संचालक मंडळ व कर्मचारी समन्वयाने कार्यरत आहेत. अशा या संस्थेची धुरा आज पावतो एक सहकार महर्षी आप्पासाहेब गरुड, इंदरचंद ललवाणी ठाणसिंग नारायण पाटील, शांतीलाल जैन, अण्णासाहेब भास्करराव गरुड या धुरंधरांनी भक्कमपणे सांभाळली आहे. आज संस्थेचे विद्यमान चेअरमन संजय भास्करराव गरुड हे संपूर्ण संस्थेचा कारभर पाहत आहेत.

१९५७ मध्ये जामनेर तालुक्यात आमदार म्हणून आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड हे भरघोस मतांनी निवडून आले होते. १९६० हा काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनाचा होता. आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड हे १९५७ ते १९६२ पर्यंत विधानसभेचे सदस्य ते होते.

आचार्य बापूसाहेब गरुड हे १९७८ मध्ये अपक्ष म्हणून निवडून आले व २० मार्च १९७८ रोजी महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. बापूसाहेब यांना १४ भाषा अवगत होत्या. जिल्हा परिषद सदस्य ते महाराष्ट्र राज्याच्या विधान सभेचे उपाध्यक्ष म्हणून कार्य करत असताना त्यांनी सर्वसामान्यांसाठी अत्यंत उल्लेखनीय असे कार्य केलेले आहे.

पूर्वी महाराष्ट्राबाहेरील राज्यातून बियाणे आणावे लागत होते म्हणून त्यासाठी त्यांनी संकरित कापूस वगैरे या पिकासाठी बियाणांचे प्लान्ट घेऊन शेंदुर्णीसारख्या ठिकाणी तज्ज्ञ मार्गदर्शन बोलावून परिसरातील शेतकऱ्यांना नवीन शेती प्रयोग दाखवण्याचा प्रयत्न केला होता. असे महान कार्य करणारे आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड यांची प्राणज्योत २० डिसेंबर १९८४ रोजी मालवली. अशा या बहुभाषिक, बहुआयामी व सर्वसामान्यांचे कैवारी असलेल्या थोर विभूतीला ४१व्या पुण्यस्मरणानिमित्त कोटी कोटी अभिवादन.

शब्दांकन **-प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे**
प्र.प्राचार्य व राज्यशास्त्र विभागप्रमुख
र. भा. गरुड महाविद्यालय,
शेंदुर्णी, ता.जामनेर, जि.जळगाव






# बुँद से गयी, वो हौद से नही आती ! मनपा निवडणूक नियुक्ती प्रकरणात 'भाजप बॅकफूटवर'

**चेतन साखरे**
**जळगाव, १९ डिसेंबर**

जळगाव महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रदेश भाजपाने चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांची निवडणूक प्रभारीपदी नियुक्ती केली. हि नियुक्ती करतांना शहराचे आमदार असलेल्या सुरेश भोळेंचे काय? असा प्रश्न उपस्थित होताच भारतीय जनता पक्ष चांगलाच दचकला. तत्काळ सायंकाळी आमदार सुरेश भोळे यांच्या निवडणूक प्रमुख पदाचे पत्र जारी करीत या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न प्रदेशकडून झाला.

भारतीय जनता पक्ष ३६५ दिवस निवडणुकीच्या मूडमध्ये असतो. वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना व्यस्त ठेवत असतो. अशाच कार्यक्रमांमधून भाजपाचे नेतृत्व तयार होते. त्यामुळे भाजपा हा 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणून ओळखला जातो. यासोबतच भाजपाची गत दशकातील ओळख म्हणजे 'धक्कातंत्र'. राष्ट्रीय अध्यक्षापासून ते जिल्हाध्यक्षपदापर्यंतच्या सर्वच नियुक्त्यांमध्ये भाजपकडून या तंत्राचा सर्वाधिक वापर केला जातो. तसेच निवडणुकांमध्ये देखील नेतृत्व सोपविण्यातही या धक्कातंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**नोव्हेंबरमध्येच चौघांची नियुक्ती**

जळगाव जिल्ह्यात मंत्री गिरीश महाजन यांचा शब्द प्रमाण मानला जातो. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या त्यांच्याच नेतृत्वाखाली लढल्या जातील अशी दाट शक्यता होती. मात्र संकटमोचक असलेल्या मंत्री गिरीश महाजन यांचा राज्यातील आवाका लक्षात घेता त्यांना जिल्ह्यात अडकवून ठेवणे हे पक्षाला अपेक्षित नव्हते. त्यामुळे धक्कातंत्राचा वापर करीत जळगाव जिल्ह्याचे प्रभारी म्हणून वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची नियुक्ती करण्यात आली. यासोबतच पूर्व विभाग निवडणूक प्रमुख म्हणून नंदकिशोर महाजन, पश्चिम विभाग निवडणूक प्रमुख आमदार मंगेश चव्हाण आणि जळगावचे निवडणूक प्रमुख म्हणून आमदार सुरेश भोळे यांची नियुक्ती झाली. या सर्व नियुक्त्या ५ नोव्हेंबर रोजीच जाहीर झाल्या होत्या.

### प्रभारींच्या नियुक्तीनंतर भाजपात खळबळ

आमदार मंगेश चव्हाण हे भाजपाती आक्रमक नेतृत्व आहे. नुकत्याच जिल्हा बँक, दूध संघ या सर्व निवडणुकांमध्ये विरोधकांना अंगावर घेण्याचे कसब त्यांना चांगलेच ज्ञात आहे. या कलागुणांमुळेच जिल्ह्यातील पाचोरा या गाजलेल्या पालिकेचे नेतृत्वही त्यांच्याचकडे सोपविण्यात आले होते. मात्र विरोधकांना १०० टक्के थोपविण्यासाठी भाजपने जळगाव मनपासाठी प्रभारी म्हणून त्यांची नियुक्ती करताच भाजपात अंतर्गत खळबळ उडाली. जर चव्हाण प्रभारी राहतील तर मग आमदार सुरेश भोळेंचे काय? असा प्रश्न उपस्थित राहिला. जळगाव शहराने सलग तिसऱ्यांदा आ. भोळेंना नेतृत्व करण्याची संधी दिली. तसेच शहरात लेवा समाज देखील दुसऱ्या क्रमांकाचा मतदार आहे. त्यातच आमदार भोळेंचेही भाजपात अनेक समर्थक आहेत. समाज आणि समर्थक दुखावले जात असल्याचे लक्षात येताच भाजपने 'बॅकफूटवर' येत ५ नोव्हेंबर रोजी केलेल्या नियुक्तीचे पत्र १७ डिसेंबरला जारी करून चूक दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला. पण म्हणतात ना 'बुँद से गयी, वो हौद से नही आती' असाच काहीसा प्रकार घडल्याची जोरदार चर्चा भाजपत रंगत आहे.

**मुलाखत प्रक्रियेनंतर प्रभारींची नियुक्ती**

पालिका निवडणुकांनंतर महापालिकेची निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीसाठी भाजपाने १५ डिसेंबर रोजी ईच्छुक उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया पूर्ण केली. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १७ डिसेंबर रोजी जळगाव मनपा निवडणूक प्रभारी म्हणून चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. साधारणतः निवडणुक जाहीर होण्या आधीच प्रभारींची नियुक्ती केली जाते. मात्र याठिकाणी भाजपाने मुलाखत प्रक्रियेनंतर प्रभारींची नियुक्ती केली.



५ नोव्हेंबर रोजीच्या नियुक्त्या



१७ डिसेंबरला जारी झालेले पत्र



# महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची 'जत्रा'!

## उमेदवारी देण्यासाठी पक्षनेत्यांची कसोटी; बंडखोरीचे आव्हान; अपक्षही तयारीत

**दीपक महाले, तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ डिसेंबर**

**महापालिका निवडणुकीची आता राजकीय तयारी जोरात सुरू झाली असून, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही गटांनी तयारीत आघाडी घेतली आहे. गत निवडणुकीपेक्षा आताच्या निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या दुपटीपेक्षा अधिक आहे. गेल्या निवडणुकीत ६१५ उमेदवारी अर्ज दाखल होते. यंदा सर्व राजकीय व अपक्ष मिळून अडीच हजारांवर इच्छुकांकडून तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेतृत्वासमोर बंडखोरीचे आव्हान उभे आहे. शहरात आता तब्बल सात वर्षांनंतर होत असलेल्या महापालिकेचा निवडणूक रणसंग्राम सुरू झाला असून, राजकीय पक्षांनी आता प्रत्यक्ष मैदानात कंबर कसली आहे. निवडणुकीसाठी प्रशासनापाठोपाठ राजकीय तयारीलाही वेग आला आहे. एकीकडे वरिष्ठ स्तरावरून महायुती व महाविकास आघाडीच्या युतीबाबत चर्चा सुरू असताना, स्थानिक पातळीवर बिघाडी झाल्याचे चित्र आहे. भाजपसह दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी व काँग्रेसने 'एकला चलो'चा नारा देत महापालिकेच्या सर्वच्या सर्व ७५ जागांची तयारी सुरू केली आहे. भाजपने तयारीत आघाडी घेतली आहे. भाजपकडून वर्षभरापासून ७५ जागा लढण्याच्या तयारी करण्यात आली आहे.**

### सर्वच राजकीय पक्षांकडून मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण अन् रणनीती ठरली

महापालिका निवडणुकीसाठी भाजप व शिवसेना शिंदे गटाच्या मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व शरद पवार गटाकडून मुलाखतींची प्रक्रिया जसे अर्ज प्राप्त होत आहेत, तशा मुलाखती घेतल्या जात आहेत. काँग्रेसकडूनही निवडणूक तयारीने वेग घेतला आहे. काँग्रेसकडे वंचित बहुजन आघाडीसह समविचार पक्षांकडून प्रस्ताव आले आहेत. भाजप व शिवसेना शिंदे गटाच्या मुलाखत प्रक्रियेवेळी शिवसेना ठाकरे गटासह राष्ट्रवादीचेही चेहरे मुलाखतीसाठी उपस्थित असल्याचे दिसून आले. भाजपकडून इच्छुकांना मुलाखत प्रक्रियेत प्रश्नावली देण्यात आली होती. त्यात २६ प्रश्न होते. या प्रश्नावलीने इच्छुकांना चांगलाच घाम फोडल्याचे दिसून आले. भाजपतर्फे जी. एम. फाउंडेशनच्या कार्यालयात वस्त्रोद्योगमंत्री तथा निवडणूक प्रभारी संजय सावकारे यांच्या उपस्थितीत, शहराचे निवडणूकप्रमुख आमदार सुरेश भोळे, माजी ज्येष्ठ नगरसेवक नितीन लढ्ढा, महानगर-जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, निवडणूक संयोजक विशाल त्रिपाठी आदींनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटातून भाजपमध्ये आलेले काही दिग्गज नेतेही या प्रक्रियेत सहभागी दिसून आले. त्यामुळे पक्षातील जुने निष्ठावंत कार्यकर्ते व नव्याने प्रवेश केलेले इच्छुक यांच्यात समन्वय साधण्याची 'कसोटी' भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वासमोर असेल. शिवसेना शिंदे गटातर्फे केमिस्ट भवनात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत आणि आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे, आमदार किशोर पाटील, आमदार चंद्रकांत पाटील, जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, श्याम कोगटा, महिला आघाडी संपर्कप्रमुख सरिता कोल्हे-माळी, युवासेना जिल्हाप्रमुख रोहित कोगटा, महानगरप्रमुख संतोष पाटील, शहरप्रमुख गणेश सोनवणे, कुंदन काळे, युवासेना विस्तारक किशोर भोसले यांनी मुलाखत प्रक्रिया पार पाडली. तत्पूर्वी, धर्मवीर आनंद दिघे नगरी सहाय्यता कक्षांतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत उमेदवारी अर्ज भरण्यापासून विजयापर्यंतची निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती देत, प्रभागनिहाय प्रचाराची रणनीती ठरविण्यात आली.



### सर्व राजकीय पक्षांमध्ये इच्छुकांच्या भाऊगर्दीत अपक्षांचीही तयारी

महापालिकेच्या ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत ७५ जागांसाठी तब्बल ६१५ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीत तब्बल १८८ अर्ज बाद ठरून ४२७ उमेदवारांनी नशीब आजमावले होते. अपक्ष म्हणून तब्बल २०० उमेदवार होते. तत्कालीन भाजप-शिवसेना युतीत भाऊगर्दी होती. त्यातही उमेदवारी नाकारल्याने अनेक जण अपक्ष म्हणून लढले. ऑल इंडिया मजलिस इत्तेहदुल मुस्लिमी (एमआयएम)कडूनही सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. आता तब्बल सात वर्षांनंतर होत असलेल्या महापालिका निवडणुकीसाठी गत निवडणुकीपेक्षा दुपटीपेक्षा अधिक इच्छुक लढण्यासाठी तयारीत आहेत. भाजपकडे इच्छुकांचे ५५०, तर शिवसेना शिंदे गटाकडे इच्छुकांचे ३५० पेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे २०० आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे १५० पेक्षा अधिक अर्ज आले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडेही २०७ अर्ज, तर काँग्रेसकडे ४० ते ४५ अर्ज प्राप्त झाले आहेत. शहरातील १९ प्रभागांतूनही वॉर्डनिहाय अपक्ष म्हणूनही ५०० वर इच्छुकांनी तयारी केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या ७५ जागांसाठीची निवडणूक लढण्यासाठी अडीच हजारांवर इच्छुकांनी तयारी केली आहे. त्यामुळे निवडणुकीत चुरस निर्माण होण्याची शक्यता राजकीय वर्तळातून वर्तविली जात आहे.



### पक्षनेत्यांकडे मुलाखत प्रक्रियेतील इच्छुकांची उमेदवारीसाठी 'फिल्डिंग'

शहरात महापालिका निवडणुकीचे वातावरण वर्षभरापासूनच तापले असून, प्रभागनिहाय मुलाखतींमध्ये माजी नगरसेवकांसह अनुभवी कार्यकर्ते-पदाधिकारी, तरुण, उद्योजक, डॉक्टर, अभियंते, वकील यांचा समावेश असल्याचे दिसून आले. त्यातही महिलांचीही संख्या लक्षणीय आहे. काहींकडून कुटुंबातील महिलांसाठी उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. राजकीय पक्षांच्या नेत्यांकडे इच्छुकांची गर्दी दिसून येत असून, प्रत्येक इच्छुक आपापल्या नेत्याकडे धाव घेत उमेदवारीसाठी 'फिल्डिंग' लावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. भाजपकडे इच्छुकांची भाऊगर्दी पाहता, शहरात मंडळनिहाय इच्छुकांना आपापल्या भागांतील मतदारांपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यासह विकासकामांची, लाभाच्या योजनांची माहिती पोहोचविण्याच्या सूचना नेत्यांकडून देण्यात आल्या आहेत. शिवाय, शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांकडूनही पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातील लाडकी बहीण योजनेसह विविध विकासकामांची जंत्री मतदारांपर्यंत नेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



"पक्षाकडे इच्छुकांचा वाढता कल आहे. महापालिकेच्या सर्वच ७५ जागांवर उमेदवार दिले जाणार आहेत. उमेदवारीसाठी तब्बल १८० इच्छुकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सद्यःस्थितीत इच्छुकांच्या अर्जांची छाननी केली जात असून, सक्षम उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. येत्या दोन-तीन दिवसांत अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल. त्यानंतर उमेदवारी अर्ज भरले जाणार आहेत. महापौर आमचाच होईल.

**- संजय पवार (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, जळगाव)**



"पक्षाकडे इच्छुकांचे दीडशेवर अर्ज प्राप्त झाले आहेत. पक्षाकडून लढण्यासाठी इच्छुकांकडून रोजच अर्ज प्राप्त होत आहेत. त्यामुळे मुलाखत प्रक्रिया राबविली जात आहे. प्रत्येक वॉर्डासाठी तीन ते चार इच्छुकांचे अर्ज आले आहेत. दोन-चार दिवसांत उमेदवारांची नावे अंतिम केली जातील. त्यानंतर वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनात नावे जाहीर केली जातील.

**- एजाज मलिक (महानगराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, जळगाव)**



"पक्षाकडे इच्छुकांचे २०७ अर्ज प्राप्त झाले आहेत. दोन दिवस पक्षाकडून मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. पक्षाकडून सर्व ७५ जागांवर लढण्याची तयारी करण्यात आली आहे. प्रत्येक वॉर्डातून पाच ते सात जण लढण्यासाठी इच्छुक असून, सद्यःस्थितीत अर्जांची छाननी आणि सक्षम उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. २०१८ च्या निवडणुकीत दुसऱ्या स्थानी असलेल्या इच्छुकांचा विचार सुरू असून, सक्षम उमेदवारच निवडणुकीत दिला जाणार आहे. महापौर आमच्याच पक्षाचा होईल.

**- कुलभूषण पाटील (जिल्हाप्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, जळगाव)**



"पक्षाकडे इच्छुकांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. आतापर्यंत साडेतीनशेपेक्षा अधिक इच्छुकांचे अर्ज प्राप्त झाले असून, दोन दिवस मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. महापालिकेच्या सर्व ७५ जागा लढण्याची तयारी करण्यात आली आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शहरासह परिसरात विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणला आहे. त्यांच्या मार्गदर्शनात निवडणुकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. महापालिकेवर भगवाच फडकेल.

**- विष्णू भंगाळे (जिल्हाप्रमुख, शिवसेना शिंदे गट, जळगाव)**



"पक्षाकडून इच्छुकांना ६० ते ६५ अर्ज वितरण करण्यात आले होते. त्यातील ४० ते ४५ इच्छुकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. पक्षाकडे वंचित बहुजन आघाडीसह समविचारी इतर पक्षांकडूनही युतीबाबत प्रस्ताव आले आहेत. समविचारी पक्षांना सोबत घेऊन महापालिका निवडणुकीची तयारी केली आहे. जनसेवेसाठी निवडणूक लढविली जात आहे. इच्छुकांच्या मुलाखतीची प्रक्रिया राबविण्यात आली असून, सक्षम उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. येत्या दोन-तीन दिवसांत उमेदवारांबाबत अंतिम निर्णय होईल. वरिष्ठ नेत्यांकडून उमेदवार जाहीर केले जातील.

**- श्याम तायडे (महानगराध्यक्ष, काँग्रेस, जळगाव)**

### महापालिकेच्या सात वर्षापूर्वीच्या निवडणुकीची स्थिती



ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेने अगोदर युतीचा प्रयत्न केला. शहराच्या इतिहासात डोकावले असता, गेली ४० वर्षे सुरेशदादा जैन गटाकडेच महापालिकेतील सत्तेची चावी अखंडपणे होती. या सत्तेला आजपर्यंत कुणीही धक्का लावू शकले नव्हते. जिल्ह्यातील राजकीय अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचा विकास मात्र झाला नव्हता. विविध आरोप आणि घोटाळ्याच्या गर्तेत अडकलेले सुरेशदादा जैन यांना राज्यकारभार महापालिकेत सुरळीत चालण्यासाठी सरकारचे पाठबळ हवे होते. त्यांनी महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपच्या युतीचा प्रस्ताव तत्कालीन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीमधून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यासमोर ठेवला. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनीही अनुकूलता दाखवली होती. मात्र, आमदार सुरेश भोळे आणि कार्यकर्त्यांचा विरोध समोर आल्याने या युतीला मूर्त स्वरूप येऊ शकले नव्हते, अशीही चर्चा त्या वेळी रंगली होती. मैत्रिपूर्ण संबंध असल्यामुळे गिरीश महाजन आणि सुरेशदादा जैन दोन्ही नेते युती करण्यासाठी प्रयत्नरत होते. युतीसाठी प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे महाजन यांनी मात्र विविध पक्षांतील इच्छुकांना आपल्या गोटात सहभागी करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले होते. महाजन यांच्या या प्रयत्नास अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले होते. त्या वेळी मनसेच्या महापौरांसह १२ नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पाच नगरसेवक भाजपमध्ये सहभागी झाल्याने भाजपची ताकद वाढली होती. भाजपकडून सर्वच्या सर्व ७५ जागा, तर शिवसेनेकडून ७० जागा लढविण्यात आल्या होत्या. अगोदरच्या निवडणुकीत केवळ १५ जागा मिळविणाऱ्या भाजपला २०१८ च्या निवडणुकीत बहुमताने विजयी होण्याचा विश्वास वाटू लागला. एकीकडे शिवसेना आणि भाजप यांच्यात 'काटे की टक्कर' होण्याची चिन्हे असताना त्यांना शह देण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूक एकत्रित लढली. काँग्रेसला आजपर्यंत जळगाव महापालिकेत एकही जागा मिळविता आलेली नव्हती. राष्ट्रवादी ४३, तर काँग्रेसने १६ जागांवर उमेदवार उभे केले होते. मात्र, गेली ४० वर्षे अखंड सत्ता असलेले सुरेशदादा जैन यांच्या शिवसेनेला महाजन यांनी शह देऊन ५७ जागांवर विजय मिळविला. मात्र, त्यानंतर यातील २७ सदस्यांनी वेगळी चूल मांडत शिवसेनेच्या मदतीने मार्च २०२२ मध्ये सत्तांतर घडवून आणले होते. यानंतर भाजपने या सदस्यांना अपात्र करावे, या मागणीसाठी न्यायालयात धाव घेतली होती. यात उच्च न्यायालयाने विभागीय आयुक्तांनी यावर निर्णय द्यावा, असे निर्देश दिले होते. विभागीय आयुक्तांकडे यावरील सुनावणी ही शेवटच्या टप्प्यात पोहोचली असतानाच महापौर जयश्री महाजन आणि उपमहापौर कुलभूषण पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यात उच्च न्यायालयाच्या आदेशाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. त्यानंतर शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे गट निर्माण झाले. त्यातील सात नगरसेवकांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. महापालिकेचे राजकारण संभ्रमावस्थेत होते. नेमके कोण कोणत्या गटासोबत याबाबत अधिकारीही चक्रावले होते. निधीसह होणाऱ्या राजकीय अडचणीअभावी नगरसेवक या ना त्या गटात बंडखोरी करीत प्रवेश करीतच होते. महापालिकेचे राजकारण अस्थिर झाल्यामुळे शहराच्या विकासालाही बाधा झाली होती. त्यानंतर भाजप- शिवसेना शिंदे गटाची राज्यात सत्ता आल्यानंतर काही प्रमाणात विकासकामांना गती आली.

### आतापासूनच विजयाचे दावे-प्रतिदावे

ऐन हिवाळ्यात महापालिका निवडणुकीचे वातावरण तापले असून, राज्यात सत्तेतील महायुती आणि विरोधक महाविकास आघाडीत स्थानिक पातळीवर बेबनाव निर्माण झाला आहे. सर्वच राजकीय पक्षांतर्फे निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या अधिक झाली असून, पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांची चांगलीच कसोटी लागली आहे. भाजपकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून, तर इतर पक्षांकडून सक्षम उमेदवारांची चाचपणी सुरू करण्यात आली आहे. ऑगस्ट २०१८ मधील महापालिका निवडणुकीत दुसऱ्या स्थानी आणि कमी मतांनी पराभूत उमेदवारांना संधी दिली जाण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. भाजप, दोन्ही शिवसेना व राष्ट्रवादीसह काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून महापालिकेवर विजयाचा दावा करण्यात आला आहे. मात्र, जळगावकर नववर्षात महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकतो, हे १६ जानेवारीला पाहणे औत्सुक्याचे राहील.

# धुळे मनपा निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढणार : प्रमुख नेत्यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १९ डिसेंबर**

येथील महापालिकेसाठी महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने रिंगणात उतरणार असून, एकत्रितपणे निवडणूक लढविणार आहे, अशी घोषणा शहरातील कल्याण भवनात झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी केली.

महाविकास आघाडीत सहभागी असलेले शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांसह इतर सर्व मित्रपक्षांच्या पत्रकार परिषदेला शिवसेना ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख अशोक धात्रक, माजी



आमदार अनिल गोटे, सहसंपर्कप्रमुख तथा माजी महापौर भगवान करनकाळ, उपनेत्या शुभांगी पाटील, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, महानगरप्रमुख धीरज पाटील, नरेंद्र परदेशी, काँग्रेसचे भा. ई. नगराळे, डॉ.दिनेश बच्छाव, शहराध्यक्ष साबीरशेठ भंगारवाले, रमेश श्रीखंडे, दरबारसिंग गिरासे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहर-जिल्हाध्यक्ष रणजितराजे भोसले, जगन ताकटे, जितेंद्र पाटील, निखिल मोमया, मनसेच्या राज्य सचिव प्राची कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष ॲड. दुष्यंत देशमुख, शहराध्यक्ष संजय सोनवणे, तालुकाध्यक्ष संतोष मिस्तरी, सचिव अनिल शिरसाठ, अजित राजपूत आदी उपस्थित होते.

आमची लढाई भाजपशी आहे. भाजपविरोधात आम्ही सर्व प्रभागांमध्ये उमेदवार देणार आहोत. माजी आमदार अनिल गोटे व खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडी ही निवडणूक लढविणार असून, निवडणुक समितीची सूत्रे काँग्रेसचे डॉ. दिनेश बच्छाव यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत, अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख धात्रक यांनी दिली.

उमेदवार निवड आणि जागा वाटपासाठी सुकाणू समिती तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी आमच्या एकत्रीत बैठका होतील. भाजप तसेच महायुती सरकारमध्ये सामील पक्षांविरुद्ध जनतेला एक सक्षम पर्याय महाविकास आघाडी देईल, असेही श्री. धात्रक म्हणाले.

या वेळी डॉ. दिनेश बच्छाव यांनी विकासकामांच्या मुद्द्यावर सांगितले की, शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी निधी आणला. त्यामुळे अक्कलपाडा धरणाची क्षमता वाढवण्याची मंजुरी मिळाली. तसेच आगामी काळात विविध विकासकामे शहरात करण्यात येणार आहेत.

### अन् महाविकास आघाडीत दिसला विसंवाद!

एकत्र निवडणूक लढण्याची तयारी करणाऱ्या महाविकास आघाडीत विसंवाद आणि कुरघोडी असल्याचे पत्रकार परिषदेतून जाणवले. काही नेत्यांना बोलूच दिले जात नव्हते, तर काही नेते मौन धारण करून बसले होते. महाविकास आघाडीतील काही पक्षांचे नेते भाजपच्या वाटेवर असल्याचा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर परिषदेला उपस्थित नेते एकमेकांकडे संशयाने पाहताना दिसले. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या एका नेत्याचे नाव घेऊन पुन्हा हाच प्रश्न पत्रकारांनी विचारला, तेव्हा संबंधित नेत्याला हा प्रश्न ठोसपणे खोडून काढता आला नाही. 'मी महाविकास आघाडीत आहे आणि काम करतो आहे,' एवढेच मोघम उत्तर त्या नेत्याने दिले; पण पक्ष सोडणार की नाही, याबाबत त्यांनी ठोस भूमिका जाहीर केली नाही. याच पत्रकार परिषदेत मतदारसंघाच्या खासदार काँग्रेसच्या असताना भाजप नगरसेवकाला निधी कसा देऊ शकतात? असा सवाल करताच चांगलाच गोंधळ उडाला. त्यानंतर माजी आमदार अनिल गोटे यांनी काढता पाय घेतला आणि परिषदच आटोपती घेण्यात आली. मनसे नेते 'गोंधळ' फक्त पाहण्याचे काम करीत होते.

www.tarunbharat.net

तरुण भारत

# आकांक्षा

शनिवार, २० डिसेंबर २०२५

डॉ. हेडगेवार ग्रामीण अकृषक सहकारी पतसंस्था मर्यादित नाचणगांव (मुख्यालय)
स्थापना 1998
आमच्या शाखा : नाचणगांव (मुख्यालय), वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली आणि अकोला
बचत खाते व्याज दर ५%
मुदत ठेव व्याज दर १०.५%
आपल्या शहरातील शाखेला अवश्य भेट द्या.
संस्थापक अध्यक्ष : डॉ. जयंत ओक, मो. 9764648383

**कव्हर स्टोरी**

# जुना गाभा, नवी दिशा !

गौरी बेलन/९८८११०४११२

आजची सुशिक्षित पण अस्ताव्यस्त, भरकटलेली तरुण पिढी आमच्यापासूनच निर्माण झालेली आहे. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेली पिढी सध्या आजी-आजोबा या पदावर आरूढ आहेत. तर, ७०-८० च्या दशकातील पालकवर्ग आई-वडिलांची भूमिका पार पाडत आहेत. संस्कृती आणि परंपरा गुण्यागोविंदाने हातात हात घालून नांदतानाचा काळ, आजच्या आजी-आजोबांनी सुखद नेत्रांनी अनुभवलेला आहे. आजच्या तरुणाईची जीवनशैली, राहणीमान, खानपान बघून त्यांच्या डोळ्यासमोर अंधारी येते. मधल्या पिढीची अवस्था तळ्यात मळ्यात म्हणजे 'साडीवर क्रॉप टॉप'! नाही तर जीन्स पॅन्ट वर साडी परिधान करणे, अशी विचित्र अवस्था झाली आहे. आधीच्या पिढीद्वारे समोरच्या पिढीकडे आपोआपच प्रवाहित होणारा सुसंस्कारांचा झरा निखळपणे प्रवाहित होण्याची गरज भासते आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि जागतिकीकरणाच्या ध्यासाने तरुण पिढी झपाटल्यासारखी प्रगतीचा वेध घेत पुढे जाते आहे. हवे तसे यश मिळवण्यातही तरुणाई मागे नाही पण, या यशामुळे पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास होऊन अनेकविध समस्या 'आ' वासून आपल्यासमोर उभ्या ठाकल्या आहेत. पूर्वीच्या पिढीत 'घर' केंद्रस्थानी असायचं आणि घराला धरूनच सर्वकाही सवयी आणि गोष्टी होत्या. हल्ली मात्र घराला सोडून बाकी अन्य गोष्टींचाच नको तेवढा ध्यास घेतल्याने तरुण पिढीची जीवनशैली विस्कळीत झाली आहे. विद्या विभूषित होणे, अर्थार्जन करणे हे आवश्यकच आहे. पण, हे सगळं करताना स्वैर आणि अविचारी वृत्ती वाढणे ही धोक्याची घंटा आहे. बेफिकिर वृत्ती, निर्लज्जपणा, उद्धटपणा आणि फक्त स्वतःच्याच सुखाचा विचार केला तर कोणीच कोणाचे उरणार नाही मग, कोण काय म्हणेल हा तर विचार दूरच राहिला. मुळातच चंचल असणारा ऐन उमेदीचा तरुणाईचा ताल आजूबाजूच्या गोष्टींनी अधिकाधिक चंचल होऊन सद्‌विवेकबुद्धी हरवून बसेल की काय? याची भीती मन पोखरून काढते आहे. तरुण वर्गाकडून सगळ्यांनाच खूप अपेक्षा असते. व्यक्तीच्या जन्माचा उद्देश फक्त स्वतःपुरता सिमित नसतो तर त्या जगण्याचा उपयोग कुटुंबाला, समाजाला आणि राष्ट?ाला होणं अपेक्षित आहे. आई-वडिलांनी परिश्रमांतून पैसा जमवून मुलांना शिकवायचं आणि पैसा मिळायला लागल्यानंतर मुलांनी मात्र आई-वडिलांकडे सर्रास पाठ फिरवायची, काणाडोळा करत राहायचं हे दुर्दैवी चित्र घरोघरी दिसायला लागलेलं आहे. आभासी दुनियेत राहून केवळ कर्तव्य म्हणून एकमेकांशी संपर्क ठेवायचा, अंगाला लावून न घेता नातं निभवायचं, किती हे भयानक चित्र?

***पंखामध्ये बळ आल्यावर घरटं सोडायचं असतं,***
***आकाशात झेपावूनही धरतीला विसरायचं नसतं...***



आयुष्य हे असंच जगायचं असतं. पूर्वीच्या आणि आजच्या पिढीत विचारांचा पूल बांधणं आम्हाला जमलंच पाहिजे. व्यक्तींमधली दैवी वृत्ती जागृत ठेवण्यासाठी संस्कारच उत्कृष्ट माध्यम आहे. जे परंपरेने पूर्वजांकडून आपल्याला मिळत असतं. आईवडिलांनी, आजीआजोबांनी आपल्या मुला-नातवंडांचं भरभरून कौतुक करावं पण, प्रसंगी कडक शासन किंवा बंधन घालण्यास मागेपुढे बघू नये. मनाला खटकल्यास प्रश्न विचारल्याशिवाय तर सोडूच नये. आपल्या मुलांना 'मी आणि माझं' एवढाच संकुचित विचार न शिकवता व्यापक जीवनदृष्टी दाखवावी जेणेकरून त्यांची देण्याची वृत्ती वाढेल. शेअरिंग करताना किंवा काही मनाजोगे न झाल्यास मन दुःखी होणार नाही. समर्थ म्हणतात...

***जितुकें काही आपणासी ठावें । तितुके हळूहळू सिकवावें ॥***
***शहाणें करून सोडावे । बहुत जन ॥***

पूर्व पिढी आणि आजची पिढी यामध्ये समतोल राखण्यासाठी एकमेकांशी आस्थेने संभाषण होणं आवश्यक आहे. ज्येष्ठांकडे अनुभव संपन्नतेची शिदोरी आहे तर त्या

**उषःकाल होता होता काळरात्र झाली,**
**अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...**

सध्या विविध स्तरावरील अभूतपूर्व प्रगतीच्या तेजाआड काळे ढग दिसू लागले आहेत. आमची दुधावरची साय फाटणार तर नाही ना? ही भीती पूर्व पिढीला वाटते आहे. परत एकदा जुन्याच पिढीला सुसंस्काराच्या मशाली पेटवण्याची वेळ जाणवते आहे. जे स्थापलं ते राखण्याची भूमिका प्रौढ नाही तर आणखीन कोण करणार बरं?

शिदोरीचा आस्वाद तरुण पिढीला आनंदाने घेता यायला हवा. जुनी पिढी आपल्या अनुभवातून उत्तम मार्गदर्शन करू शकते आणि तरुण पिढी नवनवीन विचारांसह विविध कल्पना मांडू शकतात. आदानप्रदानाची ही प्रक्रिया जर यशस्वीरित्या शांतपणे होऊ लागली तर, या बदललेल्या क्रांतीपर्वाने कोणाचंच नुकसान होणार नाही. जुन्या पिढीच्या हातात ना कधी कॅल्क्युलेटर होतं ना मोबाईल! त्यामुळे, त्यांना ?कुठलीही गोष्ट साध्य करण्यासाठी बराच प्रयास करावा लागला. आता बघा ना, सध्याचे आजीआजोबा जेमतेमच शिकलेले असले तरी कितीतरी संस्कृत श्लोक, विविध कविता, चरित्र पोथ्या त्यांना अस्खलितपणे मुखोद्गत आहे. गावशहरांचे विविध रस्ते, थांबे, अनेक चौकांची नावेसुद्धा त्यांना लगेचच आठवतात. रस्तेच्या रस्ते ते कोणताही गुगल मॅप न लावता पार पाडू शकतात. शरीर आणि बुद्धी या दोघांवर ताण देऊन त्यांचं मन आणि प्रकृती दोन्हीही कणखर आहेत. जुन्या पिढीला स्वतःच्या संस्कृती आणि पारंपरिक मूल्यांबद्दल अतिशय आदर आहे. हा आदर का आहे? याचं शास्त्रशुद्ध कारण तरुणाईने संवाद साधून जाणून घेतलं तर ! किती मजा येईल नाही?

शरीराबरोबर सुदृढ मनासाठी काय करायला हवं? संकटांवर मात करण्यासाठी कोणत्या गोष्टी आत्मसात करायला पाहिजे? रागावर नियंत्रण कसं मिळवावं? अपेक्षित गोष्ट प्राप्त न झाल्यास, नाराज न होता कसं समोर जायचं? अशा विविध गोष्टींचे बाळकडू जुन्या पिढीकडूनच चांगलं मिळू शकेल. प्रोफेशनल कौन्सिलरपेक्षा तरुण पिढीला घरचीच जुनी पिढी किंवा जवळचे आजीआजोबा, आईबाबा, इतर नातलग हे उत्कृष्टपणे समजावून सांगू शकतात. अगदी केव्हाही, कधीही आणि कितीही वेळ तेसुद्धा कुठलंही शुल्क न आकारता! उलट पक्षी नव्या पिढीने त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला, सल्ला घेतला म्हणून जुनीच पिढी त्यांना छान खाऊपिऊ घालेल, त्यांना धीर देईल आणि त्यांचं भरभरून कौतुकही करतील, ते वेगळंच!

पुस्तकी शिक्षणाच्या नादात भरपूर पैसा कमावण्याच्या स्वप्नापायी तरुण पिढी सात्विक आणि तणावविरहित जीवनशैलीपासून दूर चालली आहे. क्षणिक आनंद देणाऱ्या व्यसनांच्या दुष्टचक्रात अडकायला लागली आहे. हुशार आणि सुशिक्षित तरुणाई जेव्हा गुटखा, तंबाखू, मद्य, ड्रग्स इत्यादी अंमली पदार्थांना जवळ करते तेव्हा जुन्या पिढीच्या काळजाचं पाणी पाणी होतं. अक्षरशः जीव तुटतो हो त्यांचा! व्यसनाच्या पाशात जखडल्याने युवक-युवतींच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर अतिशय गंभीर परिणाम होतो आहे. मग लग्न, मुलंबाळं, कुटुंब हे फक्त स्वप्नच राहतं. कौटुंबिक कलह, वाद, जोडप्याचे विभक्त होणे, मुलांचे मानसिक त्रास, एकल पालकत्व आणि या सगळ्यांचा कडेलोट म्हणजे शुल्लक कारणावरून हत्या, आत्महत्या! अशा भयंकर गोष्टींनी समाजाची घडी विस्कटते. एकेक गोष्टीने हजारो मने दुर्बळ आणि व्याकुळ होतात. खरं सुख काय आणि कशात आहे? हे तरुण पिढीला समजावणं हीच जुन्या पिढीची जबाबदारी आहे. आमचं निभलं, आमचे लाकडं तर स्मशानात गेलीत, असं न म्हणता तरुण पिढीच्या आनंदात आनंद फुलवायला हवा. तरुणाईच्या खांद्यावर भक्कम हात असेल तर त्यांना किती धीर मिळेल! वयाचा भेद न करता काही कामंही दोन्हीही पिढ्यांनी मुद्दाम एकत्र येऊन करायला हवीत. घरची साफसफाई, बाजारहाट, सणसमारंभाची तयारी, आजारी व्यक्तींची शुश्रुषा, संकट प्रसंगी एकत्र येणे, धीर देणे, आतिथ्य, एकत्र जेवण वगैरे! ब्रम्हा, विष्णू आणि महेश या त्रैमूर्तींचा आपण आयुष्यात सतत ध्यास घेतो तर यांचंच रूपक समजून पुरातन, मध्यम आणि आधुनिक पिढीने एकमेकांच्या हात हातात घालून, या क्रांतीचक्रावर मात केली तर! आपल्या बघण्यात अजूनही अशी बरीच कुटुंबं आहेत, जिथे तीन पिढ्या एकत्र नांदत आहेत. अशा कुटुंबात छोट्याशा प्रसंगासाठी जरी गेलो तरी प्रत्येकाला वेगळाच असा अवर्णनीय आनंद प्राप्त होत असतो. आजीने बनवलेली खमंग पुरणपोळी किंवा आईने बनवलेले भाजणीचे थालीपीठ, सांबारवडी फाईव्ह स्टार हॉटेलच्या पिझ्झा-बर्गरपेक्षा कितीतरी अधिक रुचकर लागते, हे आजच्या तरुणाईला पक्के माहीत आहे. याउलट बँकेचे, बाजारासंबधी, लहानसहान विविध कामे, प्रवास बुकिंग, चुटकीसरशी अन् न घाबरता करणारी युवा पिढी आजच्या जुन्या पिढीचंही आकर्षण आहे. मग होऊ द्या ना, जरा एकमेकांमध्ये मुक्त संवाद ! हक्काची कानपीळी अन् अधिकाराची लाठीकाठी! शिस्त, संयम, आहार-विहार, वेशभूषा, भोजन, समाजातील स्थान, नवीन तंत्रज्ञानाचे फायदे-तोटे, सोशल मीडिया, विविध छंद, कुटुंब व्यवस्था व वैवाहिक जीवन असं विविध विषयांवरचं विचार मंथन! मोकळी चर्चा झाली तर युवा पिढी ना तणावात येईल, ना जुनी पिढी वैफल्यग्रस्त होईल. आपल्या देशाने जपलेली महान परंपरा जर आपण आपल्या पुढच्या पिढीला सांगू शकलो तरच आपल्या जन्माचं सार्थक नाही तर जन्म फुकाच गेला म्हणायचा! जीवनाचा खरा आनंद आणि समाधान मिळवण्यासाठी शरीराला योग्य व्यायाम तथा सवयी लावून घेणं, त्याचप्रमाणे मनाला देखील छान शाबूत ठेवून पालकांच्या सहवासाचा, त्यांच्या सुखाचा ध्यास घेऊन स्वतःची माणुसकी सिद्ध करणं हे आजच्या तरुण मुलामुलींचं कर्तव्य आहे. स्वामी विवेकानंद म्हणायचे, जर आमचे सांस्कृतिक मूल्य नष्ट झाले तर आमचा आत्माही नष्ट होईल. तेव्हा जे जे काही चांगलं आहे ते जपण्याचे आणि अभिमानाने पुढच्यापर्यंत पोहोचवण्याची हिच खरी वेळ आहे. जुन्या गाभ्याची पुण्याई कामात आणून, नवीन दिशा उज्वलित करू शकतो.

***संस्कारांच्या मौक्तिकांची, उधळण हलके करता***
***सार्थकता ही आयुष्याची, जुना गाभा नवी दिशा...***

# निरवतेचा रव!

गौरी सरनाईक/९७३०१०७७०२

आईच्या गर्भातील अंधारमय पण सुरक्षित अशा विश्वातही एक कोमल स्पंदन असतं आवाजाचं! आईच्या हृदयाचे ठोके, तिच्या पोटावरून फिरणाऱ्या कोमल हातांची ऊब, बाहेरच्या जगातून येणारे अस्पष्ट हलके स्वर, हे सर्व एखाद्या श्रवणलहरींसारखं आपल्या मनावर उमटत जातात. जन्मापूर्वीच सुरू होतो, तो नादाशी जीवनभराचा मैत्रीचा प्रवास! आईच्या गर्भापासून सुरू होणारी आवाजांची ओळख आयुष्यभर सोबत राहते. आईच्या चालण्याचा ताल, हसण्याचा सूर, बोलण्यातील माया, तिचा अलवार स्पर्श हे सर्व त्या अजाण बाळाला सांगत असतात की, तू येतोयस एका मोठ्या, जादुई नादांच्या जगात!

बोलणे, रस्त्यावर वाहनांची धावपळ, हॉर्न, पायांचे आवाज, भांड्यांची खणखण अशा असंख्य ध्वनींशी आपण जुळून जातो. हे आवाज दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनतात. जन्म झाल्यावर तर ही दुनिया आणखीनच रंगत जाते. कधी रस्त्याने धावणारी वाहनं, कधी हॉर्नचा चिरका आवाज, या सगळ्या ध्वनींनी घरं, रस्ते-बाजार, माणसं सगळं जणू जिवंत होतं. रोजच्या सवयीचे काही ठराविक आवाज अचानक कानावर न पडले तर, नकळत पोकळी जाणवते. खरंच, हे आवाज क्षणाक्षणाला आपल्याला जगाशी जोडून ठेवतात. जे दररोज ऐकतो, तेच ओळखीचे होतात. एखाद्या गल्लीतून चालताना अचानक एखादा नेहमीचा आवाज नसेल, तर मन दचकतं! काहीतरी वेगळं आहे आज! आवाज सवयी बनतात आणि सवयी भावना! बांगड्यांची किणकिण, सकाळच्या चहापूर्वीचा कपबशांचा नाद, दार ठोकण्याचा स्वर, विशिष्ट लयीत म्हटलेले श्लोक, आजीच्या भारावल्या आवाजातील आरती या सगळ्यातून दिवस रंगतो. काही आवाज हे फक्त ध्वनी नसतात तर ते आठवणींचे दुतर्फा धागे असतात.

रेडिओवरून एकेकाळी येत असत ते जादुई शब्द! 'देश की सुरीली धडकन' तेव्हा मन जणू कोणत्या उबदार आठवणींच्या दालनात प्रवेश करते. बिनाका गीतमालेचे सुप्रसिद्ध निवेदक अमीन सयानी यांचा 'आवाज की दुनिया के दोस्तों' म्हणणारा तो विशिष्ट गोड, नादमधुर, ओघवता आवाज कानावर पडला की, जणू घरचं कोणी बोलतंय असा भास व्हायचा. त्या आवाजामध्ये एक जादू, आवाजातील उंच-खाली लहरी, त्यांचा ताल आणि त्यात मिसळलेली अवर्णनीय जिव्हाळ्याची झुळूक!

आवाज म्हणजे फक्त ध्वनी नव्हे, ते एक भावविश्व असते. आपल्या आयुष्यात काही आवाज हे फक्त आवाज नाही तर त्या त्या क्षणांची ओळख असतात. आवाजांचे हे जग अनोखे, नादांच्या रेशीमधाग्यांनी विणलेले, कधी गोड, कधी खट्याळ, नेहमीच मनाला हवेहवेसे वाटणारे! आवाज म्हणजे फक्त कंपनं नाहीत तो एक सोबत चालणारा सहप्रवासी आहे. प्रत्येक क्षण तो रंगवतो! कधी उत्साहाने, कधी ओलाव्याने आणि कधी आठवणींच्या धुसर प्रकाशातून आपल्याला निरव शांततेकडे घेऊन जातो. मानवाचा पहिला पुरावा काय? शरीर? श्वास? की पहिली हळवी हालचाल? किंबहुना आवाज! आईच्या गर्भातील शांततेला छेदत जाणारा, तिच्या हृदयाचा ठोका! ही पृथ्वी आपण डोळे उघडण्याआधीच कानांनी अनुभवायला सुरुवात होते. अंधारात डोळ्यांना काही दिसत नसतं पण, आवाज मात्र जगाशी आपला पहिला संवाद बांधतो.

जन्म झाला की जग जणू एकाच वेळी शंभरेक स्वरांनी भरलेले मोठे वाद्य

**आवाज म्हणजे फक्त ध्वनी नव्हे, ते एक भावविश्व असते. आपल्या आयुष्यात काही आवाज हे फक्त आवाज नाही तर त्या त्या क्षणांची ओळख असतात. आवाजांचे हे जग अनोखे, नादांच्या रेशीमधाग्यांनी विणलेले, कधी गोड, कधी खट्याळ, नेहमीच मनाला हवेहवेसे वाटणारे! आवाज म्हणजे फक्त कंपनं नाहीत तो एक सोबत चालणारा सहप्रवासी आहे. प्रत्येक क्षण तो रंगवतो! कधी उत्साहाने, कधी ओलाव्याने आणि कधी आठवणींच्या धुसर प्रकाशातून आपल्याला निरव शांततेकडे घेऊन जातो. मानवाचा पहिला पुरावा काय? शरीर? श्वास? की पहिली हळवी हालचाल? किंबहुना आवाज! आईच्या गर्भातील शांततेला छेदत जाणारा, तिच्या हृदयाचा ठोका! ही पृथ्वी आपण डोळे उघडण्याआधीच कानांनी अनुभवायला सुरुवात होते.**

बनते. कोणीतरी गाणं लावलंय, कुठे पाणी उकळतंय, बाहेरून रिक्षाचा टणटण आवाज, दुकानाच्या शटरची चर्रकन उठणारी पट्टी...प्रत्येक



ध्वनी नव्या रंगासारखा अंगावर पसरत जातो. त्याच वेळी मनात एक नवीन भावना रुजते हे आवाज माझे आहेत, या आवाजांनीच मी जग ओळखतोय. पहिल्या रडण्यात मिसळलेत, कितीतरी अनोळखी नाद, त्या सुरांमध्येच जन्म घेतो. आपला पहिला संवाद! दररोज ऐकू येणारी ध्वनींची दुनिया आपल्याला कधीच वेगळी वाटत नाही. रस्त्यावर वाहनांची धावपळ, बाजारातल्या विक्रेत्यांचे आवाज, रेल्वेच्या शिट्या, मंदीरातील घंटा, शाळेतील टिचरचा 'शांत बसा!' असा हुकूम, नदीच्या पाण्याची सतत चालणारा प्रवाह हे सगळं असतं आणि कोलाहलातही मन शोधत राहतं, आपली शांत धून! आवाज म्हणजेच जीवन असल्यानेच आपण निवांत राहतो. एखादा आवाज अचानक बंद झाला तर, मन चुकल्यागत धडधडतं. आपण त्यांना फक्त ऐकत नसतो, आठवणी, भावनांचे धागे त्यांच्याशी जोडत असतो.

आपल्यापैकी प्रत्येकाच्या आयुष्यात काही स्वर, काही आवाज कायमचे लिहून जातात. घरातील जुने भिंतीचे टकटक करणारे घड्याळ, आजोबांच्या चष्म्याची चौकट सरकवणारा हलका आवाज, जुन्या रेडिओचा सेट होण्यापूर्वीचा खरखर सूर, 'अगं' किंवा 'अहो'ची पहिली हाक, आई-बाबा म्हणणारे बोबडे बोल... हे आवाज फक्त कानात नाही तर, मनाच्या कप्प्यात आयुष्यभर राहतात. शांततेलाही एक आवाज असतो. हिंदीमध्ये एक सुंदर शब्द आहे,'निरव का रव'! कधी रात्री उशिरा जेव्हा संपूर्ण गल्लीतला गोंगाट थांबतो, तेव्हा आणखी एक आवाज ऐकू येतो. तेव्हा हा निवांत शांततेचा आवाज आपण ऐकू शकतो, ते सुद्धा एक संगीतच! आपल्या आयुष्यात काही आवाज हे फक्त आवाज नसतात.

ते त्याक्षणांची ओळख असतात. कधी काळजी, कधी प्रेम, कधी भीती, कधी उत्साह सगळ्या भावनांची भाषा म्हणजे आवाज! जीवन म्हणजे नादांनी विणलेली एक सुरमयी कळी! आवाज हे जीवनाचं गाणं आहेत. कधी कडवं तर कधी ध्रुवपद, कधी अंतरा तर कधी तान... पण प्रत्येक एक कथा असते.

कधी विचार केलाय का आपण की, शांततेलाही एक स्वतःचा आवाज असतो? गोंगाटात हरवलेली आपली इंद्रिये कधीकधी हा नाद ओळखायलाच विसरतात. पण, जेव्हा स्वतःशी एकांतात राहतो, तेव्हा जाणवतं निरवतेलाही एक भाषा, एक लय असते, नाजूक स्पंदनं असतात. पण, हा आवाज फक्त काही निवडक भाग्यवंतांना ऐकू येतो, जे शांततेशी मनाने जोडलेले असतात. अशा लोकांचं मन जणू एखाद्या नाजूक वाद्याप्रमाणे असतं. हवा हलकी झाली, पानं सळसळली, मातीने श्वास घेतला की, त्या सुरांवर ते अलगद हलू लागतं. अशांपैकी एक म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर! पहाटेच्या तिसऱ्या प्रहरात उठून, सर्व जग झोपेत बुडाले असताना ते निसर्गाच्या कुशीत फिरायला जात. फुलांशी बोलून, झाडांना स्पर्श करीत. कधी तर हा निसर्गवेडा मातीला कान लावून तिची धडधड ऐकायचे.

लोक हसायचे हा माणूस वेडा आहे की काय? पण, कार्व्हर यांचं यावर उत्तर नितांत सुंदर होतं. 'मी वेडा नाही. ही शांतता माझ्याशी बोलते. माती माझ्या कानाशी तिच्या सुखदुःखाची कुजबुज करते. झाडांचा स्पर्श झाला की ती हलकेच कथा सांगतात. वातावरणातील निरवता माझ्यापाशी मैत्रिणीसारखी बसते.' किती मोठं उत्तर! किती खोल आणि किती खरं!

खरंच, शांतता म्हणजे रिकामपण नाही. ती निसर्गाची अगदी स्वरांची संवादकला आहे. निसर्गातली शांतता नादमय कविता! कधी तुम्ही जंगलात एकटे फिरला आहात का? कोणाशी न बोलता, फक्त स्वतःशी चालत? तिथे शांतता नसते तर शांततेचा श्वास असतो. तिथे पानांची सळसळ आपल्याशी संवाद साधते. वाळलेल्या पानांचा पदर जणू मृदू स्पर्शाने हलतो आणि सूर्यकिरणांचा प्रकाशही अचानक न बोलता कविता लिहू लागतो. शांततेत गूढ नाद असतो, निसर्गाच्या श्वासासारखा! तो ऐकू येतो त्यांनाच, जे स्वतःला काही क्षणांसाठी थांबवतात. 'निरव कारवां' म्हणजे शांततेची एक मूक यात्रा! हा शब्द मला फार भावतो कारण, त्यात न बोलता व्यक्त झालेला भाव आहे. शांततेचा एक प्रवास जो मनापासून ऐकणाऱ्यालाच दिसतो. शांततेचा नाद मनातला दीपस्तंभ मानते मी! आयुष्यात एकदा तरी नक्की तुम्ही शांततेशी संवाद साधून पाहा. अंधाऱ्या जंगलात असो, गावाच्या ओट्यावरची सकाळ असो, घरातील एखादी शांत रात्र किंवा फ्लॅटच्या गॅलरीतील पहाट! डोळे मिटा आणि थोड्या वेळाने तुम्हाला जाणवेल की, ही शांतता बोलतेय. तो नाद अगदी सौम्य आहे एखाद्या मृदंगाच्या तालासारखा! तो आवाज एकदा मनात उतरला की, जीवनातील गोंगाटातही तुम्ही आतून शांत राहता. मग शांततेचा आवाज तुमचा सोबती होतो. जीवनाला नवं संगीत देणं, शांततेचा नाद ऐकू लागला की गोंगाटातही मन प्रसन्न होतं. एक क्षणात जाणवतं निरवतेचा नाद हा शब्दांपेक्षा मोठा आहे. हो, शांततेलासुद्धा स्वतःचा आवाज असतो. ती दिसते निरव पण, तिच्यात एक गूढ निनाद लपलेला असतो. सगळ्या ऐकण्यासारख्या आवाजांच्या पलीकडे एक आवाज असतो शांततेचा. शांतता म्हणजे केवळ निःशब्दता नाही तर ते एक असे जग आहे जिथे मनाचे दरवाजे उघडले की अनेक गुपितं ऐकू येतात. शांततेचा नाद, वाऱ्याच्या मिठीत गेलेला श्वास, पानांच्या नाजूक धडधडीत लपलेलं गाणं, मातीचा दाट सुगंध आणि स्वतःच्या हृदयातील लय ही सगळी जोडून होणारी अनुभूती म्हणजे निरवतेचा आवाज!

## आनंदाचे डोही

अपर्णा कुलकर्णी / ९४२१२१२४४८

# भेटीत तुष्टता मोठी...



स्नेहाचा महिमा काय वर्णावा? सर्वांना हवाहवासा त्याचा गोडवा, आप्तांच्या गाठीभेटींनीच तर जीवनानंदाचे गणित सुलभ होते. मनाला प्रसन्नतेची हिरवाई लाभते. स्नेहाचा ओलावा नात्यांना फुलवत जीवनात आनंद गंध दरवळता ठेवतो. जीवनाला एक नवा अर्थ प्रदान करतो. मानवी मनाला स्नेह आपुलकीचा झरा पुलकित करतो. त्यासाठीच तर अलिकडे स्नेहमिलन कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने केल्या जाते.

आजच्या अतिशय व्यस्त जीवनशैलीत स्नेहभेटींचा ओलावा, हव्याशा पावसाच्या आकस्मित सरींचा आनंद देऊन जातो आणि ताणतणावातून काही अंशी मुक्तता होते. स्नेहभेटींची ही हवीहवीशी आनंदसरिता मनासाठी उत्साहाचा निर्झर ठरते. आयुष्याची वाट आनंदी, उत्साही आणि खेळकर करण्यासाठी मग प्रत्येकालाच हे अनमोल स्नेहमिलन खुणावतं. यावेळी नाही जमलं तर पुढल्यावेळी नक्कीच असं मनालाच वचन देत, थोडी उत्साही फुलं ओंजळीत घालून घेतली जातात. पण, अनेक वर्षांनंतर भेटू इच्छिणाऱ्या एखाद्या वर्गाच्या पहिल्याच संमेलनाचे उधाण तर अवर्णनीय असते. त्या स्नेहमिलनाच्या आधी बालपणीचा किंवा तरुणपणीचा काळ मनातल्या मनात पुन्हा जगत, आठवत उत्साहाची तोरणं सर्वांच्या आनंदासाठी पूरक ठरतात. मनाला भेटींच्या स्वप्नांचे मनोहारी तुरे लागतात. त्या स्वप्नील दुनियेत होणाऱ्या सोहळ्यांनी मन उल्हासित राहू लागतं. किती विलक्षण गंमत आहे ना या मनाची! आनंदाच्या नगरीत ते कितीतरी वेळा फेऱ्या मारून येऊ शकतं आणि येताना त्याला चिकटून जे प्रमुदीत अत्तर येतं ना ते मग दिवसेंदिवस दरवळत राहतं. मग प्रत्यक्ष त्या आनंदनगरीतून सुखावून आल्यावर तर बहारच!

भेटींतूनच तर भावबंध दृढ होतात. आयुष्याचं वस्त्र अधिक जरतारी धाग्यांनी सुशोभित होतं. त्या वस्त्रातील नवनवीन स्नेह आपुलकीच्या धाग्यांची वीण मनास प्रसन्नता देऊन जाते. काही कटू आठवणींना वेळीच सुबक रफ्फू घडून येतो. मग मनातील तेकटू आठवणींचे धागे सहज विरतात. आनंदाच्या कशिदाकारीत मन रमतं.

उतारवयातच काय अगदी तारुण्यात, मध्यम वयात काही जणांना जाणवणारे एकाकी, एकटेपणाचे काटे झडतात आणि तिथे सुखद चैतन्याची कोवळी पालवी फुटते. सकारात्मकतेच्या पैजणांचा नाद जीवनात मोद भरतो. स्फूर्ती लहरींचे वारे मनात नकळत वाहू लागतात आणि प्रफुल्लित जगण्याचे तंत्र गवसते. या अधून मधून होणाऱ्या गाठीभेटींचे मग वेध लागतात. काही उत्साही गटांसाठी तर हे प्रतिवार्षिक आयोजन म्हणजे आनंदाचा बुस्टर डोजच जणू! म्हणूनच विविध संघटनांचे, संस्थांचे, स्नेहमिलन कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यातून एकोपा वाढतो. विचारांना दिशा मिळण्यासोबतच, आपल्यासोबत अनेक लोक आहेत हा विश्वास बळावतो. उपस्थितांच्या कलागुणांना वाव मिळतो. सांसारिक जबाबदारीत किंवा जीवनाच्या वेगात हरवून गेलेली आपल्यातील एखादी कला पुन्हा हातात हात घेऊन 'जादू की झप्पी' देत म्हणते, आपलं सख्य अबाधित आहे. माझी सोबत तुझी वाट चैतन्यदायी करणार आहे. चला कला सांगाती होऊन जीवन आनंदीत करू या! असेही जेव्हा होते तेव्हा मन मयूर तर अगदी खुशीत येतो. मित्र-मैत्रिणी कळत नकळत आपल्यातील थिजलेल्या कलाकाराला जागे करतात म्हणजे, या स्नेह संमेलनाच्या निमित्ताने आपलीच आपल्याशी नव्याने भेट होते. मन टाळी देऊन म्हणतं, गवसलं ना आनंद पुष्प! मग त्या सुगंधाचे ताजेपणा अनुभवण्याचा आनंदयोग आता मुळी सोडू नकोस. जीवन सुंदर आहे. या जाणिवेशी मैत्रबंध जोडण्याचं मोठं काम हे स्नेहमिलन कार्यक्रम अगदी सहजतेने पार पाडतात.

कोणतातरी स्नेहबंध असलेल्या व्यक्तींच्या अशा या एकत्रीकरणाने अर्थातच स्नेहाचा आणखी सुंदर गोफ विणल्या जातो. हास्य कल्लोळ, टाळ्यांचा कडकडाट जणू पक्ष्यांचा सुमधुर किलबिलाट वाटतो. म्हणूनच त्या गोड स्मृतींना पुन्हा उजाळा द्यावासा वाटतो. परस्पर संवादाचे सेतू नात्यांचे बंध दृढ करतात. समाधानाचे मंद संगीत जीवनात गुंजतं. समाजमाध्यमांवर कितीही आभासी संवाद झाले तरी प्रत्यक्ष गळाभेट सरस ठरते. मनमोकळा संवाद, एकमेकांची खेचणे, नजर स्पर्शातून काळजी दर्शविणे याची सर कशालाच नाही. मनात साचलेलं बोलायला हक्काचा एखादा खांदा लाभतो. प्रसंगी अश्रूंना वाट मोकळी करून देऊन रितं होता येतं. हरवलेली पाठीवरची थाप पुढ्यात येते आणि जीवन प्रवासात स्नेहिल सोबतीचा हवासा श्रावण लाभतो. जीवनाची समृद्धता वाढून प्रगल्भ दृष्टिकोन लाभतो व नकळत आनंदाची बाग फुलून येते.

शाळा, महाविद्यालयातील आठवणींचे ताजे, टवटवीत पुष्पगुच्छ पुढ्यात येऊन जीवनाच्या उत्तरार्धात आनंद वाटिका मिळवून देतात. याचे श्रेय या स्नेहमिलनास आवर्जून द्यावेच लागणार. हास्याच्या तुषारांनी, विनोदांनी वातावरण हलकं फुलकं होतं. ताणतणाव दूर पळून जातात आणि आनंदाचे घन प्रसन्नतेचा पाऊस पाडून मनातील मळभ दूर सारून निरभ्र होऊन जगण्याचे हे अनमोल साधन होय.

आजच्या इन्स्टंट जमान्यात तर हे इन्स्टंट ऊर्जा देण्यास सहाय्यभूत ठरतात. जीवनसत्त्वाचे हे डोज मनाला उभारी देण्यासाठी घेत राहत, दुसऱ्यांनीही या आनंद सागरी विहार करावा, यासाठी मग आपसूकच प्रोत्साहित करतात.

जुन्याकाळचे लग्न म्हणजे स्नेहमिलनाचाच सर्वांगसुंदर सोहळा असायचा. गाद्या लोड अशी मस्त बैठक व्यवस्था गप्पांना उधाण! गुलाबपाणी आणि अत्तरासोबत आप्त भेटीचे उंची अत्तर वातावरण स्नेह सुगंधित करे. आताच्या लग्नांमध्ये दिमाखदार खुर्च्या, सोफ्यावर बसून प्रेक्षकांची भूमिका निभावल्यासारखं वाटतं. अगदी रसभरीत वर्णन करण्याइतक्या गप्पा गोलाकार बसल्याशिवाय रंगूच शकत नसल्या तरी सेल्फी आणि ग्रुप फोटोंमधून या स्नेहमिलनाचा पुरेपूर आनंद लुटल्या जातो नाही का? त्याचा तो फेसाळता उत्साह खासच असतो होय ना!

स्नेहमिलन कोणत्याही वयोगटाचे, स्तराचे असो या स्नेहमिलन सोहळ्याची अशी काही किमया होते की, स्नेहाची काव्यनगरी बहरत जाते आणि सुगंधी आठवांची पेटी हातात येते. त्या दरवळीने आयुष्याला एक वेगळाच अर्थ मिळतो. मनाच्या बागेत या आठवांचे फुलपाखरू भिरभिरू लागले की, निराश मनाला प्रसन्नतेचे रंग लाभतात. भेटीने मंतरलेल्या, मोहरलेल्या क्षणांचे सुखद चित्रपट मन:पटलावर तरळतात. उल्हास, उत्साहाची कारंजी थुईथुई नाचू लागतात इतकी, जबरदस्त ताकद या स्नेहभेटींत असते. त्याचे नाद मनाला प्रसन्नतेची झुल पांघरतात जणू!

स्नेहमिलन म्हणजे टवटवीत सुंदर रंगीबिरंगी सुगंधित फुलांचा झकास असा पुष्पगुच्छ! एखाद्या पुष्पगुच्छाकडे बघितल्यावर मन चंद्रमा जसा पुनवेचा चंद्रमा होऊन निर्भेळ आनंदाच्या स्थितीत क्षणभर का होईना, विहारतो. तसेच, हे सोहळे सामूहिक आनंदाचे द्योतक ठरत आहेत. चला तर आनंदाचं आभामंडळ वाढतं ठेवण्यासाठी स्नेहमिलनाचा उत्सव करू या! आपली जीवन वाट हसरी खेळकर उत्साहाने भारलेली राहील यासाठी एक छोटासा थांबा...स्नेहमिलन!

---

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

# मौसम है आशिकाना...

नमस्कार! अप्रतिम सौंदर्य लाभलेली, आपल्या अदाकारीने रसिकांची आवडती असलेली आणि स्वत:भोवती कायम एक गूढ वलय घेऊन जगलेली अभिनेत्री म्हणजे मीनाकुमारी! १९७१ मध्ये प्रदर्शित 'पाकीजा' हा चित्रपट! या चित्रपटाची छाप मात्र रसिकांच्या मनावर कायम कोरली गेली आहे. याचं कारण म्हणजे या चित्रपटाचं अतिशय वेगळं कथानक! मनाला हुरहूर लावणारी गाणी आणि पडद्यावर दिग्गज कलाकारांचा अगदी कसदार अभिनय! अभिनयातला 'राज' अर्थात राजकुमार आणि मीनाकुमारी यांची अभिनयाची छाप कितीतरी दशकं रसिकांच्या मनावर रेंगाळते आहे.'आपके पाव बहुत खूबसूरत है, जमीन पर मत रखना...' हा संवाद तर जणू काही या चित्रपटाची टॅगलाईन म्हणावी अशी! यातीलच प्रसिद्ध गीत म्हणजे 'मौसम है आशिकाना...'

कमाल अमरोही यांनी लिहिलेल्या या गीताला संगीतबद्ध केलं होतं गुलाम मोहम्मद यांनी आणि स्वरसाज होता स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा!

***'मौसम है आशिकाना,***
***ऐ दिल कही से उनको...ऐसे में ढूंढ लाना।'***

नदीच्या किनाऱ्यावर एक तंबू टाकलेला आणि त्यात असणारी नायिका, नायकाला साद घालताना हे गाणं म्हणते. सुरुवातीला पक्ष्यांचा किलबिलाट आणि पक्ष्यांचा दिसणारा थवा आणि रम्य पहाट, हेच दृश्य अगदी मन मोहून टाकतात आणि मग मनाची पकड घेतात ते या गीताचे बोल!

***कहना के ऋत जवां हैं और हम तरस रहे हैं***
***काली घटा के साये, बिरहन को डस रहे हैं***
***डर हैं ना मार डाले, सावन का क्या ठिकाना***

'मेघदूत'मध्ये जसं कालिदासांनी मेघासोबत आपल्या प्रियतमेला संदेश पाठवला होता तसा या ठिकाणी आपल्या मनालाच नायिका त्याला संदेश पाठवण्यासाठी, शोधून आणण्यासाठी विनवणी करते आहे.

***'सुरज कही भी जाये, तुम पर ना धूप आये***
***तुमको पुकारते हैं, इन गेसूओं के साए***
***आ जाओ मैं बना दूं, पलकों का शामीयाना।'***

नायकापासून दूर असणारी ती! तिच्या मनात मात्र कायम त्याचाच विचार आहे. त्याच्यावर कोणत्याही प्रकारचं संकट येऊ नये, याची आर्तता तिच्या स्वरात आहे आणि ही आर्तता लताजींनी पूर्णपणे गीताच्या प्रत्येक शब्दात उतरवली आहे. नववधूच्या वेशात असणारी मीनाकुमारी नंतर मात्र वेगळ्या पोशाखात दिसते. तरीही अभिनय आणि सौंदर्य कुठेही कमी होत नाही.

***'फिरते हैं हम अकेले, बाहों में कोई लेले***
***आखिर कोई कहां तक, तन्हाईयों से खेले***
***दिन हो गये हैं जालीम, राते है कातिलाना।'***

या कडव्यामध्ये परत मीनाकुमारीने सुंदर वेश परिधान केलेला दिसतो. संपूर्ण माळरानावर, त्याची वाट पाहत एकटी फिरणारी ती आणि तिला साथ दिली आहे आभाळातल्या भरून आलेल्या ढगांनी! या गाण्यात जिथे संगीत सुरू होतं तिथे निसर्गातील खूप छान दृश्यं टिपली आहेत. जिथे लताजींचा आवाज सुरू होतो तिथे मीनाकुमारीची अदाकारी आपल्याला पडद्यावर दिसते. या गीताची चाल नंतरच्या कडव्यात अगदी मंद लयीत जाताना, ऐकायला खूप छान वाटतं. संध्याकाळी गायल्या जाणाऱ्या यमन रागावर आधारित हे गाणं प्रेम, विरह, आर्तता व्यक्त करतं आणि हिच यमनची खासियत आहे.



पुढच्या कडव्यात वाद्य संगीत आणि गाण्याची लय थोडी बदलते. पण हा बदल अतिशय सहजपणे, ऐकणारं प्रत्येक मन स्वीकारते कारण, हा बदल कानांना आक्रमक नाही तर अतिशय नाजूक आणि प्रवाही वाटतो. तबल्यावरचा दादरा आणि केहरवा तालाचा सौम्य आवाज गीताच्या बोलांना आणि लयीला अगदी पूरक ठरतो.

***'ये रात ये खामोशी, ये ख्वाब से नजारें***
***जुगनू हैं या जमीं पर, उतरे हुए हैं तारे***
***बेकवाब मेरी आंखें, मदहोश है जमाना।'***

आपल्या दुःखाची या जमान्यात कोणाला साधी जाणीवही असू नये, या ओळीतली आर्तता मीनाकुमारीने आपल्या अभिनयातून छान साकारली आहे. संपूर्ण गाण्यात जाणवणारा इको इफेक्ट, ही सुद्धा या गाण्याची एक जमेची बाजू! चित्रपटाच्या कथानकाला या गाण्याने खूपच रंजक आधार दिला आहे. प्रेक्षकांच्या मनात पुढच्या घडणाऱ्या घटनांबद्दल या गाण्यामुळे उत्सुकता निर्माण होते. शास्त्रीय आणि चित्रपट संगीताचा अतिशय सुंदर समन्वय या गीतामध्ये ऐकायला मिळतो. अशी छान गाणी ऐकून तुमच्या जगण्यातला आनंद वृद्धिंगत व्हावा या 'पाकीजा' शुभेच्छा!

---

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# नाट्यपदे : एक अमृत वारसा!



विष्णुदास भावे यांनी मराठी रंगभूमीचा पाया घातला तर अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'संगीत शाकुंतल' या नाटकाने संगीत नाटकाची खरी सुरुवात केली. 'संगीत शारदा', 'संगीत सौभद्र', 'संगीत मानापमान' पासून 'संगीत संशयकल्लोळ','कट्यार काळजात घुसली' यासारख्या नाटकांनी नाट्य संगीताला शिखरावर नेले. मराठी नाट्य संगीतातील विविध स्थित्यंतरांचा ऐतिहासिक परामर्श घ्यावयाचा झाल्यास विष्णुदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' या आख्यानवजा संगीत पौराणिक नाटकापासून सुरुवात करावी लागते कारण, याच नाटकापासून मराठी रंगभूमीची आणि मराठी नाट्य संगीताची अखंड परंपरा निर्माण होऊन आजतागायत ती राखली गेली आहे. नाटकातील संगीताचे स्वरूप कीर्तनकाराच्या गायकीच्या स्वरूपाचे होते कारण, या नाटकात सूत्रधार संगीत प्रस्तुत करीत असे. भावेकालीन नाटकातील बहुतांश पदांवर रागांचा नामनिर्देश आढळतो. शिवाय, ही पदे वृत्त छंदात्मक असत. त्याचाही उल्लेख तिथे आढळतो. भावे कालखंडातील नाट्यगीत हे एक स्वतंत्र मानले जाते. अशी पदे शाकुंतल रंगभूमीवर येईपर्यंत सादर होत होती .

संगीत शाकुंतलपासून रंगभूमीच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली. किर्लोस्करांच्या नाट्यपदांची जनमानसावर इतकी पकड बसली की, त्यानंतरची कित्येक वर्षे नाट्यपदांचे किर्लोस्करी वळण निश्चित झाले आणि चतुरस्त्र गायक तर किर्लोस्कर कंपनीला लाभलेच शिवाय, त्यामुळे मराठी नाट्य संगीताची वैभवशाली परंपरा निर्माण झाली. या नाट्यगीतांनी रागदारी संगीताची आवड आणि समज निर्माण करून मराठी रसिकांमध्ये उच्च अभिरूची निर्माण केली.

पुढे गोविंद बल्लाळ देवल यांनीही हीच परंपरा कायम ठेवली. संगीत शारदा-संगीत संशयकल्लोळ ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. ही परंपरा साधारण १९०१ पर्यंत टिकून होती.

किर्लोस्कर युगाच्या अखेरीस श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची पदे महाराष्ट्राला ठाऊक झाली. या काळातही अनेक गायक प्रस्थापित झाले. रागदारी प्रधान गाण्यांना या काळात बहर आला. गोविंदराव टेंबे यांनी मराठी नाट्य संगीतात 'संगीत मानापमान'द्वारे एक नवीन प्रयोग केला. बालगंधर्व यांच्यासारखे गायक यावेळी पुढे आले. या काळात नाट्यपदांचे एक रसिले पर्व सुरू झाले. कीर्तन छापाचे नाट्यगीत ते रागदारी संगीत असा हा नाट्यपदांचा सुवर्ण काळ मानला जातो.

मराठी रंगभूमीवर अनेक गायक नट या काळात उदयाला आले. त्यांनी मोठा नावलौकिक मिळवला. संगीत दिग्दर्शकांना या काळात त्यांच्या कर्तृत्वाला वाव देण्याची संधी मिळाली. त्यानुसार, या क्षेत्रात संगीताची अनेक अंगे हाताळली गेली.

> **चित्रपट गीतांनी रागदारी वळणाच्या नाट्यगीतांना जरासा धक्का दिला. त्यामुळे नवीन स्वरूपाचे आणि भावगीत वळणाचे नाट्यसंगीत रंगभूमीवर आले. काही मंडळींच्या नाटकात असं नाट्यसंगीत आपल्याला आढळतं. १९५५/५६ च्या दरम्यान नाट्य संगीताचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न झाला.'पंडितराज जगन्नाथ', 'मत्स्यगंधा', 'मंदारमाला', 'सुवर्ण तुला' ही नाटके तेव्हा आली. साधारणपणे १९६५ नंतर नाट्यसंगीताच्या सौंदर्य मूल्यांबद्दल, त्याच्या आवश्यकतेबद्दल आणि स्वरूपाबद्दल विशेष लक्ष पुरविले जाऊ लागले. यामुळे नाट्यसंगीतात जुनी परंपरा राखून नवीन प्रयोगांना वाव देणारे, स्वीकार करणारे असे संमिश्र संगीत पुढे आले.'कट्यार काळजात घुसली ' हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे.**

उत्कृष्ट चाल, वेगवेगळ्या गवयांच्या गळ्यातील सौंदर्य स्थळे हेरून त्यांच्या वापराचे कौशल्य, नवनवीन रचना निर्माण करणाऱ्या कवींचे कसब या सर्व गोष्टींमुळे मराठी नाट्य संगीत इतके समृद्ध झाले की, नाट्यसंगीत हा एक नवीन संगीत प्रकार म्हणून संगीत प्रांतात प्रस्थापित झाला. बालगंधर्व, केशवराव भोसले, मास्टर दिनानाथ, मास्टर कृष्णराव, गोविंदराव टेंबे अशा अनेक नावाजलेल्या कलावंतांचे सहाय्य आणि त्याच संगीत स्वरूपाच्या मागे जाणारी अशी एक नाट्य संगीताची परंपरा निर्माण झाली आणि आजतागायत मराठी रंगभूमीवर ती अस्तित्वात आहे.

पुढे चित्रपट गीतांनी रागदारी वळणाच्या नाट्यगीतांना जरासा धक्का दिला. त्यामुळे नवीन स्वरूपाचे आणि भावगीत वळणाचे नाट्यसंगीत रंगभूमीवर आले. काही मंडळींच्या नाटकात असं नाट्यसंगीत आपल्याला आढळतं. १९५५/५६ च्या दरम्यान नाट्य संगीताचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न झाला.'पंडितराज जगन्नाथ','मत्स्यगंधा', 'मंदारमाला', 'सुवर्ण तुला' ही नाटके तेव्हा आली. साधारणपणे १९६५ नंतर नाट्यसंगीताच्या सौंदर्य मूल्यांबद्दल, त्याच्या आवश्यकतेबद्दल आणि स्वरूपाबद्दल विशेष लक्ष पुरविले जाऊ लागले. यामुळे नाट्यसंगीतात जुनी परंपरा राखून नवीन प्रयोगांना वाव देणारे, स्वीकार करणारे असे संमिश्र संगीत पुढे आले.'कट्यार काळजात घुसली ' हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. यात जितेंद्र अभिषेकी बुवांचे मोठेच योगदान आहे. जुन्या नव्यांचा मनोहर संगम इथे आढळतो.

नाटकाचे प्रमुख प्रकार जर सांगायचे झाले तर सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक आणि विनोदी हे आहेत. हा विषय झाला पण प्रकारानुसार एकांकिका, प्रायोगिक म्हणजेच नवीन कल्पना आणि शैली वापरून, अभिजात नाटक विशिष्ट रचना आणि नियमानुसार केलेले नाटक अशा प्रकारे नाटकांचा प्रवास आहे. तसेच, नाट्य संगीताचाही प्रवास आहे. पूर्वापार संगीत नाटकात नाटकाची सुरुवात पडद्याच्या आतून नांदीने व्हायची. कालांतराने पडदा उघडूनही नांदी काही ठिकाणी म्हटली जायची. अर्थात या सर्व नांदी वेगवेगळ्या रागात असत. नाटकातील सर्व कलावंत मिळून हात जोडून नटेश्वर आणि प्रेक्षकांसाठी ही नांदी म्हटली जायची. 'वक्रतुंड नररुंडधर मालधर' ही नांदी सर्वांना ठाऊक आहे. तसेच,'हे प्रभो विभो अगाध किती करणी' ही सुद्धा अतिशय लोकप्रिय आहे.

मराठी माणूस आणि नाट्यपद हे एक अभेद आहे. सध्याच्या काळातही चारुदत्त आफळे आणि इतर मंडळी फक्त नाट्य संगीताचासुद्धा कार्यक्रम करतात आणि नाट्यसंगीत गाणंच नव्हे तर नाट्य संगीताचा त्यातला अर्थही ते उलगडून दाखवतात. नाट्यसंगीत कसं ऐकायचं हे प्रेक्षकांना तेव्हा कळतं. नाट्यपदे हा मराठी रसिकांसाठी एक अमृत वारसा आहे. 'मूकनायक' या नाटकाची नांदी आपण आज बघू या !

**हे प्रभो विभो अगाध किती तव करणी**
**मन चिंतुनी हो रत चरणी ॥**
**चांदवा नभाचा केला, रवी चंद्र लटकती त्याला**
**जणु झुंबर सुबक छताला, मग अंथरली ही धरणी**
**बाहुली मनुष्ये केली, त्या अनेक रूपे दिधली**
**परी सूत्रे त्यांची सगळी, नाचविसी हस्ती धरूनी ॥**
**हे प्रभो विभो प्रभो विभो प्रभो विभो**
**अगाध किती तव करणी ॥**


एक नवा विषय घेऊन आपण पुन्हा भेटू पुढील शनिवारी !

---

# वीरांगना दुर्गा देवी बोहरा

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१





देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात अनेक क्रांतिकारी महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. पुरुषाच्या बरोबरीने त्यांनी या स्वातंत्र्य युद्धात उडी घेतली होती. त्यांचे कार्य बघितले की, मन चकित होतं. अशीच एक वीरांगना दुर्गादेवी भगवती चरण बोहरा जी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या समकालीन होती. ती या सर्वांची 'दुर्गा भाभी' म्हणून ओळखली जात होती.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धात हिचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कौशांबी जिल्ह्यातील शहजादपुर गावात ७ ऑक्टोबर १९०२ ला दुर्गाचा जन्म झाला. तिचे वडील पंडित बाके बिहारी तत्कालीन अलाहाबादच्या कलेक्टर ऑफिसमध्ये सरकारी सेवेत तर तिचे आजोबा पंडित शिवशंकर शहजादपूरचे जमीनदार होते. आपल्या नातीची प्रत्येक इच्छा ते पूर्ण करीत. केवळ दहा वर्षांची असताना तिचा विवाह लाहोरचे भगवती चरण बोहरा यांच्याशी झाला. दुर्गाचे सासरे शिवचरण रेल्वेत एका उच्च पदावर कार्यरत होते. ब्रिटीश सरकारने त्यांना 'राय साहब' ही पदवीही दिली होती. पण, भगवतीचरण रायसाहेबांचे पुत्र असूनही ते ब्रिटीश शासनाविरुद्धच्या क्रांतिकारी कार्यात क्रांतिकारकांना साथ देत होते. क्रांतिकारी संघटनेचे ते प्रचार सचिव होते. १९२० मध्ये वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी या कार्यात झोकून दिलं आणि दुर्गा त्यांच्या या कार्यात साथ देत होती. दुर्गादेवीचं सासर अन् माहेर दोन्ही संपन्न होतं. वडिल आणि आजोबांनी दिलेले ४५ हजार रुपये तिने त्या काळात देश कार्याला वाहून दिले.

मार्च १९२६ मध्ये भगवती चरण बोहरा आणि भगतसिंग रामचंद्र कपूर यांनी नौजवान भारत सभा नावाची एक संघटना संयुक्तरित्या सुरू केली. शेकडो युवकांनी यात स्वातंत्र्यासाठी, लढण्यासाठी सहभाग घेतला. आपल्या रक्ताने त्यावर स्वाक्षरी केल्या. यादरम्यान भगवती चरण बोहरा यांनी प्रसाद जैन यांच्याबरोबर बॉम्ब बनविण्याचा कारखाना सुरू केला. सुरुवातीला दुर्गा संदेश एकमेकाकडे पोहोचविण्याचं काम अत्यंत गुप्त रीतीने करीत होती. बॉम्बच्या निर्मितीसाठी आवश्यक सामानही ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्याचं काम करीत होती. ती एक अद्भुत योजना निर्माती होती आणि नौजवान भारत सभेची सदस्य होती. याच दरम्यान १७ डिसेंबर १९२८ ला लाला लजपतराय यांची अमानुष हत्येची बातमी आली. लालांच्यावर असहनीय लाठीहल्ला झाला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. सर्व देश हादरला होता आणि कोणीतरी यादरम्यान लाठीचार्ज करणाऱ्या जॉन सँडर्सचा खून केला. आता ब्रिटीश सरकारने लाहोरवर अनेक निर्बंध लादल्या गेले. यादरम्यान, एक घटना घडली. एका रात्री दुर्गादेवीच्या दरवाजाजवळ टकटक झाली त्यावेळेस भगवती चरण बोहरा भूमिगत होते. घरात फक्त दुर्गा आणि तिचा तीन वर्षाचा मुलगा शचिंद्र होते. तरीही भयभीत न होता तिने दरवाजा उघडला आणि समोर भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना बघून सँडर्सच्या खुनाचे सूत्रधार कोण? हे तिने क्षणात ओळखले. त्या तिघांना तिने आत घेतले पण, जास्त दिवस ती घरात लपवून ठेवू शकणार नव्हती. या परिस्थितीत तिने एक धाडसी निर्णय घेतला. भगत सिंहाची पत्नी बनून तिने त्यांना आणि सुखदेव व राजगुरू यांना त्यांचे सेवक बनवून सुरक्षित लाहोरवरून कलकत्त्याला आणले. त्यामुळे, भगतसिंह त्यावेळेस जिवंत राहू शकले. आपल्या जवळचं धन तिने या क्रांतिकारकांच्या सहाय्यतेसाठी उपयोगात आणलं.

एक अत्यंत दुर्दैवी घटना तिच्या आयुष्यात घडली. बॉम्ब परीक्षण सुरू असतांना भगवती चरण यांच्या हातातच वेळेपूर्वी बॉम्ब फुटला आणि त्यांना हौतात्म्य प्राप्त झालं. पण, ती दुःख कुरवळत बसली नाही. अधिक वेगाने ती कामाला लागली. पिस्तूल चालवण्याचं योग्य ठिकाणी बॉम्ब फेकण्याचं प्रशिक्षण तिने घेतलं. सँडर्सच्या खुनासाठी भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांना अटक झाली. त्यांच्या सुटकेसाठी अनेक मोर्चे-सत्याग्रह करूनही सरकार बधत नव्हतं. तिने एक धाडसी निर्णय घेऊन गव्हर्नर हैली याच्यावर गोळ्या झाडल्या पण, तो बचावला. पण, न हरता दुसऱ्यांदा तिने त्याचा प्राण घेण्याचा प्रयत्न केला. हैली नशीबवान होता पण, तिला तीन वर्षे कारावासाची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतरही क्रांतिकारकासाठी धन आणि शस्त्रास्त्रे मिळवून ती त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचं धाडसाचं काम करीत असे. भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना फाशी दिली आणि ती पेटून उठली. तिने पोलीस स्टेशनसमोर एक ब्रिटिश सार्जंट आणि त्याच्या पत्नीला मारण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश सरकार तिच्या या प्रतिकार करण्याच्या प्रयत्नाने आश्चर्यचकीत झाले होते. १९३२ पासून १९३९ पर्यंत ती तुरुंगात होती. तुरुंगातून सुटल्यानंतर १९३९ मध्ये तिने लखनऊ येथे पहिली मॉन्टेसरी शाळा सुरू केली आणि तिचा विस्तार केला. या नव्या पिढीत देशभक्ती रुजविण्याचं काम तिने चालू ठेवलं. देश स्वतंत्र झाला आणि तिचं स्वप्न पूर्ण झालं. पण, तिला आता ओढ लागली होती विजनवासाची! तिचं ध्येय पूर्ण झालं होतं. स्वातंत्र्यानंतर मात्र तिने आपलं आयुष्य एकांतवासात घालवलं. वयाच्या ९२ वर्षी १५ ऑक्टोबर १९९९ ला तिने या जगाचा निरोप घेतला.

---

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# पोषक कोचई



भलेही न बोलणारे मुके पशुपक्षी चांगलं खाणं खातात, आनंदाने जगतात. पण, तऱ्हेतऱ्हेची संशोधनं करून आपलं जीवन अधिक सुखमय करणारा मानव मात्र, समजून-उमजूनसुद्धा नको ते खाद्यपदार्थ खातो आणि आपलं आरोग्य सुदृढ ठेवण्याऐवजी त्या सुंदर जीवनाची माती करतात. निसर्गाच्या सान्निध्यात वाढणारी फळं-भाज्या, तृणभाज्या, गावराणी भाज्या आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी खात आणि दीर्घायुष्य जगत. हे लोक गुणकारी वनस्पतींचे महत्व जाणून त्यांचे जतनसुद्धा करत. त्यांच्यामुळे आजही त्या वनस्पती, रानभाज्या, कंदमुळं थोड्या प्रमाणात का होईना पण दिसत आहेत. एक अस्सल गावरान कंद आहे ज्याला झाडीबोलीत कोचई या नावाने ओळखलं जातं. कोचईच्या पानाचा आकार हृदयासारखा असतो. याच्या बऱ्याच जाती आहेत जसे की, ब्रम्हराक्षस, काळा धोपा, अळू... भलेही यांची पानं सारख्या आकाराची दिसत असली तरी त्यांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. जून-जुलै महिन्यात कोचईच्या कंदमुळांची लागवड शेताच्या एखाद्या कोपऱ्यात मातीचे उंबरे तयार करून त्यात करतात. तसेच घरच्या परसबागेत मातीचे उंबरे तयार करून लावतात.या कंदमुळावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही आणि खतपाणीसुद्धा घातले जात नाही. ऑक्टोबर महिन्यात हे कंद खणले जातात. सोबतच सुरुंद नावाचे कंद आणि कोचईची भाजीसुद्धा एकत्र बनवतात. विशेष म्हणजे कोचईच्या पानाचे कोणतेही पदार्थ बनविले जात नाही कारण, त्यांच्यामुळे घशात खाज सुटते. कोचई कंद उष्ण प्रवृत्तीचा असून, पोषकसुद्धा आहे. आठवडी बाजारातसुद्धा हे कोचईचे कंद मिळतात.

कोचई कंदांची भाजी बनविण्याची पद्धत सोपी आहे. आधी त्या कंदाना धुवून, मातीच्या भांड्यात किंवा आपल्या दैनंदिन वापराच्या कढईत अर्धा तास कमी आचेवर शिजवायचं. नंतर त्यांची सालं काढून घ्यायची. एका पातेल्यात तेल घेऊन ते छान तापले की, कांद्याची खमंग फोडणी द्यायची. फोडणीत आलं-लसणाचं वाटण टाकायचं. हळद, मीठ, तिखट, चिंचेचा कोळ किंवा लिंबाचा रस त्यात टाकावे. नंतर थोडं पाणी घालून मिश्रण छान एकजीव करून घ्यावे. दोन मिनिटं शिजल्यावर त्यात वाफवलेली कोचई टाकून परतून घ्यावे.मंद आचेवर दणदणीत वाफ आल्यावर कोथिंबीर घालून गरमागरम भात किंवा भाकरी सोबत कोचईची भाजी खाण्याची मज्जाच वेगळी! ही अतिशय चविष्ट भाजी वर्षातून दोनदा तरी आवर्जून खाल्लीच पाहिजे.

## कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे/९९७०६६३८१३

# नागपूर मे है ही क्या?





नगरात नगर नागपूर नगर! तिथे असते एक स्थापत्यशास्त्राची प्राध्यापिका! एकदा विद्यार्थ्यांना जुन्या इमारती, स्थापत्यशास्त्राचा इतिहास याविषयी माहिती सांगत असते. अचानक एक मुलगा उभा राहून विचारतो,'ये नागपूर मे है ही क्या?' मुलाचा तो प्रश्न ऐकून ही हाडाची शिक्षिका अंतर्बाह्य हादरते.'म्हणजे काय? पाचशेपेक्षाही जास्त बघण्यासारखी ठिकाणे असलेल्या माझ्या शहराला हा पोरगा म्हणतोय, नागपूर मे है ही क्या? बस, हे एक वाक्य माझ्यासाठी ट्रिगर पॉइंट ठरलं. जर आजची पिढी असा विचार करत असेल तर आपण जे शिकवतो त्याचा प्रत्यक्ष आयुष्याशी काही संबंधच जुळत नाही आणि मग मी वेगवेगळे अभ्यास दौरे काढायला सुरुवात केली.'

आपल्या शहराचा समृद्ध ऐतिहासिक वारसा, त्याची जपणूक तसेच नव्या पिढीकडे त्याला हस्तांतरित करण्याविषयीची तळमळ असणारी ही तरुण प्राध्यापिका आहे डॉ.मधुरा राठोड! स्थापत्यशास्त्र व इतिहासाचे समग्रज्ञान आणि एखादी गोष्ट सांगावी इतका हसत खेळत इतिहास सांगण्याची हातोटी, सोबतच समोरच्याच्या मनाचा ठाव घेणारा अत्यंत गोड आवाज हे मधुराताईंचे विशेष! विदर्भात आणि महाराष्ट?ात सांस्कृतिक वारसा संवर्धनाच्या क्षेत्रात अत्यंत सन्मानाने घेतलं जाणारे नाव! गेली दोन दशके मधुराताईंनी हेरिटेज अर्थात आपला समृद्ध वारसा जतन करण्याच्या कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. वास्तुविशारद, शिक्षक, संशोधक आणि सामाजिक कार्यकर्त्या अशा अनेक भूमिकांमध्ये त्या आपल्याला भेटतात.

'असं म्हटलं जातं की एखादा घराच्या अंगणात जर सीनियर मंडळींच्या चपला असतील तर संकट आत येण्याआधी उंबरठ्याशी थबकतं आणि दहा वेळा विचार करतं की, आत जाऊ की नको? संकटाला ही जाणवतं की, आत जी मंडळी आहेत ती अशाच प्रकारच्या संकटांमधून तावून-सुलाखून निघालेली आहेत.' म्हणूनच या वयोवृद्ध अनुभव समृद्ध मंडळींना जो मानसन्मान आपल्या समाजात असतो तोच आपल्या वारसा स्थळांना आहे, आपल्या निसर्गाला आहे. अनेक उन्हाळे-पावसाळे आपल्या या इमारतींनी पाहिलेले आहेत.' अत्यंत वेगळी अनुभूती करून देणारा हा विचार त्या शेअर करतात.

अभ्यासक्रमाचाच भाग म्हणून त्या आपल्या विद्यार्थ्यांना स्थापत्यशास्त्राचा इतिहास, जुन्या इमारतींचा इतिहास, वारसा स्थळांवरील भेटी, हेरिटेज वॉक अशा अनेक गोष्टींच्या माध्यमातून आपल्या समृद्ध वारशाचा परिचय करून देतात. मधुराताई सांगतात,'आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांना स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासक्रमाचाच एक भाग म्हणून पर्यावरणाविषयीही शिकवलं जातं. या अभ्यास दौऱ्यांच्या माध्यमातून त्यांना याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. हे अभ्यास दौरे थेअरी आणि प्रात्यक्षिक यांच्यातील एक पूल बनले आणि हे सर्व विद्यार्थ्यांना दाखवतानाच वारसा अर्थात हेरिटेज हा विषय मला उमगला.

आपल्याच शहरात असलेल्या अनेक प्राचीन वारसा स्थळासंबंधी आपल्यालाच फारसे काही माहीत नसते. आपल्या नागपुरातच फिरण्यासारखी इतकी ठिकाणी आहेत. समजा, तुम्ही सकाळी नऊच्या सुमारास बर्डीला गेलात. तिथे मॉरिस कॉलेजच्या बस स्टॉपजवळ गाडी ठेवली तर जवळच एक भोंडा महादेवाचे पुरातन मंदिर आहे. तिथून पायी निघालात तर झिरो माईल, गोवारी कांड घडले तो परिसर हे सर्व दाखवता येतं. महाल भाग तर ऐतिहासिक वारशाने समृद्ध आहे. शुक्रवारी तलाव, त्याच्या जवळील गणेश मंदिर, पोलीस स्टेशन जवळील मंदिर, बाकाबाईंचा महाल, सीनियर भोसला पॅलेसच्या मागील मंदिरं, भोसल्यांचा वाडा, कल्याणेश्वर मंदिर! बर्डीसारख्या गजबजलेल्या भागात एका दुकानाच्या आवारातच एक बाहुली विहीर आहे. अशी जवळपास १५२ ऐतिहासिक इमारतींची यादीच महानगरपालिकेच्या वेबसाईटवर आहे.

मंदिरांचे स्थापत्य असो की शहरात असलेले तलाव-विहिरी, अत्यंत जुनी असलेली झाडे या सर्वांचं आपल्या प्रथांशी, संस्कृतीशी नातं आहे.' मधुराताई भरभरून बोलत होत्या. नागपुरात तलाव किती आहेत? असा प्रश्न त्या बरेचदा मुलांना विचारतात. तेव्हा ते अंबाझरी, फुटाळा, गांधीसागर, सक्करदरा अशी काही मोठी नावे सांगतात. त्यांना आपल्याला पाणीपुरवठा कुठून होतो? हे माहीत नाही किंवा पाण्याची सध्याची स्थिती काय आहे हेसुद्धा माहीत नाही. त्या सांगतात की, आपले आजी-आजोबा वाहत्या नद्यांमध्ये पाणी प्यायचे. नंतर आपल्या आई-वडिलांनी माठातलं पाणी प्यायला सुरुवात केली. आता आपण बाटलीतलं पाणी पीत आहोत. मग पुढच्या पिढीचं काय?

सहा ते सोळा वर्षे वयोगटातील मुले त्यांची टारगेट ऑडियन्स असतात.'हे वय अतिशय संस्कारक्षम असतं. आपल्याला या वयोगटातील मुलांना हवं तसं वळवता येतं. मग आत्ताच त्यांना पाणी, निसर्ग, झाडं, आपल्या इमारती, आपला समृद्ध वारसा वाचविण्याचे संस्कार द्यायचे नाहीत का?' शाळांमध्ये त्या हेरिटेज क्लब द्वारे ॲडॉप्ट अ ट्री असे एक कॅम्पेन चालवतात. या अंतर्गत शाळा परिसरातील शंभर वर्षांवर असलेलं झाड दत्तक घेतात. विद्यार्थी त्या झाडाला भेट देतात. शिक्षक त्यांना त्या झाडाचे शास्त्रीय नाव, त्याचे उपयोग सांगतात. विद्यार्थी तेथील परिसर स्वच्छ करतात. परिसरात शाळेच्या नावाचे बॅनर लागते की, अमुक एक झाड या शाळेने दत्तक घेतले आहे. मुलं तिथे डबा पार्टी करतात. दरवर्षी झाड बदलले जाते. हेतू असा की झाडाचे जतन व्हावे.

'नागपूर महानगरपालिकेच्या प्लॅनमध्ये नाग नदीला नागनाला असं लिहिलेलं असतं. ते पाहिलं की, फार वाईट वाटतं. नाग नदी ही तर आपल्या नागपूरची ओळख! मी तर बरेचदा त्यांना सांगितलं की, कमीत कमी नदी तरी लिहा. आमची मुलं जर नदी शब्द वाचतील तर ते तिला नदी बनवतील,' त्या पोटतिडकीने बोलत होत्या.

मूर्त वारसा तर जतन करायलाच हवा त्याचबरोबर अमूर्त वारसाही कसा काय जतन करायचा? या प्रश्नावर त्या म्हणतात की, जतन करण्यासाठी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक सणावारांनी समृद्ध असणारी आपली परंपरा! आज धकाधकीच्या काळात आपल्याला सण जसेच्या तसे साजरे करणे कठीण आहे. पण, जिथे ते पारंपरिक स्वरूपात साजरे केले जातात तिथे त्याविषयी लिहून ठेवायला हवे किंवा कमीत कमी व्हिडिओ रील तरी बनवून ठेवायला हवी. पूर्वीचा काळ हा 'एज ऑफ फेथ' अर्थात श्रद्धायुग होता. यात आपल्या पूर्वजांनी, घरच्या मोठ्यांनी जे काही सांगितलं त्यावर त्या पिढीने डोळे झाकून विश्वास ठेवला. पण, विज्ञानाच्या प्रगतीने आलं तर्कयुग 'एज ऑफ रिझन'! प्रत्येक गोष्टीचे कारण दिल्याशिवाय ही पिढी त्यावर विश्वास ठेवत नाही. यावर त्या एक सुंदर उदाहरण देतात. तोंड वाजवल्याने आपल्या शरीराचे तापमान वाढतं. लहान मुलांना तोंड वाजवण्याची सवय असते. तेव्हा मोठे म्हणतात की, तोंड वाजवू नको ताप येईल. पण आताची पिढी याचे कारण कळल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवणारी नाही.'का नाही वाजवू आई?' याचं कारण म्हणजे पंचमहाभूतांनी निर्माण झालेल्या आपल्या शरीरात तापमान बदल होणं हा स्वाभाविक भाग आहे. आपले ओठ सतत जर हालचाल करत राहिले तर नकारात्मक ऊर्जा निर्मिती होऊन आपल्याला अस्वस्थ वाटतं. थोडक्यात ताप आल्यासारखं वाटतं. अशाप्रकारे सांगितलं तरच आजच्या पोरांना पटतं. नागपूर जवळच्याच वेळा हरिश्चंद्र गावात असलेली अत्यंत सुंदर वाव म्हणजेच स्टेपवेल वाचवण्याकरिताही त्यांचे पराकोटीचे प्रयत्न सुरू आहेत. नागपुरातील लोकांकरिता मुलांना दाखवू शकू अशी परिसरातीलच ऐतिहासिक स्थळे रक्षण व जतन करणे, पाणी वाचवणे, झाडे वाचवणे, जमीन वाचवणे थोडक्यात संपूर्ण पिढी वाचवणे हे जीवनध्येय समजून त्याच्या पूर्तीच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाला व्हावा, हा एकमेव उद्देश स्वधर्म समजून त्याच्याच पूर्तीकरिता अहोरात्र झटणाऱ्या या कर्मयोगीनीला मानाचा मुजरा!

---

वैष्णवी घरोटे/ ८९२८३२२७९६

# विचारांचे गुपित

कधी कधी एखाद्या क्षणी मन असं थबकतं जणू जगाच्या दिसणाऱ्या गोंधळामागे काहीतरी अदृश्य प्रवाह वाहतात. आपण अनुभवतो ते फक्त पृष्ठभाग पण, आत कुठेतरी अनामिक, अंधुक, अर्धवट राहिलेली एक गोष्ट सतत आपल्याकडे पाहत असते. विचारांचे स्वरूपही असेच! आपल्याला चकवणारे, लपवणारे आणि अचानक एखाद्या दिवशी सत्याच्या पायथ्याशी नेऊन उभे करणारे!

विचारांची नाळ कुठून सुरू होते, हे कोणीच सांगू शकत नाही. ती एखाद्या जुन्या आठवणीच्या राखेतूनही उसळी मारू शकते किंवा एखाद्या शांत दुपारी, जिथे सगळं स्थिर दिसतं, तिथेही मनाच्या तळाशी हलकासा तरंग उमटवू शकते. आपण त्या तरंगाकडे दुर्लक्ष करतो पण, तो मात्र स्वतःच्या गतीने, स्वतःच्या मार्गाने पुढे फिरत राहतो. कधी कधी तोच छोटा तरंग एक अंतर्मुख वादळ बनतो.

बाहेरून दिसणाऱ्या कथेला आपण सत्य मानतो पण, बहुतेक वेळा ते फक्त लेखकाने, परिस्थितीने किंवा आपण ज्या क्षणी ती कथा पाहतो त्या मनःस्थितीने बनवलेला पिंजरा असतो. त्या पिंजऱ्याच्या पलीकडे माणसाची खरी संघर्षकथा लपलेली असते.

कधी एखादं पात्र आपल्याला फार महान वाटतं. आपण त्याच्या बाजूने उभं राहतो. त्याच्या चुका, त्याचे गुन्हे, कधी जाणूनबुजून तर कधी अनभिज्ञतेने, आपण दुर्लक्ष करतो. कारण, आपल्या विचारांनी त्याला आधीच नायक घोषित केलेले असते. ती नायकाची प्रतिमा इतकी प्रभावी असते की, त्याच्या चुकांनाही आपण 'समजून घेण्याचा' प्रयत्न करतो. त्याला दोष दिला तरी मन मागे ओढतं, म्हणतं 'नाही, यात काहीतरी वेगळं असेल.'

त्याचप्रकारे, एखाद्या खलनायकाचे चांगले गुणही आपल्याला दिसत नाही. आपले विचार आधीच निर्णय देऊन बसलेले असतात. न्याय करण्याआधीच आपण एखाद्याला पवित्र आणि दुसऱ्याला पापी घोषित केलेलं असतं. मनाची ही प्रवृत्ती विचित्र आहे, ते जे पहायचं ठरवेल तेच दिसतं.

असं का होतं? कदाचित प्रत्येक विचार हा काहीसा अपूर्ण असतो म्हणून! तो आपल्याला संपूर्ण सत्य देत नाही, तो आपल्याला फक्त त्या टोकाला नेतो, जिथून आपण सत्याचा तुकडा पाहतो. त्याचं दुसरं टोक गडद, शांत आणि कधीकधी कठोर आपल्याला न दिसताच राहते. कथा, कादंबऱ्या, ऐतिहासिक वर्णने या सगळ्यांमध्ये 'गुपित' हेच असतं. आपण वाचतो त्या ओळींपेक्षा खूप जास्त गोष्टी अव्यक्त राहतात. मन त्या रिकाम्या जागा स्वतःच्या कल्पनांनी भरतं, स्वतःच्या भावना तिथे ओततं. म्हणूनच एखादं पात्र आपल्याला प्रिय होतं तर, एखादं अस्थिर करतं.

माणसांच्याही बाबतीत असंच आहे. एखाद्याच्या आयुष्याचा आपण एकच अध्याय पाहतो आणि त्यावरून पूर्ण पुस्तक ठरवून टाकतो. पण, प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनात एक 'गुपित' असतं. त्याची वेदना, त्याचे अपराध, त्याचे सत्य, त्याची चूक, त्याची लढाई सर्व काही! हे गुपित उलगडण्यासाठी शब्दांची नाही तर समजूतदारपणाची गरज असते. समजूतदारपणाचा पहिला नियम म्हणजे आपले विचार अपूर्ण आहेत, ते अंतिम सत्य नाहीत. प्रत्येक गोष्ट, व्यक्ती, प्रत्येक कथा कुठेतरी अपूर्ण आहे आणि त्या अधुरेपणातच तिचं सौंदर्य लपलेलं आहे. ज्या दिवसापासून आपण आपल्या विचारांनाही प्रश्न विचारायला शिकतो, त्या दिवसापासून आपण जगाकडे नव्या दृष्टीने पाहू लागतो. पूर्ण सत्य कधीच सापडत नाही कदाचित पण, त्या शोधात आपण स्वतःला नक्कीच भेटतो.

---

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# सहावे महाभूत... पैसा!



पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पाच नैसर्गिक महाभूते सर्वांना ठाऊक आहेत. पण, मानव निर्मित सहावे महाभूत म्हणजे पैसा आहे. हा मानवी बुद्धीचा एक विलक्षण अविष्कार असून, जगाला चालविणारे इंधन अन् जगाच्या गाडीतील चाकांचे वंगण आहे. ज्यामुळे जीवनचक्र न कुरकुरता चालते. पैशाने सर्व काही मिळत नसले तरी बरेच काही मिळते. हीच पैशाची गंमत आहे. पैशानेच भौतिक, लौकिक काहीही म्हणा निखळ आनंद विकत घेता येतो, हे एक शाश्वत सत्य आहे. पण, तो पैसा सन्मार्गाने मिळायला हवा असे आपले तत्वज्ञान आहे. पैशाने शारीरिक आणि मानसिक उन्नयन होऊ शकते कारण पैशाने वेळेची बचत होते. 'मूड' चांगला, 'फूड' चांगलं...सगळं कसं 'गुडगुड'! विविध संसाधनांचा विकासही साधता येतो.

पैसा परमेश्वर नाही पण, परमेश्वरापेक्षा कमी नाही हे सत्य विचारविवश करणारे आहे.

कधी चुकून पैशाचे पाकीट आपण घरीच विसरलो आणि नंतर रस्त्यात लक्षात आले तर जीव घाबरा होतो. हल्ली मोबाईलने ऑनलाइन पेमेंट करता येते म्हणून मोठा दिलासा आहे. पण, पैसा म्हणजे 'हार्ड कॅश' सोबत असल्याने जी शक्ती आणि आत्मविश्वास प्राप्त होतो त्याला तोड नाही. धूर्त माणसाने नैसर्गिक पंचतत्वेसुद्धा प्रदूषित केलीत तर मानवनिर्मित या सहाव्या महाभूताचा काय पाड! काळाबाजार आणि भ्रष्टाचार करून त्याने पैशाचे हे सहावे महाभूतसुद्धा प्रदूषित करून टाकले आहे. पैशाचे कितीही गुण गायिले तरी पैसा हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. पैशाहून महत्वाचे आहे आरोग्य आणि सशक्त शरीर!

पैशाचा शोध लागला आणि आधीची 'बार्टर सिस्टीम' निकालात निघाली. या पैशाने जनमानसात असा काही जम बसवला की, भविष्यात याचंही स्वरूप पालटेल, अशी कोणी कल्पना केली नसावी. पैसे खुळखुळतात तेव्हा सगळेजण कान टवकारून ऐकतात. पैसे नसतात तेव्हा मोठ्याने ओरडूनही लोक मूकबधिर होतात. प्रेम, त्याग, सेवा हे गुण उच्च आहेत पण, पुस्तकात ! व्यवहारात पैसा सर्वोच्च कारण, पैसा गुणांना विकत घेऊ शकतो. पण, निव्वळ गुणांनी पैसा मिळेलच याची काही शाश्वती नाही.

मॉलमध्ये एकेक सामान उचलून कार्टमध्ये टाकताना माणूस किती खुश असतो. इतका की नंतर बिलाची पट्टी (की उधळपट्टी?) बाहेर आल्यावर जराही मोलभाव करत नाही. खरेदीवर पिशवीसुद्धा मोफत मिळत नाही. पण, रस्त्याच्या कडेला बसलेल्या विक्रेत्याकडून तरतरीत कोथिंबीर घेताना मोलभाव करण्यासाठी कंठ फुटतो, विशेष अवसान येते.

कोणत्याही कार्याच्या यशस्वी पूर्ततेसाठी सातत्य या गुणाचा मोलाचा वाटा असतो. पण हे सहावे महाभूत फारच चंचल आहे. ते कमी-जास्त होते. कधी शेअर बाजाराची अचानक उसळी होते तर कधी बाजार कोसळतो. कधी रुपया वधारतो तर कधी मंदी येते. पैशाचे अवमूल्यन सातत्य टिकवून असल्यामुळे आजचा मोठा पैसा, उद्या तुटपुंजा वाटतो. एक विचारवंत म्हणतो, भलेही पैशावर विश्वास ठेवू नका पण, विश्वासावर पैसा नक्की ठेवा. तात्पर्य, पैशाला पर्याय नाही. जीवनात विश्वास महत्वाचा पण, त्यासाठीही पैसा हवाच!

पत, ऐपत, कुवत या शब्दांचा पाठपुरावा करत जो पैशाच्या मागे लागला त्याचा परतीचा मार्गच बंद, त्याला दिसतो फक्त पैसाच! परिणामी जीवनाचे सर्वांगीण पैलू कसे अनुभवणार? पैसेवाला विकत घेण्याच्या गोष्टी करतो.

तरी पण ईश्वराचा न्याय पैशाच्या बराच वरचा आहे. पैशात एक विलक्षण आकर्षण शक्ती असते म्हणून पैशाकडे पैसा जातो असे म्हणतात. हा नियम ऐकून एका गरीब माणसाने आपल्या हातातील एक नाणे मोठ्या दानपेटीच्या छिद्रावर धरून ठेवले. हेतू हा की दानपेटीतली मोठी रक्कम त्याचे नाणे आकर्षून घेईल. पण बराच वेळ झाला पेटीतली नाणी वर आलीच नाहीत. शेवटी कंटाळून त्याला झोप लागली आणि त्याच्या हातातील ते नाणेही पेटीत पडले. ते बघून तो माणूस देवाला म्हणाला, देवा हाच का तुझा न्याय? ते दृश्य बघणारा पुजारी म्हणाला, पैशाजवळ आकर्षणाची शक्ती आहे. पण, आकर्षणाची शक्ती जास्त कुठे आहे? पेटीत भरपूर नाणी असल्याने पेटीच्या आकर्षणाची शक्ती जास्त आहे. त्यामुळे तुझ्या हातातील नाणे गळून पडले.

अनेक घरांमध्ये चिल्लर, नोटा इथं तिथं, फ्रिजवर, फळीवर वगैरे पडलेल्या दिसतात. आपल्याच घरात तर आहेत, कुठे जाणार? हे खरं असलं तरी लक्ष्मीची आब राखून पैशाला विशिष्ट जागी किंवा वॉलेटमध्येच ठेवण्याची सवय लावायला हवी. अनेक हातातून फिरून आलेली ती नोट पुढेही अनेक हाती जाणार असते. त्यावर मजकूर लिहिणे, चुरगाळणे, स्टेपलिंग, पानपट्टी-काथ डाग लागणे टळले तर त्या अधिक टिकतील.

हल्ली ऑनलाइन कॅशलेस व्यवहार सुरू झाले. परिणामी चेक आणि डीडीसुद्धा कालबाह्य होत आहेत. डिजिटल एटीएमने हळूहळू चिल्लर विक्री खरेदीसुद्धा ऑनलाईन शॉपिंगमध्ये समावली तर भविष्यात चलनी नोट इतिहासजमा होतील काय? आमचा एक मित्र गमतीने म्हणाला, ऑनलाइन व्यवहारामुळे हल्ली रस्त्यावर पडलेले पैसे सापडण्याचे प्रमाण घटले आहे, पाकीटमारी खतम झाली आहे, कोऱ्या कागदावर अंगठा उठवणे नामशेष झाले आहे आणि हो, चिरीमिरीचा काळाबाजार वाल्यांनी परस्पर तोंड काळे केले आहे.

कदाचित भविष्यात नोट ही म्युझियममध्येच बघावयास मिळेल की काय!

यातील विनोदाचा भाग सोडला तरी एकूणच कॅशलेस व्यवहार हा कालोचित बदल आहे. यामध्ये खरेदी विक्री व्यवहारात पारदर्शिता आली आहे.

पैशाबाबत चार गोष्टी शक्य आहेत. पैसा साठवून ठेवा, पैसा खर्च करा, पैशाची गुंतवणूक करा आणि पैसा दान करा. याखेरीज पैशाबाबत अन्य काही शक्य नाही. पैशाचे योग्य नियोजन हयातीत होणे महत्त्वाचे ठरते. वाया गेलेला वेळ त्या बदल्यात सोनल हिरे माणिक देऊनही परत आणता येत नाही. श्रीमंत असो वा गरीब लहान असो वा मोठे सर्वांना दिवसाची चोवीस तासच मिळतात. आपलं आयुष्य म्हणजे आपला वेळ!

जन्मभर पैशामागे धावणे झाले<br>
बडेबडे गेले पण काय संग नेले


हे तत्वज्ञान दुर्लक्षित करून पैशासाठी सारं आटापिटा, व्यापताप, हेवेदावे, माझेतुझे, देणीघेणीचे हिशेब अहर्निश सुरू असतात. शाश्वत सत्य हेच आहे की,

पैसा इन्सान को काफी उपर ले जा सकता है<br>
मगर इंसान पैसे को उपर नही ले जा सकता...

---

## चिंतन

रविबाला काकतकर/ ७४९८४५०४७५



# चांगला श्रोता कसा बनाल?

'आताशा मला असं जाणवतंय की माझं कोणी ऐकत नाही', 'मला संभाषणातून वगळायला लागले आहेत. याचा खूप त्रास होतो आहे,' अभिजित बायकोला सांगत होता. बायको म्हणाली,'बरं झालं तूच विषय काढलास. अरे, मला देखील बरेचदा वाटतं की, सध्या साध्या संवादात देखील तू खूपच हिरीरिनी बोलतोस. दुसऱ्याला बोलू देत नाहीस. तुला वाईट वाटणार नसेल तर सांगते की, कदाचित त्यामुळेही तुझे मित्र किंवा ऑफिसमधले सहकारी संवादातून तुला दूर ठेवत असतील.

चांगला श्रोता बनायचे असेल तर केवळ हसून, विशेष प्रतिक्रिया न देता, दुसऱ्याचे म्हणणे, शांतपणे ऐकून घेणे हा देखील एक उत्कृष्ट संवाद होऊ शकतो. अनेकदा आपण दुसऱ्याचे ऐकून घेण्यासाठी ऐकत असतो की, त्याला काहीतरी विरोध करण्यासाठी किंवा स्वतःचं मत कधी एकदा मांडतो यासाठी उतावीळपणे ऐकत असतो? कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये ज्याला 'अ बुल इन कन्व्हर्सेशन' म्हणतात. अशा व्यक्ती सगळ्यांना गप्प बसवून स्वतःच सतत बोलतात. समोरच्या व्यक्तीला संवादात भाग घेण्याचा आनंद किंवा संधी देत नाही. अशी व्यक्ती कालांतराने नकोशी होते. काही व्यक्तींच्या बाबतीत असं होतं की, समोरच्याने काही सांगितलं की शांतपणे ऐकून घेण्याआधी ते उपदेश सुरू करतात. बऱ्याच अंशी तुम्ही बोलणाऱ्याचे केवळ एक साऊंड बोर्ड म्हणजे फक्त ऐकण्याचे व्यासपीठ असावे, असे त्याला वाटते.

अशावेळी त्याच्या वागण्याचं मूल्यमापन न करता, त्याला केवळ ऐकणं महत्त्वाचं ठरतं. तसंच प्रत्येकवेळी समोरच्या घटनेवर किंवा संभाषणावर काही प्रतिसाद देणं आवश्यक असतंच असं नाही. जे समोर चाललंय ते केवळ पाहणं, ऐकत रहाणं हे आपलीच परिपक्वता वाढवतं. कोणी प्रश्न विचारला तरच त्यावर बोलणं, हे उत्तम! दुसऱ्यासाठी एक चांगला श्रोता होणं यासारखी अमूल्य भेट असूच शकत नाही. चांगला श्रोता होण्यासाठी काही नियम बघू या. दुसरा बोलत असताना मध्ये अडथळा न आणता संयमाने त्याचे बोलणे, देहबोली यातून तो जे सांगू पाहत आहे ते निरीक्षणांनी ऐकणे हवे. आपण बोलत असताना समोरच्याने असंयम दाखवला तर ते आपल्याला आवडत नाही. तसेच, आपला घडा थोडा रिकामा ठेवून ऐकणे हवे. अनेक घरांमध्ये कुटुंबातील व्यक्तींनी एकत्र जेवण्याचा एक उत्तम प्रघात असतो. आज दिवस कसा गेला? हे प्रत्येक जण आपल्या परीने सर्वांसमोर सांगण्याची आणि इतरांनी ते ऐकण्याची ती उत्तम संधी असते. पालकांनी अशावेळी मुलांना त्यांचे काय चुकले हे सांगणे कटाक्षाने टाळले पाहिजे. चूक झाल्यास तुला काय वाटते? काय करायला हवे होतेस? एव्हढे फार तर विचारून त्यालाच त्यावर विचार करायला लावणे योग्य! न पेक्षा कालांतराने मुलांकडून असे महत्वाचे शेअरिंग टाळले जाते किंवा थांबते. कधी रडत घरी आलेलं मूल मिठी मारतं, तेव्हा त्याला आधी शांत करून धीर देणं आणि स्वतः घाबरून न जाता मुलाला आधार देत त्याचं बोलणं केवळ ऐकणं हवं. त्या ऐवजी, प्रश्नांची सरबत्ती करत, अरे तुला एव्हढं कसं कळल नाही? म्हणून त्याच्या चुका सांगून रागावण्याची ती वेळ नसते. मनःस्थिती शांत झाल्यावर मूल स्वतः चूक कबूल करू शकते. कधी मोठ्यांसाठी देखील हा अमूल्य उपचार असतो. आजच्या काळातला दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे कोणीच बोलायला नाही, घर खायला उठते अशा सर्वांसाठी बोलण्या आणि ऐकण्यासाठीचा एक सपोर्ट ग्रुप बनवणे ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे अजून एक आयाम म्हणजे शांत बसून तटस्थपणे आपल्याच विचारांना ऐकणे आणि पाहणे, मन आणि भावना मोकळ्या करण्यासाठी रोजची डायरी हाही उत्तम उपाय असतो. स्वतःला ऐकण्याची सवय असलेली व्यक्तीच, शांतपणे ऐकणारा एक चांगला श्रोता बनू शकते.

> चांगला श्रोता होण्यासाठी काही नियम बघू या. दुसरा बोलत असताना मध्ये अडथळा न आणता संयमाने त्याचे बोलणे, देहबोली यातून तो जे सांगू पाहत आहे ते निरीक्षणांनी ऐकणे हवे. आपण बोलत असताना समोरच्याने असंयम दाखवला तर ते आपल्याला आवडत नाही. तसेच, आपला घडा थोडा रिकामा ठेवून ऐकणे हवे. अनेक घरांमध्ये कुटुंबातील व्यक्तींनी एकत्र जेवण्याचा एक उत्तम प्रघात असतो. आज दिवस कसा गेला? हे प्रत्येक जण आपल्या परीने सर्वांसमोर सांगण्याची आणि इतरांनी ते ऐकण्याची ती उत्तम संधी असते. पालकांनी अशावेळी मुलांना त्यांचे काय चुकले हे सांगणे कटाक्षाने टाळले पाहिजे.

---

## रिंगा रिंगा रोजेस

श्रेया सरनाईक/८६००२७७८८८



भाग ११

आता मात्र मायकेल पूर्णपणे हतबल झाला होता. बोलण्यासाठी शब्द उरले नव्हते. जे करता येईल, तेवढंच तो करत होता जणू या छोट्या कृतींतूनच तो तिला अदृश्य संकटांपासून वाचवू शकणार होता. तिचा ओव्हरकोट त्याने स्वतःच्या हातांनी रफू करून आणला. गुडघ्यापर्यंतचे तिचे जाड, भारी लेदर शूज त्याने इतके पॉलिश केले होते की, त्यात त्याचा अस्वस्थ चेहराच उमटत होता. प्रवासात तिला भूक लागेल म्हणून ड्रायफ्रुट्स भरलेली डार्क चॉकलेट्स, बनाना पॅनकेक्स, मफिन्स, फ्रेंच फ्राईज सगळं काही त्याने काळजीपूर्वक तयार ठेवलं होतं. तिला काही कमी पडू नये. कदाचित काही चुकून होऊ नये म्हणून!

कोणाच्याही नकळत, थोडा थरथरता हात पुढे करून, त्याने तिच्या ओव्हरकोटच्या खिशात एक स्वस्तिक शुभचिन्ह असलेलं कार्ड सरकवलं.

क्षणभर त्याने त्या चिन्हाकडे पाहिलं आणि नजर झटकन वळवली. रूथ बॅग भरत होती. ओव्हरकोट घालताच ते कार्ड तिच्या हातात आलंच.

ती थांबली.'छे! हे कसलं चिन्ह?' ते चिन्ह पाहताच तिच्या मनात अस्वस्थ आठवणींची लाट उसळली. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या पक्षाचं चिन्ह काहीसं असंच! घ्यावं की नाही? क्षणभर तिने ते कार्ड हातात घट्ट पकडलं. मग मायकेलचा चेहरा आठवला. त्याच्या नजरेतली भीती! तिने निःशब्दपणे ते कार्ड खिशातच ठेवून दिलं. ती परतेपर्यंत मायकेलच्या दोन्ही वेळच्या जेवणाची जबाबदारी मेडवर सोपवलेली होती. साऱ्याचा फास्टही त्याच्यातच भागणार होता. मायकेलला मात्र भूक लागेल, अशी शक्यताच नव्हती. निघायची वेळ झाली. नकाशा, आलेली पत्रं, तार, ओळखपत्र सगळं एकदा पुन्हा तपासून दोघे प्लॅटफॉर्मवर पोहोचले. गाडी सुटण्याच्या अगदी शेवटच्या क्षणी मायकेलने तिला घट्ट मिठी मारली. ही मिठी प्रेमाची कमी आणि भीतीची जास्त होती. त्याने तिचं दीर्घ चुंबन घेतलं,जणू शेवटचंच! कशीबशी त्या मिठीतून सुटत, रूथ त्याच्या गालांवर ओठ टेकवत म्हणाली,'काळजी घे! येते! येते रे लवकरच! वाट बघ माझी! तुला सोडून अशी कधी गेले नाहीये मी पण, हे धाडस मला एकटीनेच करायचं होतं. आठवड्यानंतर भेटू. तोवर मला विसरून तर जाणार नाहीस ना?'

तिच्या डोळ्यांतलं पाणी पुसताना मायकेलने तिच्या हातात एक रेशमी जांभळा रुमाल दिला. त्याचा आवाज कुजबुजेसारखा झाला. 'रूथ, कोणत्याही परिस्थितीत हा रुमाल दुसऱ्याच्या हातात देऊ नकोस. हा फक्त तुझ्यासाठी आहे. हा तुझं संरक्षण करेल, कायम! याचा स्पर्श तुझ्या अंगाला झालेला असायलाच हवा. बॅगमध्ये ठेवू नकोस. कोटाच्या खिशातच ठेव.' तिने न बोलता तो रुमाल खिशात ठेवला आणि गाडी निघाली.

रूथची ट्रेन नजरेआड होईपर्यंत मायकेल जागेवरच उभा राहिला. जणू तिच्यासोबतच त्याचाही काही भाग दूर निघून गेला होता. असहाय्यपणे खांदे उडवत तो घराकडे वळला. रूथशिवाय घर त्याला जिवंत कबरीसारखं वाटत होतं. घरात अजूनही तिचा लव्हेंडर परफ्युम हवेत रेंगाळत होता. त्या सुगंधातही आता काहीतरी विचित्र, दडपण आणणारं होतं. साईड टेबलवर ठेवलेल्या तिच्या फोटोवर ओठ टेकवत तो ढसाढसा रडू लागला. रूथ खरंच सुरक्षित परत येईल का? तेवढ्यात त्याची नजर बेडखाली गेली. त्याने दिलेलं स्वस्तिक चिन्ह तिथेच, धुळीत पडलं होतं. क्षणातच त्याच्या अंगावर काटा उभा राहिला.

एक भयानक शून्य त्याच्या मनात पसरलं. मी तिला एकटी पाठवायला नको होतं. मी तिच्यासोबत जायला हवं होतं. पण रूथ हट्टी आहे, हे तो जाणून होता. निदान रेशमी रुमाल तरी तो तिच्याजवळ असावा. तो दोन्ही हात जोडून पुटपुटला,'हे परमेश्वरा, हे अदृश्य शक्तींनो, माझ्या प्रेयसीचं रक्षण करा. एवढीच भीक मागतो. रूथ निघाली होती. ट्रेनला विशेष गर्दी नव्हती आणि तिच्या इप्सित स्थळी पोहचण्यासाठी...अजून दोन गाड्या बदलाव्या लागणार होत्या.

तरुण भारत
# छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

● अंटार्क्टिकामध्ये कील नावाचे खेकड्यासारखे प्राणी अढळतात. शिवाय, मासे मुख्यत्वे सील नावाचे सस्तन प्राणी मोठ्या प्रमाणात अढळतात. मासे, व्हेल्स, पेट्रेलस नावाचे पक्षी हे सर्व कीलसवर आपला उदरनिर्वाह करतात. जर या कीलसच्या संख्येवर परिणाम झाला तर मात्र ही अन्नशृंखलाच तुटण्याची शक्यता आहे. अंटार्क्टिकामध्ये जे पेंग्विन आढळतात, त्यांचे ॲर्डली आणि एम्परर असे मुख्यत्वे दोन प्रकार आहेत तर एलेफंत, वेडल आणि फर अशा तीन प्रकारचे सील मासे अढळतात. जाड बर्फात सील मासे मोठमोठी बिळं करून, स्वत:चा बचाव करतात.

## गुलदस्ता

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# बोगनवेल



काटेरी असले, तरी शोभेची वेल ठरली आहे बोगनवेल! विविध रंगांमध्ये घरातील कुंडीत किंवा परसबागेची सुंदरता वाढविण्यासाठी उपयोगी आहे. मूळ दक्षिण अमेरिकेतील हे काटेरी झुडूप आहे. लहान व नळीच्या आकाराची फुले ज्या आकर्षक रंगांमध्ये दिसतात ते रंग फुलांच्या पाकळ्या नसून पानांच्या 'ब्रॅक्ट्स'चे रूपांतरित स्वरूप असते. आपल्या आकर्षक रूपामुळे बोगनवेल प्रामुख्याने सजावटीसाठी वापरली जाते. बोगनवेलीच्या १८ प्रजाती असून झाडाझुडुपांच्या आधाराने तसेच आधाराशिवायही ही वेल सहजपणे वाढते, हे उल्लेखनीय! पावसाळी क्षेत्रात सदाहरित असणारी बोगनवेल उन्हाळ्यात तिची पानझड होण्यास सुरुवात होते. भारतात 'बुगनविलिया ग्लॅब्रा' असे शास्त्रीय नाव असून, याच्या जाती सर्वत्र आढळून येतात. बोगनवेलीचे वर्णन करायचे झाल्यास ही वेल काष्ठीय अन् काटेरी असल्याने ती १२ मीटर उंचीपर्यंत वाढू शकते. एकांतरित असलेली पाने लांबट-गोलाकार पण, ४ ते १३ सेंमी लांब व २ ते ६ सेमी रुंद असतात. याची पाने गळून पडल्यावर त्यातून काटा निर्माण होतो. या शुलांची टोकं काळी असून त्यावर मेणचट थर असतो. वन्य प्राण्यांपासून बचावासाठी जणू निसर्गानेच ही काटेरी रचना केली तर नसेल, असेही वाटून जाते. म्हणूनच ती काटेरी असल्यामुळे जनावरे खात नाहीत. वेलीला बहर येतो तेव्हा त्यातून केशर, पांढरी, लाल, जांभळी आणि निळी आकर्षक आणि सुंदर फुले येतात. ही फुले एखाद्या तावाच्या कागदासारखी असतात.

सदाहरित राहून आपले सौंदर्य परिसरात पसरते. पांढऱ्या रंगांची लहान आकाराच्या तीन फुलांचा एक गुच्छ बनतो. वेलीला वर्षभर फुले दिसत असली तरी प्रामुख्याने मार्च-मे महिन्यांत मोठा बहर येतो. कुंपण तयार करण्यासाठी किंवा शोभा वाढविण्यासाठी उपयोगी पडणारी बोगनवेलीची लागवड कमी पावसातही छान होते. थंड हवामानात ती जोमाने वाढते. वेगवेगळे आकार देऊन घराभोवती व भिंतीवर वाढवून आकर्षकता वाढविली जाते. जमिनीतील क्षारांचा योग्य प्रकारे उपयोग करून ती वाढते, हे विशेष! सेंद्रिय खताचा वापर केला गेलास बोगनवेलीला चांगला बहर येतो. फक्त कुंडीत किंवा बागेत कोरडेपणा यायला नका, तसे वाटल्यास त्वरित पाणी देणे आवश्यक आहे. ही वनस्पती औषधीयुक्त असून अनेक रोगव्याधींवर उपयोगी आहे. बोगनवेलीचा आकार टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी छाटणी करणे गरजेचे आहे. यामुळे पुढील हंगामात नवीन वाढ होण्यास मदत होते. बोगनवेलीचे आयुष्य १० वर्षांपेक्षाही जास्त आहे.

**सेंद्रिय खताचा वापर केला गेलास बोगनवेलीला चांगला बहर येतो. फक्त कुंडीत किंवा बागेत कोरडेपणा यायला नका, तसे वाटल्यास त्वरित पाणी देणे आवश्यक आहे. ही वनस्पती औषधीयुक्त असून अनेक रोगव्याधींवर उपयोगी आहे. बोगनवेलीचा आकार टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी छाटणी करणे गरजेचे आहे.**

## Word puzzle

### Identify Vehicle Names

Find and circle all vehicle names in that are hidden in the grid.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| T | R | A | I | N | M | I | B | O | P |
| Q | A | H | C | L | D | S | U | T | Y |
| W | R | X | G | A | Z | T | S | C | B |
| X | Z | V | I | N | A | P | Y | U | I |
| D | A | E | R | O | P | L | A | N | E |
| K | L | J | B | H | G | F | D | S | A |
| P | F | O | R | K | L | I | F | T | O |
| C | P | O | I | U | Y | T | R | E | W |
| A | E | T | R | A | C | T | O | R | Z |
| R | W | Q | T | Y | U | I | B | G | E |

: Previous Math puzzle answer :
1) Greater share of the things 2) seriously and sincerely 3) very easy

## मजेदार चौरस

• खाली दिलेल्या चौकोनातील पहिल्या ओळीत वेगवेगळे आंकडे दिलेले आहेत • उरलेल्या अन्य रिकाम्या चौकोनात हे आंकडे अशाप्रकारे लिहावयाचे आहे की प्रत्येक ओळीत प्रत्येक आंकडा केवळ एकदाच येईल • प्रत्येक आडव्या, उभ्या आणि तिरप्या ओळीत हे आंकडे यायलाच हवे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 5 | 3 | 2 |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(उत्तर पुढील अंकी)

**मागील अंकातील म्हणी शोधाचे उत्तर –**
1. शेरास सव्वा शेर 2. तळहाताचा मळ 3. दुष्काळात तेरावा महिना 4. काळ्या दगडावरची रेघ 5. पांढऱ्या पायाचा 6. दुरून डोंगर साजरे

## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

भाग २४



# अलिबाबा आणि चाळीस चोर

बालमित्र-मैत्रिणींनो आपण सध्या मिडल ईस्ट म्हणजे मध्यपूर्वेतील वेगवेगळ्या देशातील लोककथा निवडल्या आहेत. आज आपण कतार या देशात फेरफटका मारणार आहोत. कतारमधील लहानशा गावातली ही गोष्ट आहे. या देशांमध्ये गालिचे बनवून विकण्याचा मोठा व्यापार चालत असे. गालिच्याच्या अन्वर नावाच्या व्यापाऱ्याचा सर्वदूर बोलबाला होता. परदेशातूनही त्याच्या गालिच्यांना मागणी असे. त्याला कासिम आणि अलिबाबा ही दोन मुले होती. कासिम अगदी बालपणापासून स्वार्थी, अप्पलपोटा होता तर अलिबाबा अतिशय दयाळू होता. अन्वरचा अकाली मृत्यू झाला.

'अलिबाबा, तू मूर्ख आहेस. तुला व्यवहारज्ञान नाही. त्यामुळे या हवेलीत मी राहणार आणि अब्बूचा व्यापार सांभाळणार. तू आपल्या हवेलीच्या मागच्या जागेतील टपरीमध्ये रहायला जा. माझ्याकडून तुला एक दमडीसुद्धा मिळणार नाही. समजलं?' कासिम अलिबाबावर खेकसला.'हो कासिम, तू म्हणतोस ते अगदी बरोबर आहे. मी तुझ्यासारखा व्यवहार चतुर नाही. मला अब्बूच्या व्यापारातलं काही एक कळत नाही. ते सारं तू सांभाळ,' अलिबाबाने मागच्या टपरीची डागडुजी करून ती राहण्यालायक केली. गावातल्या प्रतिष्ठित लोकांमध्ये कासिमचं नाव आदरानं घेतलं जाऊ लागलं. अलिबाबा जवळच्या जंगलात जाऊन, लाकडं तोडून गाढवाच्या पाठीवर लादून आणू लागला. पलंग-खुर्च्या बनवू लागला. अलिबाबाचा निकाह कामसू अमिराशी झाला.

अलीबाबा जंगलात गेला. गाढवाला एका झाडाला बांधून लाकडं तोडत होता. अचानक घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. 'एक, दोन, तीन... बाप रे चाळीस घोडेस्वार दिसत आहेत. सारे या समोरच्या टेकडीजवळच्या गुहेपाशी जमले आहेत. प्रत्येक घोड्याच्या पाठीवर भली मोठी गाठोडी आहेत,' अलिबाबा स्वतःशीच बोलत होता. अलिबाबा उंच झाडाच्या फांदीवर बसून त्यांच्या हालचाली बघू लागला. त्या चोरांचा म्होरक्या टेकडीच्या गुहेजवळ गेला.'खुल जा सिमसिम' तो ओरडला. त्या गुहेच्या तोंडावरचा दगड आपोआप बाजूला सरकला. सारे चोर आपापली गाठोडी पाठीवर टाकून आत गेले. तो दरवाजा बंद झाला.

अलिबाबा एकटक बघत होता. थोड्या वेळाने तो दरवाजा उघडला. सारे जण बाहेर येताच तो दगड दरवाजा बंद झाला. चोर जसे आले तसे निघूनही गेले. 'कोण होते ते? काय आणलं असेल त्यांनी गाठोड्यातून? आत ठेऊन रिकामी गाठोडी घेऊन परत गेले,' अलिबाबाच्या मनात प्रश्नांची दाटी झाली. तो झाडावरून उतरला आणि सावकाश पावलं टाकत गुहेजवळ गेला. 'खुल जा सिमसिम' म्हणाला आणि तो दगड दरवाजा उघडला.

त्याचे डोळेच विस्फारले. गुहेमध्ये सोनं, नाणं, दागदागिन्यांचे ढिगारे पडले होते. त्याच्याबरोबर लाकडं गोळा करण्यासाठी घेतलेली पोती होती. त्याने पोत्यात पटापटा सोन्याची नाणी भरली. 'खुल जा सिमसिम' हा परवलीचा शब्द उच्चारला. दगड दरवाजा उघडला आणि बंद झाला. घरी अमिरा त्याची वाट पहात होती. त्याला घरी यायला इतका उशीर झाला म्हणून काळजी करत होती. अलिबाबाला पाहून तिला आनंद झाला. अलिबाबानं गाढवाच्या पाठीवरची पोती आणून घरात ठेवली.'हे बघ, मी काय आणलं आहे,' अलिबाबा म्हणाला. अमिरा धावत आली. पोत्यातली सोन्याची नाणी पाहून तिला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. अलिबाबानं तिला सारा घटनाक्रम सविस्तर सांगितला. 'एवढी नाणी आपण मोजून ठेवायला हवीत,' ती म्हणाली.'पण, आपल्याकडे मोजायला मापटं नाहीये. मोजायचं कसं?''कासिम आणि फातिमाकडून घेऊन येते. त्यांना मापटं लागतं नेहमी,' अमिरा म्हणाली. लगबगीनं ती कासिमकडे गेली. तिनं फातिमाकडे मापटं मागितलं.

'या दरिद्री लोकांना, मापट्यानं एवढं काय मोजायचं? मी मापट्याच्या खालच्या बाजूला थोडा गोंद लावते,' असा विचार करीत फातिमानं मापट्याला गोंद लावला. अलिबाबा आणि अमिरानं नाणी मोजून संदुकीत भरली. कासिमचं मापटं अमिरानं परत केलं. त्याला सोन्याचं नाणं चिकटलं होतं.'पहा, तुमचा गरीब भाऊ! मापट्यानं सोन्याची नाणी मोजतोय. आत्ताच्या आता त्याच्याकडे जा आणि सोन्याच्या नाण्यांबद्दल विचारा,' फातिमानं कासिमला आज्ञा केली. कासिमनं अलिबाबाला विचारताच त्यानं खुशाल सारं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी दोन गाढवं आणि त्यांच्या पाठीवर पोती घेऊन कासिम जंगलाकडे निघाला. अजून श्रीमंत होण्याची स्वप्नं पहात, खुशीत होता तो! अलीबाबाने सांगितलेल्या टेकडीजवळ तो पोहोचला. 'खुल जा सिमसिम' परवलीचे शब्द म्हटल्यावर दगड दरवाजा उघडला. खजिना बघून कासिम वेडावला. सोनं, नाणी, हिरे, माणकं सारं पोत्यांमध्ये ठासून भरल्यावर त्याचं समाधान झाले.

'चला...अलिबाबा मूर्ख आहे. त्याने सोन्याच्या नाण्यांखेरीज काहीच घेतलं नाही. आपलं तसं नाही. सात पिढ्या काही न करता, आरामात बसून खातील, एवढा खजिना आपण लुटलाय. फातिमा हा खजिना बघून बेहद खुश होईल. आजच्या दिवशी एवढी संपत्ती पुरे! आता घराकडे जाण्यासाठी निघू या.' कासिमच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. सारी पोती ओढत ओढत आणत तो दगड दरवाज्यापर्यंत पोहोचला.'खुल जा झिमझिम','खुल जा टिम टिम', 'खुल जा रिम रिम' तो म्हणू लागला. मात्र 'सिम सिम' उच्चारायला तो विसरला होता. त्याने आठवण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ!

'हाय रे माझ्या कर्मा...आता माझा मृत्यू अटळ आहे. माझी बुद्धी भ्रष्ट झाली? इथून कशी सुटका होणार माझी! अलिबाबा माझ्या बरोबर येतो म्हणाला होता. पण आपणच त्याला मनाई केली. आपला लालची स्वभाव नडला.' थोड्या वेळात चाळीस चोर आणि त्यांचा म्होरक्या तिथे आले. त्यांनी कासिमला पाहिलं आणि ठार करून त्याचे तुकडे केले. नेहमीप्रमाणे गाठोड्यांतून आणलेला खजिना, त्या कोठारात ओतला आणि निघून गेले.

फातिमा कासिमची वाट पाहून थकली. अलिबाबाला कासिमचा ठावठिकाणा शोधण्यासाठी विनंती केली. अलिबाबा गुहेत पोहोचला. आतमध्ये कासिमचा मृतदेह तुकड्यांमध्ये सापडला. आपल्या गाढवाच्या पाठीवर त्याचं शव ठेवलं. आपली पोती त्याच्यावर ठेवून झाकलं. कासिमकडे मर्जिना नावाची मुलगी घरातली कामं आणि इतर कामकाज पहात असे. बुद्धीने अतिशय तल्लख होती.

कासिमचा मृतदेह पाहून फातिमा बेशुद्ध पडली. ती पुन्हा उठलीच नाही. मर्जिना पुढे आली. हम मालिकका शव, चादरमें लिपटाके हकीम को बुलायेंगे। पहले जिस्मको सिलाके ठाकठीक करेंगे। बाद में मालिकको दफना देंगे। ताकी चोरोंको हमारा पता न लगे।' अलिबाबाला मर्जिनाचं बोलणं पटलं. चोरांना समजलं की, कासिमचा मृतदेह कोणीतरी घेऊन गेलं. त्यांनी गावात चौकशी केली. तेव्हा अलिबाबाचा भाऊ कासिमचं दफन केल्याचं समजलं. चोरानं कासिमच्या घराबाहेर दरवाज्यावर फुली मारली. सकाळी मर्जिनाला फुली दिसली. तिनं चतुराईने सर्वांच्या घरावर फुल्या मारल्या. संध्याकाळी चोर सरदारला घेऊन आल्यावर त्यांना कासिमचं घर ओळखूच आलं नाही. सरदाराला अलिबाबाचा संशय आला आणि त्यानं त्याच्याशी खोटी मैत्री केली.

'जनाब, मी तेलाचा व्यापारी आहे आणि माझ्याजवळ तेलाचे खूप बुधले आहेत. एका रात्रीसाठी माझ्याजवळचे सारे बुधले तुमच्या आंगणात ठेवतो. सकाळ होताच सगळे बुधले घेऊन इथून निघून जाईन,' तो अलिबाबाला म्हणाला.

अलिबाबानं परवानगी दिल्यावर सारे बुधले घराच्या अंगणात ठेवले. मर्जिना अलिबाबा आणि सरदारांसाठी स्वयंपाक करत होती. घरातलं तेल संपलं म्हणून ती आंगणातील बुधल्यातून तेल काढायला गेली. एका बुधल्यातून आवाज आला.'सरदार, आमची बाहेर याची वेळ झाली का?'

मर्जिनानं झाकण वाजवलं. साऱ्या रांजणांतून तेच आवाज येऊ लागले. मर्जिनानं चोरांचा डाव ओळखला. एका रांजणातून तिनं भरपूर तेल काढून ते चुलीवर ठेऊन उकळलं. चाळीस रांजणात ओतलं. आतून 'ओय ओय मर गये' अशा आरोळ्या आल्या. अलिबाबाशी गप्पाटप्पा झाल्यावर, सरदार अंगणात आला. त्यानं सर्व चोरांना उठवायचा प्रयत्न केला. रांजण उघडून पाहिले तर सगळे मेलेले आढळले. आता काही खरं नाही म्हणून त्यानं तिथून पळ काढला. 'मर्जिना, तू कमाल केलीस. तुझ्या हुशारीनं तू चोरांचा डाव पलटवलास. सरदारही पळून गेला. आता आपल्या संपत्तीत कोणाचा अडथळा येणार नाही,' अलिबाबा म्हणाला.'आपण आता ही सारी संपत्ती आपल्या गावाच्या सुधारणांसाठी वापरू या. मर्जिना, तू आता कामवाली नाहीस तर आमची लेकच झाली आहेस,' अमिरा म्हणाली. अलिबाबा आणि अमिरानं गावाचं रूपच बदललं. त्या गावची जनता त्यांना शहेनशहा आणि बेगम साहिबा म्हणू लागले आणि मर्जिना साऱ्यांची लाडकी बनली.

## संघ हीच जीवनगाथा

सुरेखा काणे/९९६०० ५३५२१

# प्रार्थना (कडवे १ले)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात संस्कृत प्रार्थना म्हणतात. या आधीची प्रार्थना मराठी व हिंदीत होती. ही प्रार्थना फेब्रुवारी १९३९ मध्ये नागपूर जवळच्या सिंदी येथील बैठकीत तयार केली. तेव्हा त्या बैठकीत स्वतः आद्य सरसंघचालक डॉ.हेडगेवार, गोळवलकर गुरुजी, बाबासाहेब आपटे, बाळासाहेब देवरस, अप्पाजी जोशी, नानासाहेब टालाटुले आदि प्रमुखांचा सहभाग होता. नरहरी नारायण भिडे यांनी संस्कृतमध्ये प्रार्थना रचली आणि यादवराव जोशींनी तिला चाल लावली. नंतर १८ मे १९४० पासून नित्य प्रार्थना म्हणून ती अनिवार्य झाली. आता आपण पहिल्या कडव्याचा अर्थ व आशय पाहू.

**नमस्ते सदा वत्सले मातृभूमे**
**त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्।**
**महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे**
**पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ॥१॥**
**प्रार्थनेचा अर्थ माहित असावा,**
**नुसती पोपटपंची नको. प्रार्थनेच्या**

आशयात समरस होऊन प्रार्थना म्हटली पाहिजे. मनुष्य जीवनात प्रार्थनेबरोबरच प्रतिज्ञा पण महत्त्वाची असते. प्रतिज्ञा म्हणजे निर्धार व याच्या पूर्ततेसाठी परमेश्वराला जी विनंती करतो ती प्रार्थना! म्हणूनच प्रतिज्ञा आणि प्रार्थना यांची स्वयंसेवकांनी सांगड घालणे संघाला अपेक्षित आहे.

**अर्थ:** हे वत्सल मातृभूमे,
मी तुला सदैव नमस्कार करतो. हे हिंदू भूमे,
तू माझे सुखाने पालनपोषण केलेले आहेस.
हे महामंगलमयी पुण्यभूमे,
तुझ्यासाठी, माझा देह समर्पण होवो.
मी तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो.

**आशय :** जगाच्या पाठीवर आपल्या देशाला आई म्हणणारा एकमेव देश म्हणजे भारत! भूमी म्हणजे निव्वळ जमिनीचा तुकडा नाही तर ती धरती माता आहे. हिंदू संस्कृतीत जो आपल्याला उपयुक्त सिद्ध होतो त्यांना आपण देवतेसमान/मातेसमान मानतो. या भारत मातेच्या कुशीत आम्ही सुखाने खेळतो-बागडतो, लहानाचे मोठे होतो. म्हणून आपण उत्तम पर्यावरणासाठी जमीन, हवा, पाणी, वृक्ष, नद्या, समुद्र, पर्वत यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. पण, आम्हा भारतातल्या लोकांना स्वच्छतेची अजिबात सवय नाही. तरीसुद्धा इथे आरोग्य नांदते. ते कसे कारण, स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या वरदानामुळेच हे शक्य आहे. म्हणून आपण आपल्या बुद्धीला प्रज्वलित करणाऱ्या, तेजस्वी सूर्याला नमस्कार करतो. सूर्याला कर्माचा उद्धारक समजतो. आपल्या भारत मातेजवळ असणारी खनिज संपत्ती, जंगल संपत्ती ,सागर किनारा ,धनधान्य समृद्धी, पवित्र व शुद्ध वातावरण, नियमित ऋतू हे सर्व जगण्यासाठी बळ देणारे आहेत. ही वत्सल माता आहे. ऋषीमुनींमुळे ही पुण्यभूमी आहे. म्हणून पुन्हा पुन्हा या मंगल मातेला वंदन करू या.

**भारत मातेच्या कुशीत आम्ही सुखाने खेळतो-बागडतो, लहानाचे मोठे होतो. म्हणून आपण उत्तम पर्यावरणासाठी जमीन, हवा, पाणी, वृक्ष, नद्या, समुद्र, पर्वत यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. पण, आम्हा भारतातल्या लोकांना स्वच्छतेची अजिबात सवय नाही. तरीसुद्धा इथे आरोग्य नांदते. ते कसे कारण, स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या वरदानामुळेच हे शक्य आहे. म्हणून आपण आपल्या बुद्धीला प्रज्वलित करणाऱ्या, तेजस्वी सूर्याला नमस्कार करतो. सूर्याला कर्माचा उद्धारक समजतो.**



## विशेष

गौरी अंधारे/ ९५६१४७९६३३

# ऐट आणि नियती

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट पण, अजूनही तो प्रसंग डोळ्यांपुढून जात नाही. माझ्या माहेरी वडिलांचं मोठ्ठं घर, वाड्यासारखं! तेव्हा घरं मोठी मोठी असायची. घरात दोन-तीन भाडेकरू! भाडेकऱ्यांचे आणि मालकांचे संबंध खूप छान असत. एकमेकांबद्दल प्रेम असायचं. पदार्थांची देवाण घेवाण, अडीअडचणीला मदत असायची. त्या काळी आमच्या वाड्यात एक जण साड्या विकायला यायचा. तेव्हा आतासारखी कपड्यांची मोठमोठी दुकानं नव्हती. बाजारपेठांत कपड्यांची दोन-तीन दुकानं आणि त्यात मालपण बेताचा असायचा. त्यामुळे बरेचदा नागपुरी साड्या घेऊन ते गृहस्थ घरी यायचे. त्यांच्या जवळचा माल उत्तम असायचा.

मऊ, लांब, रुंद साड्यांच्या रंगाची खात्री असायची. तो आला की आमचे भाडेकरी, माझी आई, शेजारी सगळे जमा व्हायचे. त्याचा माल बरा खपायचा. तो उधारीवर पण साड्या द्यायचा. त्या साड्यांबद्दल वादच नव्हता पण, त्याच्या वागण्यात एक प्रकारची ऐट होती आणि बोलण्यात गुर्मी होती. दिसायला पण उंचपुरा, धष्टपुष्ट, तोंड विड्याने रंगलेलं, ३-४ बोटांमध्ये अंगठ्या, अगदी पांढरे शुभ्र कपडे, डोक्यावर काळी टोपी, कपाळावर गंध! त्याच्या श्रीमंतीची ऐट त्याच्या राहणीवरून दिसे. आम्हाला लहानपणी य गोष्टीची गंमत वाटे. अशी कितीतरी वर्षे तो आमच्या वाड्यात यायचा, सगळे त्याच्याकडून साड्या घेत. पण, अचानक काय झालं कुणास ठाऊक! त्याचा आणि आमच्या शेजारच्या काकूंचा साड्यांच्या किंमतीवरून वाद झाला.

हे सगळं आमच्याच घरी चालू होतं. त्यामुळे माझी आई पण त्यांच्यात पडली. त्यावरून तो माझ्या आईला वाट्टेल तसा बोलला. त्यामुळे आम्ही घरचे सगळे गोळा झालो. माझ्या भावाने त्याला समजवायचा प्रयत्न केला पण, तो ऐकेना. अतिशय उद्धट आणि उर्मटपणे तो बोलत होता. शेवटी भावाने त्याला हाकललं. दिलेले पैसे आईच्या तोंडावर फेकून आणि परत या घरात कधी पाऊल टाकणार नाही, असं म्हणत तो ऐटीत निघून गेला. पुढे तो आमच्याकडे येईनासा झाला. हळूहळू आम्ही पण त्याला विसरून गेलो. दरम्यान, माझं लग्न झालं. बाळंतपणासाठी म्हणून मी आईकडे आले होते. एक दिवस दुपारी १२ वाजता एक वयस्क गृहस्थ आईकडे आले. हातात एक गाठोडं होते.

आम्हाला काही नको, म्हणून मी त्याला जायला सांगितलं तर, तो म्हणाला,'बाई थोडं पाणी देता?' मी त्याला पाणी दिलं तर म्हणतो कसा 'बेबी, मला ओळखलं नाही? मी तोच तुमच्याकडे साड्या, पातळं घेऊन यायचो.' मी एक क्षण त्याच्याकडे पाहातच राहिले. बापरे! मला त्याच्याकडे बघून धक्काच बसला. त्याच्यामध्ये जमीन अस्मानाचा फरक पडला होता. त्याची पूर्वीची ऐट, तो रुबाब, ते उर्मट बोलणं सगळं कुठे गेलं?आता तो एकदम रोड, पाठीत वाकलेला, अंगावर पांढरं पण फाटकं धोतर आणि केविलवाणा चेहरा, असा दिसत होता. 'एक तरी साडी घ्या' म्हणून त्यांनी आईला विनवणी केली. 'जमल्यास थोडं खायला द्या' असं म्हणाले. हे सर्व बघून मला कसंतरीच वाटलं. नंतर आईने त्यांना जेवायला दिले. जेवण झाल्यानंतर त्यांनी त्यांची दुर्दैवी कहाणी सांगितली. ती एकून सगळ्यांनाच वाईट वाटले. त्याच्या जवळच्या सगळ्या साड्या आम्ही विकत घेतल्या आणि आईने त्यांना थोडे जास्तीचे पैसेही दिले. या सगळ्याने तो अगदी भारावून गेला. म्हणाला,'बाई मी तुम्हाला वाट्टेल तसा बोललो, तुमचा अपमान केला. तुमच्याकडे परत पाऊल न टाकण्याची शपथ मी घेऊन गेलो. पण, नियतीने मला तुमच्या दाराशी येणं भाग पाडलं. तुम्ही पण मोठ्या मनाने मला माफ केलंत, मला मदत केलीत याला काय म्हणावं? मी तुमचे उपकार कधीच विसरणार नाही. तुम्हाला माझी दया आली यातच तुमचं मोठेपण आणि माणुसकी!' आम्हाला सर्वांना मनापासून आशिर्वाद दिले व म्हणाला,'माझ्याजवळ बाई येवढंच आहे' आणि तो निघून गेला.



त्याची ती स्थिती पाहून मला वाईट वाटलं. म्हटलं पाहा नियतीचा किती क्रूर आहे. ज्या हातांनी तुम्हाला यशोशिखरावर चढवते त्याच हातांनी ती तुम्हाला अपयशाच्या खाईत लोटते. कोणतंही यश पचवायला खूप ताकद लागते. यशाने फुगून जाऊन, त्याची गुर्मी चढली की नियती तुम्हाला शिखरावरुन केव्हा ढकलेल सांगता येत नाही.